कृषीवल
रायगड, बुधवार, दि. ७ जानेवारी २०२६
किंमत ४ ₹

## सतरा लाखांची रोकड जप्त

**पनवेल** : पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी आचारसंहिता लागू झाली आहे. यानुसार पनवेल मतदारसंघ, निवडणूक विभागांतर्गत आचारसंहिता पथकांतर्गत स्थिर सर्वेक्षण पथक क्रमांक ३ (एसएसटी पथक) ने पनवेलजवळील कामोठे चेकनाका येथे नियमित वाहन तपासताना सायन पनवेल हायवे रोडवरून जाणाऱ्या ग्रॅन्ड विटारा पांढऱ्या रंगाच्या गाडीची तपासणी केली. यात कापडी पिशवीमध्ये १७ लाखाची रोख रक्कम आढळून आली. ही रक्कम संशयास्पद असल्याने ही रक्कम पथकामार्फत जप्त करण्यात आली. पान २ वर

ऑफिस कामाकरिता अनुभवी
मुलगी/महिला पाहिजे.
पात्रता – .B.com, Typing, MS-CIT
पगार – १२०००-१५०००
पत्ता – नांदईपाडा, झिराड, अलिबाग-रायगड
संपर्क क्र. ९८२२०८३३५३,
८४०७९८२७१२

# भरपाईचा निधी लाल फितीत

## नुकसानग्रस्तांची अडीच महिन्यांपासून प्रतीक्षा

प्रमोद जाधव
। रायगड ।

**ऑक्टोबर महिन्यात झालेल्या जोरदार अतिवृष्टीमुळे रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर घरांची आणि गुरांच्या गोठ्यांची पडझड झाली. या नैसर्गिक आपत्तीत शेकडो नागरिकांना आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले. मात्र, नुकसान होऊन अडीच महिने उलटूनही अद्याप एकाही नुकसानग्रस्ताला शासनाकडून भरपाई मिळालेली नाही. एक कोटी १५ लाख रुपयांच्या निधीची गरज आहे. नुकसान भरपाईची फाईल लाल फितीत अडकून असल्याचे बोलले जात आहे.**

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील गावांची संख्या एक हजार ८०० हून अधिक आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागाची लोकसंख्या १६ लाख ६४ हजारांहून अधिक आहे. रायगड जिल्ह्यात तीन हजार मि.मी.पेक्षा अधिक पाऊस पडतो. जुलैमध्ये अतिवृष्टीचा फटका शेतकऱ्यांना कायमच असतो. वित्तहानी मोठ्या संख्येने होते. यंदा मात्र पाऊस लांबणीवर गेला. ऑक्टोबर महिन्यामध्ये जोरदार पाऊस पडला. या पावसात ग्रामीण भागातील अनेक घरांसह गोठ्यांची हानी झाली. जिल्ह्यातील १८१ घरांची या पावसात पडझड झाली. त्यात गुरांच्या गोठ्यांचेही नुकसान झाले. काहींच्या घरांचे पूर्ण, तर काहींचे अंशतः नुकसान झाले. पक्क्या घरांचीदेखील पडझड झाल्याने अनेक कुटुंबे बेघर झाली आहेत. काहींनी प्लास्टिक कापडाच्या आडोशाने कुटुंबाचा संसार सावरण्याचा प्रयत्न केला आहे.

नुकसानग्रस्तांना तात्काळ मदत मिळावी यासाठी तलाठी, ग्रामविकास अधिकारी व कृषी सहाय्यकांच्या माध्यमातून पंचनामे करण्यात आले. त्यानंतर जिल्ह्याला अहवाल पाठविण्यात आला. १८१ घरांसह गोठ्यांच्या झालेल्या पडझडीचे एक कोटी १५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अहवाल जिल्हा प्रशासनाकडून शासनाला पाठविण्यात आला. घरे, गोठ्यांच्या झालेल्या नुकसानीची आर्थिक मदत लवकर मिळेल, अशी अपेक्षा नुकसानग्रस्तांना होती. परंतु, ही अपेक्षा फेल ठरली. नुकसान होऊन अडीच महिने होत आले आहेत. तरीदेखील शासनाकडून त्याची दखल घेण्यात आली नाही. नुकसानभरपाईचा प्रस्ताव लाल फितीत अडकून आहे. नुकसानग्रस्त भरपाईच्या प्रतीक्षेत आहेत. तहसील कार्यालयांसह तलाठी कार्यालयात याबाबत वारंवार विचारणा केली जाते. परंतु, शासनाकडून निधीच आला नसल्याचे माहिती समोर आली आहे. शासनाकडून निधी देण्यास दिरंगाई होत नसल्याने नुकसानग्रस्तांना त्यांच्या घरांसह गोठ्यांची मदत मिळल्यास विलंब होत आहे.

### मदतीपासून वंचित

जिल्ह्यात यावर्षी ८६ हजार हेक्टर क्षेत्रावर भातपीक लागवड करण्यात आली आहे. जिल्ह्यातील एक हजार ७४६ गावांतील ४२ हजार ९४५ शेतकऱ्यांना ऑक्टोबर महिन्यात परतीच्या पावसाचा फटका बसला. यामध्ये १७ हजार ८५ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले. जिल्हा प्रशासनाकडून निधी मागणी करण्यात आली. शासनाकडून एक कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असून, शेतकऱ्यांच्या खात्यात तो वर्ग केला जाणार आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांना मदतीची प्रतीक्षा लागून राहिली आहे.




### भरपाईसाठी केवायसीचा विळखा

जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी निधी उपलब्ध झाला आहे. मात्र, बँक खाते केवायसी करणे गरजेचे आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आता केवायसीचा विळखा बसण्याची शक्यता वर्तविली जात आहे. निधी मिळेपर्यंत अजून एक महिना प्रतीक्षा करण्याची वेळ शेतकऱ्यांवर येण्याची शक्यता आहे.

## वेधक

### सुरेश कलमाडी यांचे निधन

**पुणे** : माजी केंद्रीय मंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुरेश कलमाडी यांचे मंगळवारी (दि. ६) दीर्घ आजाराने निधन झाले. ते ८१ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक विवाहित मुलगा, सून, दोन विवाहित मुली, जावई तसेच नातवंडं असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर दुपारी ३.३० वाजता नवी पेठ, पुणे येथील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. सुरेश कलमाडी हे माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री तसेच, भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे माजी अध्यक्षही होते. २०१० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांच्या आयोजनातही त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती.



### ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल** : तळोजा येथून मित्रासह पनवेल येथे निघालेल्या तरुणाच्या दुचाकीला अज्ञात ट्रकने पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू, तर त्याचा सहकारी गंभीर जखमी झाल्याची घटना पहाटे नावडे ते रोडपाली येथील उड्डाणपुलावर घडली. तळोजा पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात ट्रक चालकाविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. बाबूसिंह नाथुसिंह खरवड (२२) असे या अपघातात मृत्यू झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव असून, त्याच्या जखमी मित्राचे नाव चत्तरसिंह असे असून हे दोघेही तळोजा फेज-२ मध्ये राहणारे आहेत. पहाटे २ वाजण्याच्या सुमारास बाबूसिंह हा त्याच्या मित्राकडे असलेला मोबाईल फोन घेण्यासाठी पनवेल येथे जाताना अपघात झाला.

### पनवेलमध्ये गटारात अर्भक

**पनवेल** : पनवेल शहरालगत करंजाडे वसाहतीत तलावाशेजारील गटारात सोमवारी सकाळी मृतावस्थेतील अर्भक आढळून आले आहे. याची शहर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. आर-२ परिसरात भूखंड क्रमांक ४ समोर असलेल्या तलावातील पाणी काढण्याचे काम सुरू होते. याच वेळी तलावाशेजारील गटाराचे झाकण उघडे असल्याचे मजुरांच्या निदर्शनास आले. तेथे गटारात काहीतरी अडकल्याचे दिसल्यावर पाहणी केली असता त्यात मृतावस्थेतील अर्भक आढळले.

# कुर्डूसमध्ये भाजप-शिंदे गटात कलगीतुरा

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

भाजपसोबत राहून राज्यात सत्ता मिळवणाऱ्या शिंदे गटाने रायगड जिल्ह्यात 'एकला चलो रे'चा नारा देत दिला आहे. त्यामुळे भाजप आणि शिंदे गटातील अंतर्गत कलह पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहेत. शिंदे गट विरुध्द तटकरे हा वाद जगजाहीर असताना आता भाजपसोबत शिंदे गटाने वैर स्वीकारले आहे. कुर्डूसमध्ये राजा केणी यांची उमेदवारी आमदार दळवी यांनी जाहीर केली आहे. त्यामुळे सुरुवातीपासूनच गुडघ्याला बाशिंग बांधून असलेल्या भाजपच्या उमेदवारांसमोर आव्हान उभे राहिले आहे. दळवींची ही खेळी भाजप कशा पद्धतीने उधळून लावेल, याकडे आता लक्ष लागून राहिले आहे. या प्रकारामुळे भाजप आणि शिंदे गटात कलगीतुरा रंगला आहे.



- **शिंदे गटाने थेट भाजपविरोधात दिला उमेदवार**
- **राजा केणींच्या उमेदवारीवरुन संघर्ष टोकाला**

केंद्रासह राज्यात महायुतीची सत्ता आहे. राज्यामध्ये भाजप, शिंदे गट शिवसेना आणि अजित पवार गट राष्ट्रवादीची युती आहे. मात्र, रायगड जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांपासून तटकरे विरुद्ध शिंदे गट असे शीतयुद्ध सुरु आहे. आरोप-प्रत्यारोप करीत एकमेकांना पाण्यात बघत असल्याचे जगजाहीर आहे. रायगड जिल्हा परिषदेवर गेल्या साडेचार वर्षांपासून प्रशासकीय राजवट आहे. राज्य निवडणूक आयोगामार्फत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. शिंदे गटाने कुर्डूसमध्ये प्रचाराला सुरुवातही केली आहे. राजा केणी हेच अधिकृत उमेदवार असल्याचे स्पष्टपणे आमदार दळवी आपल्या भाषणातून सांगत आहेत. त्यामुळे भाजपला शिंदे गटाकडून खुले आव्हान दिले जात आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसबरोबरच आता शिंदे गटाने भाजपसोबतही वैर घेतले आहे. हे वैर शिंदे गटातील नेत्यांना महागात पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे. परंतु, भाजपची काही नेतेमंडळी शिंदे गटातील आमदारांच्या कायम पाठीशी असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. त्यामुळे त्यांच्याविरोधात पक्षश्रेष्ठी काय भूमिका घेणार याकडे आता लक्ष लागून राहिले आहे.

दरम्यान, रायगडच्या पालक मंत्रीपदावर शिंदे गट आणि राष्ट्रवादीने दावा केल्याने हा तिढा अद्याप सुटलेला नाही. त्यामुळे दोन्ही पक्षातील संघर्षामागचे पालकमंत्रीपद हे प्रमुख कारण असून, हा वाद आता विकोपाला गेल्याचे चित्र सध्याच्या राजकीय परिस्थितीवरुन दिसून येत असताना, आता शिंदे गटाचे भाजपबरोबरचे वैरही काही लपून राहिलेले नाही.

# घारेंसह भगतांच्या अडचणीत वाढ

## न्यायालयाने अटकपूर्व जामीन फेटाळला

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

खोपोली येथील निर्घृण हत्या प्रकरणातील दोन आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज पनवेल येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने फेटाळला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) सुधाकर घारे आणि भरत भगत यांनी दाखल केलेल्या अटकपूर्व जामीन अर्जावर सुनावणी झाल्यानंतर न्यायालयाने हा निर्णय दिला. त्यामुळे दोघांच्याही अडचणीत वाढ झाली आहे.



खोपोली येथील नगरपरिषद निवडणुकीत निवडून आलेल्या शिंदे गटाच्या नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती मंगेश काळोखे यांची शुक्रवारी (दि.२६) सकाळी भररस्त्यात निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेत मंगेश काळोखे यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी दहाहून अधिक जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

मृत मंगेश काळोखे यांचा पुतण्या राज काळोखे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, सुधाकर घारे आणि भरत भगत यांनी खुनाचा कट रचल्याचा आरोप करण्यात आला आहे. घटनेनंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत काही तासांतच नऊ जणांना ताब्यात घेतले. मात्र, आरोपी म्हणून असणारे सुधाकर घारे व भरत भगत यांनी अटकपूर्व जामिनासाठी पनवेल येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात अर्ज केला होता. या अर्जावर जिल्हा सत्र न्यायाधीश चव्हाण यांच्या न्यायालयात सुनावणी झाली. घारे यांच्यावतीने ॲड. शिरीष गुप्ते व ॲड. थोरात यांनी बाजू मांडली, तर सरकार पक्षातर्फे यशवंत भोपी यांनी युक्तिवाद केला. दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आणि गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता न्यायालयाने सुधाकर घारे आणि भरत भगत यांचा अटकपूर्व जामीन नामंजूर केला. अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळण्यात आल्याने या दोन्ही आरोपींच्या कायदेशीर अडचणीत मोठी वाढ झाली असून, पुढील तपासाला वेग येण्याची शक्यता आहे.

# लातूरमध्ये रवींद्र चव्हाणांच्या विधानाने वादाची ठिणगी

। लातूर । प्रतिनिधी ।

लातूर शहरामधून विलासराव देशमुख यांच्या आठवणी पुसल्या जातील यात शंका नाही, असे वक्तव्य करून भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी नवीन वाद ओढावून घेतला. ते लातूर महापालिकेच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी आले होते. सभेत बोलताना त्यांनी केलेल्या वक्तव्यामुळे एकच वाद पेटला आहे.

काँग्रेसने या वक्तव्याप्रकरणी चव्हाण यांनी माफी मागावी, अशी मागणी केली आहे. तर, आमदार अमित देशमुख यांनी या वक्तव्यावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. तर, अभिनेत रितेश देशमुख यांनीसुद्धा या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. लातूरमधील अनेक जुन्या जाणत्या राजकारण्यांनी चव्हाण यांच्या या वक्तव्याचा समाचार घेतला आहे. "लातूरमध्ये कार्यकर्त्यांचा उत्साह आहे. हा उत्साह पाहून लक्षात येते की, लातूर शहरातून विलासराव देशमुख यांच्या आठवणी पुसल्या जातील, यात कोणतीही शंका नाही." असे वक्तव्य भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले. पान २ वर



**विलासरावांच्या आठवणी पुसल्या जाण्याची भाषा**

# अजितदादा भाजपच्या रडारवर

## सावरकरांचा मुद्दा, ७० हजार कोटींच्या घोटाळ्यावरुन ठणकावले

। मुंबई । प्रतिनिधी ।

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत महायुतीमधील मित्रपक्षांमधील कलह पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असून, उपमुख्यमंत्री अजित पवार हे थेट भाजपच्या रडारवर असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. एकीकडे भाजपचे नेते आशिष शेलार यांनी 'सावरकरांचे विचार मान्य असतील तर सोबत या, नाहीतर तुमच्याशिवाय पुढे जाऊ', अशा शब्दांत अजित पवारांना ठणकावले आहे. तर, दुसरीकडे चंद्रशेखर बावनकुळे यांनी '७० हजार कोटींच्या कथित सिंचन घोटाळ्याचा निर्णय अजून होणे बाकी आहे' असा इशारा देत राजकीय वातावरण तापवले आहे.



या वादाची सुरुवात अजित पवार यांनी पुण्यात घेतलेल्या एका पत्रकार परिषदेतून झाली. महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बोलताना अजित पवारांनी भाजपच्या काही धोरणांवर आणि स्थानिक नेतृत्वावर बोचरी टीका केली होती. पुण्याच्या विकासकामांच्या श्रेयवादावरून त्यांनी भाजपला लक्ष्य केले होते. अजित पवारांच्या या टीकेला आधी रवींद्र चव्हाण आणि त्यानंतर स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चोख प्रत्युत्तर दिले होते. मात्र, आता आशिष शेलार यांनी या वादात थेट सावरकरांचा मुद्दा आणल्याने युतीमधील तणाव वाढला आहे.

अजित पवारांच्या टीकेवर भाष्य करताना आशिष शेलार यांनी आमचा पक्ष स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांवर चालणारा आहे, असं म्हटलं. "रवींद्र चव्हाण म्हणालेच आहेत की आम्ही सावरकरांचे भक्त आहोत. सावरकरी विचारांवर चालणारे लोक आहोत. त्यामुळे अजित पवारांच्या पक्षालासुद्धा पान २ वर

# मत्स्यविभागातील संगनमत उघड

। उरण । प्रतिनिधी ।

- **एलईडी कारवाईच्या नावाखाली तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांचा खेळ**
- **मार्तंड नाखवा यांचा खळबळजनक आरोप**

एलईडी लाईट व पर्ससीन नेट मासेमारीविरोधात सुरू असलेली सध्याची तथाकथित कारवाई म्हणजे कायद्याची अंमलबजावणी नसून, मत्स्यव्यवसाय विभागातील तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांचा उघड संगनमताचा आणि दिखाऊ कारभार आहे, असा खळबळजनक आरोप महाराष्ट्र प्रदेश मच्छिमार काँग्रेसचे अध्यक्ष मार्तंड नाखवा यांनी केला आहे.

मत्स्यव्यवसाय आयुक्तांना पाठवलेल्या सविस्तर पत्रातून नाखवा यांनी विभागातील सह आयुक्त, प्रादेशिक आयुक्त आणि मुंबईतील परवाना अधिकारी यांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. एलईडी लाईट बोटींवरील कारवाईदरम्यान हे तिन्ही वरिष्ठ अधिकारी एकाच बोटीत बसून 'कारवाई' करत असल्याचे दृश्य समोर येणे म्हणजे प्रशासनाच्या निष्पक्षतेवर थेट घाला असल्याचे त्यांनी नमूद केले.

गेल्या दहा वर्षांपासून एलईडी लाईट मासेमारीला मूकसंमती, संरक्षण आणि सवय लावण्याचे काम करणारे हेच अधिकारी आज अचानक नैतिकतेचा आव आणून कारवाईचे नाटक करत आहेत, असा थेट आरोप नाखवा यांनी केला आहे.

या तिघांपैकी एका सह आयुक्ताने स्वतःला पान २ वर

**दिघी शाळेचे संतापजनक वास्तव** | **सत्तर विद्यार्थ्यांची जबाबदारी एका शिक्षकावर**

# प्रभारी कारभारामुळे शिक्षणाची वाताहत

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

**श्रीवर्धन तालुक्यातील मराठी शाळांची अवस्था दिवसेंदिवस चिंताजनक होत चालली असून, दिघी येथील रायगड जिल्हा परिषद शाळेची परिस्थिती विशेषतः गंभीर बनली आहे. गेल्या सहा ते सात वर्षांपासून या शाळेत पदोन्नतीने होणारी मुख्याध्यापकाची नियुक्ती न झाल्याने शाळेच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजावर मोठा परिणाम झाला आहे. याचा थेट फटका विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर बसत आहे.**

दिघी येथील या जिल्हा परिषद शाळेत मराठी व अर्ध इंग्रजी (सेमी इंग्लिश) माध्यमाच्या इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत प्रत्येकी एक असे एकूण आठ वर्ग आहेत. या शाळेत सध्या एकूण २९३ विद्यार्थी शिक्षण घेत असून, सात शिक्षक कार्यरत आहेत. मात्र, दोन शिक्षकांची कमतरता भासत असून, २०१८ सालापासून मुख्याध्यापक पद रिक्त आहे. याच शाळेतील एका शिक्षकाकडे प्रभारी मुख्याध्यापक पदाची जबाबदारी देण्यात आली आहे.



प्रभारी मुख्याध्यापकांना अध्यापनासोबतच मुख्यालयीन दप्तराची कामे करावी लागत असल्याने वर्गाकडे पान २ वर

### निष्क्रिय प्रभारी गटशिक्षणाधिकारी

दिघी येथील जिल्हा परिषद शाळेतील सात वर्षे रिक्त असलेले मुख्याध्यापक पद तसेच दोन शिक्षकांच्या रिक्त जागेबाबत श्रीवर्धन येथील प्रभारी गटशिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांना प्रतिक्रिया विचारली असता समाधानकारक उत्तर दिले नाही. अशा निष्क्रिय गटशिक्षणाधिकारी यांच्यावर शिक्षणाधिकारी ललिता दहितुले कारवाई करणार का?

> या शाळेत तीन शिक्षकांची बदली झाली, त्या जागी फक्त शासनाने एक शिक्षक दिला. ही समस्या गटशिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्याकडे मांडली असता त्यांनी सांगितले की, भरती प्रक्रिया झाली की शिक्षक तुम्हाला देऊ, पण आजपर्यंत शिक्षक दिले नाही. हीच व्यथा आम्ही शिक्षणाधिकारी ललिता दहितुले यांना सांगितली, त्यांनीही ऑनलाईन प्रक्रिया सुरू आहेत, असे सांगितले. जर शिक्षक देत नसाल, तर शाळा बंद करू. - विवेक मेंदाडकर, रायगड जिल्हा परिषद शाळा समिती अध्यक्ष आणि पालक, दिघी

### ड्रग्जविरोधी लढ्यासाठी

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ॲक्शन मोडवर

## राष्ट्रीय युवा दिनानिमित्त दि.५ ते दि.१२ जानेवारीदरम्यान जनजागृती मोहीम

। रायगड । प्रतिनिधी ।

समाजाला पोखरणाऱ्या अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्याला आळा घालण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग हे पूर्णतः ॲक्शन मोडवर आले असून, संपूर्ण रायगड जिल्ह्यात ड्रग्जविरोधी व्यापक जनजागृती व प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. या मोहिमेच्या नियोजन व आढावा बैठकीचे आयोजन रायगड जिल्ह्याचे मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेंद्र सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.



यावेळी जिल्हा न्यायाधीश सृष्टी निळकंठ यांनी सांगितले की, ड्रग्जविरोधातील लढा यशस्वी करायचा असेल, तर सर्व शासकीय यंत्रणा, पोलीस प्रशासन, शैक्षणिक संस्था तसेच समाजातील विविध घटकांनी एकत्र येऊन समन्वयाने कार्य करणे अत्यंत आवश्यक आहे. ड्रग्जचा वाढता प्रसार ही गंभीर सामाजिक समस्या असून, सामूहिक प्रयत्नांतूनच त्यावर प्रभावी नियंत्रण मिळवता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तेजस्विनी निराळे यांनी माहिती देताना सांगितले की, रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर जनजागृती कार्यक्रम राबविण्याची पान २ वर

# नवी मुंबईला भुयारी बोगद्यातून पाणीपुरवठा

## • सिडकोच्या ऐतिहासिक योजनेला मोठे यश



| उरण | प्रतिनिधी |

नवी मुंबई व नैना अंतर्गत क्षेत्रातील वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन सिडकोने हाती घेतलेल्या हेटवणे जलवर्धन योजनेला ऐतिहासिक यश मिळाले आहे. पेण तालुक्यातील हेटवणे धरणापासून नवी मुंबईपर्यंत भुयारी बोगद्याद्वारे पाणी आणण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पातील पहिल्या बोगद्याचा 'ब्रेकथ्रू' सोमवारी यशस्वीपणे पार पडला.

'ॲफकॉन्स' कंपनीद्वारे खोदण्यात आलेल्या ५.५२ किलोमीटर लांबीच्या (शाफ्ट क्रमांक ३ ते ४ दरम्यान) शुद्ध पाण्याच्या बोगद्याचा ब्रेकथ्रू वहाळ गावातील शाफ्ट क्रमांक ४ येथे सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, मुख्य अभियंता शीला करूणाकरन, अधीक्षक अभियंता (पाणीपुरवठा) प्रवीण सेवतकर यांच्यासह सिडको व ॲफकॉन्सचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या योजनेंतर्गत एकूण २९ किलोमीटर लांबीचे दोन स्वतंत्र भुयारी बोगदे उभारण्यात येत आहेत. यामध्ये १३.२५ किलोमीटर लांबीचा कच्च्या पाण्याचा बोगदा आणि १५.४ किलोमीटर लांबीचा जलशुद्धिकरणानंतर शुद्ध पाणी वाहून नेणारा बोगदा समाविष्ट आहे. कच्च्या पाण्याचा बोगदा मेघा इंजिनिअरिंग कंपनीद्वारे उभारण्यात येत असून, शुद्ध पाण्याचा बोगदा 'ॲफकॉन्स' व पटेल इंजिनिअरिंग या कंपन्यांमार्फत तयार केला जात आहे.

सुमारे १०० मीटर खोल जमिनीखाली सह्याद्री पर्वतरांगांतील कठीण बेसॉल्ट खडकातून हा बोगदा खोदण्यात आला आहे. अत्यंत आव्हानात्मक भूगर्भीय परिस्थिती असूनही सिडको अभियंते आणि ॲफकॉन्सच्या तांत्रिक पथकाच्या समन्वयामुळे हे काम यशस्वीरित्या पूर्ण झाल्याचे विजय सिंघल यांनी सांगितले. या प्रकल्पात यापूर्वी 'ॲफकॉन्स'च्या फ्लेमिंगो टनेल बोरिंग मशीनने एका महिन्यात ७७७ मीटर बोगदा खोदून नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सिडकोची पाणीपुरवठा क्षमता सध्याच्या १५० दशलक्ष लीटर प्रतिदिनवरून थेट २७० दशलक्ष लीटर प्रतिदिन इतकी वाढणार आहे. त्यामुळे नवी मुंबई, नैना क्षेत्र तसेच औद्योगिक व निवासी विकासासाठी दीर्घकालीन आणि सुरक्षित पाणीपुरवठा सुनिश्चित होणार आहे. सिडकोच्या या भुयारी बोगदा प्रकल्पामुळे नवी मुंबईच्या पायाभूत सुविधांच्या विकासात एक महत्त्वाचा टप्पा गाठल्याचे मानले जात आहे.

# सुधागडमध्ये निवडणुकीची चाहूल

## जांभुळपाडा जि.प. गट उमेदवारीवर रंगली चर्चा

| सुधागड | प्रतिनिधी |

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात असतानाच सुधागड तालुक्यात राजकीय हालचालींना वेग आला आहे. कोणत्या गटाची कोणत्या प्रभागात आघाडी होणार, कोणत्या युती जुळणार, याकडे आता सुधागडवासियांचे लक्ष लागले आहे.

तालुक्यातील विविध राजकीय पक्षांमध्ये इच्छुक उमेदवारांनी तयारीला सुरुवात केली असून, काहींनी पक्षांतर्गत बैठकीत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसंदर्भात अनेक तर्क-वितर्क लावले जात आहेत.

सुधागड तालुक्यात जिल्हा परिषद निवडणुकीसाठी कोण उमेदवारी करणार, यावर सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. विशेषतः जांभुळपाडा जिल्हा परिषद गटात कोणत्या पक्षाचा उमेदवार रिंगणात उतरणार, यावरून राजकीय वर्तुळात खलबते सुरू आहेत. दरम्यान, जांभुळपाडा जिल्हा परिषद विभागाची निवडणूक यंदा सुधागड तालुक्यातील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरत आहे. या विभागात कोण उमेदवार म्हणून उतरतो, कोणाला संधी मिळते आणि कोणती गटबाजी प्रभावी ठरते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

त्यामुळे तालुक्यातील राजकीय हालचालींनी गती घेतल्याचे चित्र दिसून येत आहे.

# उरण नगरपरिषदेची सभा लाईव्हच होणार

## नवनिर्वाचित नगराध्यक्षा भावना घाणेकरांची माहिती

| चिरनेर | प्रतिनिधी |

बाळशास्त्री जांभेकर यांनी पत्रकारितेत जो ठसा उमटविला. अशा पत्रकारितेत तुम्हीही कायम राहाल. लोकांचे प्रश्न मांडाल. तुमच्या लेखणीला आणि वाणीला बळ मिळो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना करतो, असे उद्गार नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी काढले. आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीच्या व पत्रकार दिनानिमित्ताने मंगळवारी (दि.६) उरण नगरपरिषदेच्या सभागृहात पत्रकारांचा सन्मान करण्यासाठी छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नवनिर्वाचित नगराध्यक्षा भावना घाणेकर या बोलत होत्या. याप्रसंगी तालुक्यातील वृत्तपत्रांचे व वृत्तवाहिन्यांचे पत्रकार तसेच नगरसेवक व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमात पत्रकारांना सन्मानित करण्यात आले. यापुढे नगरपरिषदेच्या कारभाराबाबत बोलताना भावना घाणेकर यांनी जशी संसद लाईव्ह होते, अधिवेशन लाईव्ह होते, तशीच उरण नगर परिषदेची सभा ही लाईव्हच होणार असल्याचे सांगितले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मनोज कमलाकर पाटील रा. बी आदर्श नगर, वरळी, मुंबई यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| पोयनाड ता.अलिबाग | १०५/२ | ०-१८-००<br>०-०२-००<br>एकूण ०-२०-०० | ०.३० |

सदर वर नमूद केलेली मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ०३/०१/२०२३

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर
पो.अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड.


# पान १ वरून

## सतरा लाखांची रोकड जप्त

ही कारवाई पनवेल महानगरपालिका निवडणूक अधिकारी मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. प्रभाग ११, १२, १३ चे निवडणूक निर्णय अधिकारी अविशकुमार सोनोने यांच्याद्वारे ही तक्रार देण्यात आली. या कारवाईवेळी आचारसंहिता पथक प्रमुख तथा अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, समन्वय अधिकारी तथा उपायुक्त रविकिरण घोडके, समन्वयक तथा अधिक्षक मनोज चव्हाण, पथक प्रमुख स्थिर सर्वेक्षण पथक क्र. ३ ग्रामविकास अधिकारी, सुदिन धनाजी पाटील, पथक सदस्य नरेंद्र गावंड, प्रशांत फडके, कामोठे पोलिस स्टेशनचे पोलिस शिपाई जितेश नवघरे, श्रीवंता अक्षय सुर्यवंशी उपस्थित होते.

या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाहीसाठी आयकर विभागास सूचित करण्यात आले असून त्याच्यावतीने पुढील प्रक्रिया सुरू आहे.

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने स्थिर सर्वेक्षण पथक, भरारी पथक, व्हिडिओ व्हिव्हींग पथक अशा सर्व पथकास सजग राहून कडक उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे.

## अजितदादा भाजपच्या रडारवर

सावरकरांचे विचार मान्य करावेच लागतील. याल तर तुमच्याबरोबर, न याल तर तुमच्याविना आणि विरोधात शिरलात तर तुमच्या विरोधात आम्ही आमचे काम करु,'' असा इशारा आशिष शेलार यांनी दिला.

भाजपपाच्या या दोन आघाड्यांवरील वक्तव्यांमुळे महायुतीतील सत्तासमीकरणे अस्वस्थ झाली असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अजित पवारांची कोंडी करण्याचे भाजपचे नियोजन असल्याची चर्चा सुरु झाली आहे. निवडणुका अवघ्या दहा दिवसांवर येऊन ठेपल्या असताना, मित्रपक्षांमधील हा अंतर्गत संघर्ष विरोधकांसाठी फायद्याचा ठरू शकतो, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

## लातूरमध्ये रवींद्र चव्हाणांचे वादग्रस्त विधान

पण, त्यांच्या या वक्तव्यावर लातूरकर नाराज झाल्याचे दिसते. स्थानिक अनेक नेत्यांनी या वक्तव्याचा चांगलाच समाचार घेतला. लोकनेत्याचा हा अवमान असल्याची प्रतिक्रिया उमटली. आमदार अमित देशमुख यांनी या वक्तव्यावर नाराजी व्यक्त केली.

याप्रकरणी वादळ उठताच रवींद्र चव्हाण यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये कुणाच्या भावना दुखावल्या असतील तर दिलगिरी व्यक्त करतो असे चव्हाण म्हणाले. लातूरमध्ये काँग्रेस हे विलासराव देशमुख यांच्या नावाने मत मागत आहे. त्यामुळे विकासाच्या दृष्टीने ते वक्तव्य केले. अमित देशमुख माझे चांगले मित्र आहेत. हे वक्तव्य राजकीयदृष्टीने पाहू नये. तरीही आपल्या वक्तव्याने कुणाच्या भावना दुखावल्या असतील तर दिलगिरी व्यक्त करतो असे चव्हाण म्हणाले.

रवींद्र चव्हाण यांनी असं विधान करायला नको होते. लातूरची किंवा महाराष्ट्राची ही संस्कृती नाही. मी त्यांच्या विधानाचा निषेध करतो, असं अमित देशमुख यांनी म्हटले आहे. तर, दुसरीकडे जनतेच्या मनातील नेत्याचं नाव कुणीही पुसू शकत नाही, असे अभिनेता रितेश देशमुख म्हणाले. तर, काँग्रेसने याप्रकरणी संताप व्यक्त केला. चव्हाण यांनी याप्रकरणी माफी मागावी, अशी मागणी काँग्रेसने केली.

## प्रभारी कारभारामुळे शिक्षणाची वाताहत

आवश्यक तेवढे लक्ष देता येत नाही. परिणामी, सध्याच्या परिस्थितीत एका शिक्षकावर तब्बल सत्तर विद्यार्थ्यांना शिकवण्याची जबाबदारी येऊन पडली आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर विपरीत परिणाम होत आहे.

मुख्याध्यापक नसल्याने 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या महत्त्वाच्या व स्पर्धात्मक अभियानाची अंमलबजावणीही शाळेत होत नाही. या अभियानांतर्गत शाळांचा भौतिक दर्जा सुधारण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करण्यावर भर दिला जातो. जिल्हा व राज्य पातळीवर विजेत्या शाळांना मोठी रोख बक्षिसे दिली जातात; मात्र मुख्याध्यापक नसल्यामुळे दिघी शाळा या संधीपासून वंचित राहिली आहे.

तसेच मूल्यांकन, महावाचन अभियान, शालेय प्रशासन व नियोजन, शैक्षणिक पर्यवेक्षण, शालेय पोषण आहारात ताज्या पालेभाज्यांचा समावेश करण्यासाठी परसबाग उपक्रम, तसेच विद्यार्थ्यांच्या तक्रारींसाठी 'सखी सावित्री समिती' किंवा तक्रारपेटी यांसारख्या उपक्रमांची अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र आहे. हे सर्व उपक्रम राबवणे, ही मुख्याध्यापकांची प्रशासकीय जबाबदारी असते.

सात वर्षांपासून मुख्याध्यापक पद रिक्त राहिल्यामुळे केवळ शाळेचेच नव्हे तर, विद्यार्थ्यांच्या भविष्याचेही मोठे नुकसान होत आहे. संबंधित प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कायमस्वरूपी मुख्याध्यापकाची नियुक्ती करावी, अशी मागणी पालक व ग्रामस्थांकडून होत आहे.

## मत्स्यविभागातील संगनमत उघड

'मी छत्रपती' अशी उपमा दिल्याचा प्रकार केवळ अहंकाराचे प्रदर्शन नसून, संपूर्ण लोकशाही प्रशासकीय व्यवस्थेची थट्टा असल्याची टीका नाखवा यांनी केली. लोकशाहीत अधिकारी हे कायद्याचे सेवक असतात, राजे नव्हेत, असा घणाघाती टोला त्यांनी लगावला.

प्रादेशिक आयुक्तांच्या बाबतीत तर परिस्थिती अधिक गंभीर असल्याचे नाखवा यांनी पत्रात स्पष्ट केले आहे. पूर्वी रत्नागिरी येथे एलईडी लाईट बोट सोडून दिल्याच्या प्रकरणात ज्यांच्यावर निलंबनाची वेळ आली होती, तेच अधिकारी आज एलईडी मासेमारीविरोधात नैतिकतेचा झेंडा घेऊन पुढे येत असल्याचे चित्र हास्यास्पद आणि संतापजनक असल्याचा आरोप त्यांनी उपस्थित केला आहे.

मुंबईतील परवाना अधिकाऱ्यांविषयीची सविस्तर माहिती व आकडेवारी मत्स्यव्यवसाय आयुक्तांकडे तसेच मुंबई शहराचे सहाय्यक आयुक्त अविनाश नाखवा यांच्याकडे देऊनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. उलट, गैरप्रकार उघड करणाऱ्या मच्छिमारांनाच धमक्या, दबाव आणि दमदाटीला सामोरे जावे लागत असल्याचे वास्तव अधिक धक्कादायक असल्याचे नाखवा यांनी अधोरेखित केले.

या संपूर्ण प्रकारावरुन मत्स्य विभागातील कारवाई ही निवडक, राजकीय सोयीची आणि मच्छिमारांना भयभीत करण्यासाठीच असल्याचा आरोप अधिक तीव्र झाला आहे. काँग्रेस पक्ष आधुनिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांच्या विरोधात आहे, हा अपप्रचार पूर्णपणे चुकीचा असल्याचे स्पष्ट करत नाखवा म्हणाले की, पारंपरिक मच्छिमारांप्रमाणेच आधुनिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या सर्व मच्छिमारांच्या हक्कांसाठी काँग्रेस ठामपणे उभी आहे.

किती दिवस दबाव, भीती आणि धमक्यांच्या जोरावर मच्छिमारांचा आवाज दाबला जाणार? असा सवाल उपस्थित करत नाखवा यांनी स्पष्ट केले की, आता काँग्रेसचे पदाधिकारी थेट केंद्र सरकारकडे जाऊन पर्ससीन नेट व एलईडी लाईट मासेमारीबाबतची वस्तुस्थिती मांडणार आहेत. कोणतीही कारवाई झाली तरी मच्छिमारांना न्याय मिळेपर्यंत ही लढाई थांबवली जाणार नाही, असा ठाम इशाराही त्यांनी दिला.

मच्छिमारांनाही सन्मानाने मासेमारी करून आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याचा तितकाच अधिकार आहे, जितका देशाच्या विकासासाठी विविध प्रकल्प राबविण्याचा अधिकार शासनाला आहे, असे सांगत त्यांनी प्रशासनाच्या दुटप्पी धोरणावर जोरदार टीका केली. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मंत्र्यांकडून वारंवार भूमिका बदलणे स्वीकारले जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. या खळबळजनक आरोपांमुळे मत्स्यव्यवसाय विभागातील कारभार, अंतर्गत संगनमत आणि मच्छिमारांच्या भवितव्याबाबत पुन्हा एकदा तीव्र चर्चा सुरू झाली असून, राज्य सरकार व विभाग यावर कोणती भूमिका घेतात, याकडे संपूर्ण मच्छिमार समाजाचे लक्ष लागले आहे.

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ॲक्शन मोडवर

नितांत गरज आहे. त्यासाठी शाळा व महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रम, पथनाट्य, पोस्टर स्पर्धा, निबंध लेखन, व्याख्याने व संवादात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या माध्यमातून विद्यार्थी व युवकांपर्यंत ड्रग्जचे दुष्परिणाम, संबंधित कायदे व प्रतिबंधात्मक उपाय प्रभावीपणे पोहोचविले जाणार आहेत.

राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून दि. ५ ते १२ जानेवारी या कालावधीत 'डॉन योजना' (Drug Awareness and Wellness for a Drug Free India) अंतर्गत विशेष ड्रग्जविरोधी जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या कालावधीत युवक-केंद्रीत कार्यक्रमांवर विशेष भर देण्यात येणार असून, शाळा-महाविद्यालये, सार्वजनिक ठिकाणे व संवेदनशील भागांमध्ये प्रतिज्ञा कार्यक्रम, कायदेशीर मार्गदर्शन शिबिरे, पोस्टर-बॅनर प्रदर्शन, पथनाट्य तसेच जनसंवाद उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. सध्याच्या पिढीमध्ये अमली पदार्थांचे वाढते प्रमाण ही अत्यंत चिंताजनक बाब असून, योग्य वेळी जनजागृती करणे व पोलिसांच्या माध्यमातून सातत्याने आढावा घेणे आणि प्रतिबंधात्मक कारवाई करणे तितकेच महत्त्वाचे असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

या मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी विधी स्वयंसेवक (PLV), पोलीस प्रशासन, शैक्षणिक संस्था व सामाजिक संघटनांचे सहकार्य घेण्यात येत आहे. या बैठकीस रायगड जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांचे प्रतिनिधी, पोलीस अधीक्षक, शिक्षणाधिकारी (महाविद्यालय विभाग) तसेच विविध संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

ड्रग्जमुक्त, सुदृढ आणि सुरक्षित रायगड घडविण्यासाठी सर्व नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे करण्यात आले.


### जाहीर नोटीस

सदर जाहीर नोटीसद्वारे समस्त जनतेस कळविण्यात येत आहे की, मौजे चौल, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, येथील गट क्र. १९७८ / २ ( भुमापन क्र . व उपविभाग), एकुण क्षेत्र ०.१८.६० हे. आर, आकार रू. पै.४.३१ ची जिरायत जमीन मिळकत सध्याचे मालक श्री. सचिन बबन पाटील यांजकडुन अदिती बाळासाहेब वाळुंज यांस विकत घ्यावयाची आहे.

तरी वरील जमीनीवर कोणाचा हक्क, दावा, हितसंबंध, वसुली येणे किंवा इतर कुठल्याही प्रकाराने कुठलाही अधिकार असल्यास तसेच, वरील जमीनीच्या विकी व्यवहारास कोणाचा आक्षेप असल्यास योग्य त्या लेखी पुराव्यांसह खालील व्यक्तीस ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या १५ दिवसांचे आत संपर्क साधावा. हया मुदतीत कोणाचाही लेखी पुराव्यांसह आक्षेप न आल्यास सदरील मिळकत निर्वेध, निर्विवाद आहे असे समजुन जमीनीचा वरीलप्रमाणे विकी व्यवहार पूर्ण करण्यात येईल आणि त्यानंतर आलेली कुठलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद असावी.

ॲड. रोहिणी प्र. तांबे, पी- १४०४, श्रुष्टी हाईट्स, मयुरेश श्रुष्टी कॉम्प्लेक्स, एल. बी. एस. मार्ग, भांडुप (प.), मुंबई ४०००७८, मो. क्र. ९३२१६९९२८५.
ठिकाण - अलिबाग, रायगड.
दिनांक : ०७/०१/२०२६

स्वाक्षरी
**ॲड. रोहिणी प्र. तांबे**



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे सावळे, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ मी | आकार रुपये | पैसे |
|---|---|---|---|---|---|
| श्री.रमेश हरिश्चंद्र माळी | ३ | ५ | ०-११-२० | ०-९७ | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं.४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालयाशेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- ०७/०१/२०२६
मो. नं. ९०२८९८२२७७
ई मेल:- adv.jayeshmhase@gmail.com



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे सावळे, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ मी | आकार रुपये | पैसे |
|---|---|---|---|---|---|
| श्री.रमेश हरिश्चंद्र माळी | ३ | २ | ०-३३-८० | ०-३३ | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं.४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालयाशेजारी, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- ०७/०१/२०२६
मो. नं. ९०२८९८२२७७
ई मेल:- adv.jayeshmhase@gmail.com



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मुळ जमिन मालक १) काशिनाथ महादु जांभळे २) मथुरा काशिनाथ जांभळे यांच्या सामाईक मालकीची, ताबेकब्जातील आणि वहिवाटीतील मौजे आसरे, तालुका खालापूर, जिल्हा रायगड येथील गट क्रमांक व उपविभाग ३/१/२/३/४/अ, एकूण क्षेत्र ०-३५-६० (हे आर-पॉ) या वर्णनाची मिळकत ही आमचे आशिलांनी वर नमूद मिळकतीचे मुळ जमिन मालक/भोगवटादार यांच्याकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे निश्चित केलेले आहे. तरी सदरहु मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त करण्यापूर्वी आमचे अशिलांनी सदर मिळकतीमधील संबंधीत मुळ मालक / भोगवटाधारकांचे असलेले मालकी हक्क तपासण्याकरीता आमचे अशिलांचे वतीने सदरची जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

तरी वर नमूद मिळकत वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क- हितसंबंध, कुळवहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विशद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून तसा टायटल रिपोर्ट देण्यात येईल तसेच सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर वर नमूद मिळकती नोंदणीकृत खरेदीखताद्वारे हस्तांतरीत करुन घेतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**Adv. SAMEER S. MHATRE**
Mob: 9821657456
B.Sc., LLB. ADVOCATE
ADD: 102, SHREE BALAJI CO.H.S,
PLOT NO. 98/A/2, SWAMI NITYANAND
MARG, NEAR SARSWAT BANK,
PANVEL, DIST.- RAIGAD, 410 206



### जाहिर नोटीस

ने. ता. २८/०१/२०२६

**माणगांव येथील मे दिवाणी व स्तर न्यायाधिश सो. यांचे कोर्टात.**

दि.चौ.अर्ज ९८/२०२५

१) श्री.रमेश भागोजी येलकर वै.१ — अर्जदार

विरूद्ध

कोणीही नाही

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

अर्जदार हे मौजे : रा.मु. इंदापुर, पो. तळाशेत, ता.माणगांव, जि.रायगड येथील कायमचे रहिवाशी आहेत.

अर्जदार यांचा मुलगा दिनांक : २०/१०/२०२४ (वीस दहा दोनह जार चोवीस) रोजी मयत झाले आहेत. त्यामुळे अर्जदार हे कै. रूपेश रमेश येलकर यांना कायदेशीर वारस असुन अन्य कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कार्यालयात वारस नोंद करणेसाठी व बँकेतील गहाण वस्तु सोडविणेसाठी वारस दाखला आवश्यक आहे.

अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १९२७ प्रमाणे वारस म्हणुन घोषित करणेत यावे व तसा वारस दाखला मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यामुळे सदर अर्जास कोणाचीही हरकत अगर अडथळा असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०१ महिन्याचे आत या कोर्टात हजर होऊन हरकती कळवाव्या आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु अर्जदार याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेउन त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहु मयत कै. रूपेश रमेश येलकर यांचे वारस असल्याबाबतचा वारस दाखला देणेत येईल. कळावे.

माणगांव
दि. २५/११/२०२५

**सह-अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क-स्तर**
**माणगांव - रायगड**



### जाहीर सुचना

सर्व नागरीकांना याद्वारे जाहीरपणे सुचित कारण्यात येते की, श्री. उदय दत्तात्रेय पाटकर आणि / किंवा त्यांचे कुटुंबीय आणि/किंवा त्यांचे नामनिर्देशित व्यक्ती यांनी : १) श्री. जगदीश शंकर लबडे, २) श्री. राकेश गणेश दुर्गे, ३) श्री. सोपन शालीक पाटील, यांचे खालील अनुसूचीत वर्णन केलेल्या मालमत्तेतील हक्क, मालकी व स्वारस्य तसेच सदर मालमत्तेतील श्रीमती. किरण अमित मागिया यांचे हक्क विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मालमत्तेचे वर्णन पुढील प्रमाणे:

**यात यावर संदर्भित केलेले परिशिष्ट**
**(सदर मालमत्तेचे वर्णन)**

मौजे पोसरी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील खालील सारणीमध्ये अधिक तपशीलवारपणे वर्णन केलेल्या जमिनीचे ते सर्व तुकडे आणि भाग:

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ (हे-आर-चौ-मी) शेती | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ५६ | २ | ०-६२-०० | ०.६५ |

मालमत्तेच्या संबंधातील किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील कोणतीही विक्री, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, बक्षिस, मृत्युपत्रीत देणगी, न्यास, वारस, अन्य कोणतीही भाडेदारी, पोट-भाडेदारी, संमति नि परवानगी, काळजीवाहू तत्व, भोगवटा, कब्जा, कुटुंब व्यवस्था/ तडजोड, एफएसआय/टीडीआर वापर, विकास अधिकार, भागिदारी, शेअर, प्रतिज्ञा, मार्गाधिकार, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश, करार/करारनामे, भार, प्रलंबित वाद आणि/किंवा कोणतेही दायित्व आणि/किंवा लिखित आणि/किंवा कोणतीही व्यवस्था, आणि/किंवा कोणतीही बांधिलकी किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही अधिकार, हक्क, हितसंबंध, शेअर, दावा, धारणाधिकार, प्रतिभूती, हितसंबंध, वापराधिकार किंवा मागणी असणाऱ्या सर्व व्यक्तींनी/संस्थांनी तसेच अन्य गोष्टींबरोबर एखादे व्यक्तिगत निकाय, प्रस्थापित किंवा अ - प्रस्थापित, ऋणको, धनको आणि/ किंवा एखादे प्राधिकरण इत्यादींनी निम्नस्वाक्षरीकर्ता यांना या जाहिरातीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत अशा कोणत्याही अधिकार किंवा दाव्यास पाठींबा देणाऱ्या दस्ताऐवजासह लेखी स्वरूपात सूचित करणे आवश्यक आहे. अन्यथा अशा प्रकारचा दावा, जर काही असेल तर, त्यांचा अधित्याग किंवा परित्याग करण्यात आलेला आहे किंवा ते अस्तित्वात नाहीत, असे समजण्यात येईल. कळावे

दिनांक : ७/०१/२०२६

अशिलातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. हिरामण जनार्दन गायकवाड**
ऑफीस पत्ता गल नं १, गणेश अर्पा.
युको बँक शेजारी कर्जत तालुका कर्जत, जिल्हा रायगड
८९७६३७५५७०



**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय**
काँग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र. जिउनि/गृह/मोफा क.११/मा. अभि./जाहीर नोटीस/५/सन २०२६ — दिनांक :- ०५/०१/२०२६

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस

अर्जदार संस्था सुशिला सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., सर्व्हे नं. ८ अ-१, भूखंड क्र. ३, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड, तर्फे सचिव श्री महेंद्र गंगाराम कांबळे यांनी आदित्य बिल्डर्स तर्फे प्रो.पा. निशिकांत जगन्नाथ जाधव, विकासक, रा. राजदिप, राम मारुती रोड, ठाणे - ४००६०, संजय श्रीधर धायबर, रा. कोतवाल नगर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड, राजेंद्र श्रीधर धायबर, रा.हायल्यांड रेसिडेन्सी,बी नं.१४, ब्लॉक नं. ५०४, ढोकळी, ठाणे - ४००६०६, कल्पना श्रीधर धायबर, रा. म्हाडा कॉलनी कर्जत, ता. कर्जत, जि.रायगड- ४१०२०१, श्रीमती साधना विलास गायकवाड, रा. अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड, श्रीमती श्रद्धा नितीन ठमाले, रा. संगम भुवन, रूम नं. ४, पहिला मजला, महमद अली रोड, ठाणे - ४००६०३ यांचे विरुध्द महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११(३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

कर्जत, ता. कर्जत, जि.रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग - ८/१/अ/३, क्षेत्र ५१३.०० चौ.मी., अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. प्रतिवादी आदित्य बिल्डर्स तर्फे प्रो. पा. निशिकांत जगन्नाथ जाधव यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतिम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावित कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक २२/०१/२०२६ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०५.०१.२०२६

सही/-
(त.सं.पाटील)
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, रायगड अलिबाग

## निवडक



### नेरळ रेल्वे फाटक चार दिवस बंद

**नेरळ :** गावात असलेले रेल्वे फाटक दुरुस्तीच्या कामासाठी चार दिवस बंद ठेवले जाणार आहे. या फाटकातील रेल्वे मार्गिकेतील खडी खचल्याने तेथे रस्ता ओलांडत असलेल्या ठिकाणी वाहने अडकून पडत आहेत. त्याचवेळी वाहनाची होणारी कोंडी ही प्रामुख्याने त्या भागातील रस्त्याची दुरवस्था देखील कारणीभूत ठरत आहे. त्यामुळे नेरळ रेल्वे फाटक क्रमांक २१ तांत्रिक कामासाठी सलग चार दिवस बंद ठेवण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. हे फाटक दि.६ जानेवारी रोजी रात्री १० वाजेपासून ते ९ जानेवारी सकाळी आठ वाजेपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद राहणार आहे. मात्र, रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयामुळे स्थानिक नागरिकांमध्ये आणि वाहनचालकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, वाहतुकीचा खोळंबा आणि पर्यायी रस्त्यांची स्थिती अत्यंत बिकट आहे. वाहनचालकांना आता दामत रेल्वे फाटक ते आंबिवली रेल्वे फाटक असा वळसा घालून प्रवास करावा लागणार आहे. विशेष म्हणजे, या पर्यायी मार्गांवर सध्या रस्त्यांची कामे सुरू असल्याने मोठी वाहतूक कोंडी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. तसेच, वारंवार रेल्वे फाटकात होणारे तांत्रिक बिघाड आणि आता थेट चार दिवस बंद असल्यामुळे नेरळकरांच्या सहनशीलतेचा अंत होत आहे. रेल्वे प्रशासनाने हे काम लवकरात लवकर पूर्ण करावे आणि रखडलेल्या उड्डाणपुलाबाबत ठोस पावले उचलावीत, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.



### माणगावात पत्रकार दिन उत्साहात

**माणगाव :** तालुका पत्रकार संघातर्फे पत्रकार दिन मोठ्या उत्साहात व विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. यावर्षीही तालुका पत्रकार संघातर्फे उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे मंगळवारी (दि.६) पत्रकार दिनानिमित्त औषध व फळवाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हे वाटप सरपंच दिपक जाधव, मंगेश पोळेकर, उपजिल्हा रुग्णालयाचे वैधकीय अधिकारी डॉ. महेश मेथा, डॉ.दिपक देशमुख, सिराज परदेशी, संगीता बक्कम, रचना थोरे, ममता थोरे, अजित तारलेकर, शर्मिला सत्वे, राकेश पडवळ, अरुण पवार, रणधीर कनोजे, सिद्धेश सत्वे, तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सलीम शेख, कार्याध्यक्ष मजिद हाजिते, उपाध्यक्ष प्रभाकर मसुरे, सचिन देसाई, संतोष गायकवाड, सिद्धी दाखिणकर, रुग्णालयाच्या परिचारिका व कर्मचारी आदींच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. महेश मेथा तसेच प्रमुख अतिथी सरपंच दिपक जाधव यांनी पत्रकार संघाच्या कार्याचा गौरव करीत पत्रकारांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. सुरुवातीला माणगाव तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष प्रभाकर मसुरे यांनी पत्रकार संघाच्या गेल्या नऊ वर्षांच्या काळातील कार्यक्रमांचा सविस्तर आढावा घेत उपस्थित सर्व मान्यवर व पत्रकार यांना पत्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माणगाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सलीम शेख यांच्या मार्गदर्शनाखाली मजिद हाजिते, प्रभाकर मसुरे, आजेश नाडकर, सचिन देसाई, संतोष गायकवाड, सिद्धी दाखिणकर आदींसह संघटनेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी विशेष सहकार्य करीत परिश्रम घेऊन पत्रकार दिन मोठ्या उत्साहात साजरा केला.

### नाका कामगारांना सुगीचे दिवस

**पनवेल :** महापालिकेची सार्वत्रिक निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असताना विविध पक्षांना आता कार्यकर्त्यांची नितांत गरज भासू लागली आहे. वारंवार कार्यकर्तेही सहज उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे नाका कामगारांकडेच आता राजकीय पक्षांचा मोर्चा वळलेला आहे. त्यामुळे नाका कामगारांना निवडणूक होईपर्यंत दररोज कामाची खात्री आता मिळू लागली आहे. नाका कामगारांमुळे गर्दी जमवणे सहज शक्य विविध राजकीय पक्षांना होत आहे. सद्यस्थितीत निवडणुकीचा हंगाम आणि रणधुमाळी असल्याने राजकीय पशांना काढण्यात येणाऱ्या प्रचार फेरीत सहभागी करून गर्दीचा उच्चांक दाखवण्यासाठी नाका कामगार सहाय्य मिळत आहे. या नाका कामगारांचे काही मुकादम आहेत. त्यांच्याकडे शंभर-दीडशे नाका कामगार सहज उपलब्ध होतात. त्यामुळे नाका कामगारांसमोर मुकादमांनाही सुगीचे दिवस आले आहेत.

# पालिका उमेदवारांची प्रचारात 'आघाडी'

## मविआचे पारडे जड; भाजपवर नाराजी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचे बिगुल वाजले असून पालिकेतील प्रभाग क्रमांक १, २ आणि ३ मध्ये शेकाप व महाविकास आघाडीतील उमेदवारांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. पालिकेच्या पहिल्याच निवडणुकीत आघाडीचे सर्वाधिक उमेदवार निवडून आले होते. तर, त्यानंतर झालेल्या खासदारकी, आमदारकीच्या निवडणुकीत या तीनही प्रभागातील जास्तीत जास्त मतदारांनी आघाडीच्या उमेदवारांच्या पारड्यात आपली मतं टाकली असल्याने या वेळच्या पालिका निवडणुकीत आपल्या उमेदवारांना चांगले यश मिळेल, अशी आशा महाविकास आघाडीच्या नेत्यांना आहे. तसेच, या प्रभागात भाजपच्या कार्यावर सर्वसामान्यांची नाराजी आहे.



त्याचा फायदा देखील मविआला होणार असल्याची चर्चा आहे.

पनवेल पालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. १, २ आणि ३ मध्ये मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागाचा समावेश आहे. या भागातील मतदारांनी विधानसभेत आ. प्रशांत ठाकूर यांना नाकारल्याचे गणित मतदानाच्या आकेडवारीपासून स्पष्ट झाले होते. त्यामुळे शहरी भागातून जागावाटपाबाबत महाविकास आघाडीत चर्चा ताणल्या गेल्या नाहीत. भाजपकडे मात्र युती असूनही या भागात उमेदवारांची वाणवा असल्याचे चित्र होते. त्यामुळे या भागातील लढाई महाविकास आघाडीसाठी सोपी असल्याचे बोलले जात आहे.

तसेच, या क्षेत्रात सर्वाधिक ग्रामीण भाग असून येथे शेतकरी कामगार पक्षाचे चांगले वर्चस्व आहे. त्यामुळेच महापालिकेच्या पहिल्या निवडणूकीत या भागातून शेकापचे सर्वाधिक उमेदवार निवडून आले होते. या प्रभागात तळोजा मजकूर, घोट, कोयनावेळे, पेंधर, नागझरी, घोट, पेंधर, नागझरी, चाळ, तोंडरे, देवीचापाडा, ढोंगऱ्याचा पाडा, पालेबुद्रुक, पडघे, नावडे, पेठाली, तळोजा, खुटारी, पापडीचा पाडा, पेठ, रांजणपाडा, ओवे, ओवेकँम्प, धोमोळे, तळोजा, धानसर, किरवली, धरणे, धरणाकँम्प, रोहींजण, पिसार्वे, तुर्भे, करवले ही गावे येतात. याशिवाय तळोजात नव्याने वसलेली सिडको वसाहतीमुळे अल्पउत्पन्न गटातील अनेक कुटूंब नव्याने स्थलांतरीत झालेली आहेत. दरम्यान, भाजप सत्ताधाऱ्यांच्या दाव्याला अपयश आल्याने स्थानिक मतदारांची त्यांच्यावर प्रचंड नाराजी आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील स्थानिक नागरिक आणि तळोजा सारख्या मुस्लिमबहुल गावांतील मतदारांनी भाजपाला नाकारलेले आहे.

### भाजपवरील नाराजीचा मिळणार फायदा

शेकापचे मा.आ. बाळाराम पाटील आणि शिवसेनेच्या (उद्धव ठाकरे) उमेदवारांना मिळालेली मते एकत्र केल्यास मविआचा विजय होईल, अशी स्थिती आहे. भाजपने देखील जनसंपर्कापेक्षा आर्थिकदृष्ट्या सक्षम उमेदवार देऊन मविआशी स्पर्धा सुरू केली आहे. मात्र, गावे स्मार्ट करण्याचा भाजपा सत्ताधाऱ्यांचा दाव्याला अपयश आले आहे. गावातील रस्ते कॉंक्रीटीकरण व गटारे इत्यादी कामे रखडल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी आहे. त्यामुळे या भागात महाविकास आघाडीला भाजपवरील नाराजीचा फायदा अधिक होऊ शकतो, असे बोलले जात आहे.

### मतदारांचा पंजाला भरगोस प्रतिसाद

महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ३ मध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार हरेश केणी, तुषार पाटील, प्रगती पाटील आणि लीला कातकरी हे सर्व हाताचा पंजा निशाणी घेऊन निवडणुकीला सामोरे जात आहेत. त्यांनी आपल्या प्रचारामध्ये आघाडी घेतली असून त्यांना मतदारांचा भरघोस असा प्रतिसाद मिळत आहे. यावेळी महानगरपालिकेसाठी शेकाप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, समाजवादी, शिवसेना ठाकरे गट, मनसे आणि इतर घटक पक्षाचे कार्यकर्ते ही आपलीच निवडणूक आहे असे समजून जोमाने काम करत आहेत.

# कळंबोलीच्या विकासासाठी कसली कंबर

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचे बिगुल वाजले असून प्रभाग क्रमांक ८ 'क'मधून महाविकास आघाडीच्या उमेदवार रश्मी कदम यांनी जोरदार मुसंडी मारली आहे. वाणिज्य शाखेच्या पदवीधर असलेल्या रश्मी कदम यांच्या पाठीशी त्यांचे पती आणि खंबीर राजकीय नेतृत्व राजेश कदम यांची मोठी ताकद उभी राहिली असून, या दाम्पत्याने कळंबोलीच्या विकासासाठी कंबर कसली आहे.

रश्मी कदम या वाणिज्य शाखेच्या पदवीधर असल्याने त्यांना आर्थिक नियोजन आणि



प्रशासनाची चांगली समज आहे. त्यांना राजेश कदम यांच्या दांडग्या जनसंपर्काची जोड मिळाल्याने प्रभाग ८ 'क'मध्ये मविआचे पारडे जड झाले आहे. कळंबोलीतील प्रश्नांची जाण असलेले राजेश कदम गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. त्यांच्या अनुभवाचा आणि रश्मी कदम यांच्या उच्च शिक्षणाचा फायदा प्रभागाच्या विकासासाठी होईल, असा विश्वास मतदारांमध्ये निर्माण झाला आहे. प्रशासकीय कामांचा पाठपुरावा आणि जनतेच्या हक्कासाठी लढा ही आमची परंपरा आहे आणि ती आम्ही यापुढेही जोमाने चालवू, असे आश्वासन राजेश कदम यांनी प्रचारादरम्यान दिले आहे.

प्रचाराच्या केंद्रस्थानी मालमत्ता कराचा विषय असून, वाढीव कराच्या ओझ्यातून कळंबोलीकरांना मुक्त करण्यासाठी रश्मी आणि राजेश कदम आग्रही आहेत. त्याचप्रमाणे, मा.आ. बाळाराम पाटील यांनी जिल्हा परिषद अध्यक्ष असताना कळंबोलीत जी भरीव कामे केली, त्याचे श्रेय घेणाऱ्या विरोधकांवर त्यांनी सडकून टीका केली. ज्या कंत्राटदारांनी बाळाराम पाटलांच्या काळात कामे केली, तेच आज विरोधकांच्या तालावर नाचून स्वतः कडे श्रेय घेत आहेत. हा दुटप्पीपणा कळंबोलीकर सहन करणार नाहीत, अशा शब्दांत कदम दाम्पत्याने विरोधकांना लक्ष्य केले. तसेच, कळंबोलीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्याचे स्वप्न रश्मी आणि राजेश कदम यांनी उराशी बाळगले आहे.

# दिलीप कदम यांच्या प्रचाराला वेग

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचे बिगुल वाजल्यापासून प्रभाग क्रमांक १८ मध्ये शेकाप व महाविकास आघाडीने आपली पूर्ण ताकद पणाला लावली आहे. शेकाप व महाविकास आघाडीचे उमेदवार दिलीप कदम यांच्या प्रचाराला सुरुवात झाली असून प्रचाराने वेग घेतला असल्याचे दिसून येत आहे. त्यांना मतदारांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.

नागरिकांच्या अडीअडचणींना धावून जाणारे नेतृत्व म्हणून दिलीप शंकरराव कदम यांची प्रभागात ओळख आहे. प्रभागातील समस्या सोडवण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांच्या संघटित ताकतीमुळे आणि कार्यकर्त्यांच्या मोठ्या फौजेमुळे प्रभाग क्रमांक १८ मध्ये दिलीप शंकरराव कदम यांचे पारडे जड दिसत आहे. विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक लढवत असलेले दिलीप कदम हे या निवडणुकीत विजय संपादन करतील असा विश्वास पदाधिकारी, मतदार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. या प्रचारादरम्यान दिलीप कदम यांचे मतदारांनी मनापासून स्वागत केले आणि विजयी होण्यासाठी आशीर्वाद दिले.

# आंब्याच्या बागा मोहोरांनी नटल्या

**। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।**

पौषमहिन्याच्या सुरुवातीलाच आंब्याच्या झाडांवर मोहोर फुटू लागल्याने शेतशिवारात आनंदाची लहर उसळली आहे. ग्रामीण भागातील अंबराई तसेच बांधांवर उभ्या असलेल्या संकरीत आणि गावरान आंब्याच्या झाडांवर प्रचंड प्रमाणात फुलोरा लागला आहे. झाडांच्या फांद्या मोहोरांनी अक्षरशः लदबदून गेल्या असून, हे नजारे पाहताच यंदाचे नैसर्गिक हवामान आंबा उत्पादनासाठी अनुकूल असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे येत्या उन्हाळ्यात रसाळ आंब्यांचा भरपूर आस्वाद घेता येईल, अशी उत्सुकता शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे.

महात्मा जोतिराव फुले श्रमजीवी जनता रोजगार हमी योजनेअंतर्गत मिळालेल्या अनुदानाने गेल्या काही वर्षांत अनेक शेतकऱ्यांनी केशर, अल्फोंसो, दशहरी, पेटारकुंचा यांसारख्या सुधारित वाणांची सलग क्षेत्रीय लागवड केली आहे. ही झाडे आता फळधारणेच्या टप्प्यात येत आहेत. 'कमी पाणी, कमी खत व कमी खर्चात चांगले उत्पादन मिळते, त्यामुळे आर्थिक स्थिती सुधारेल, असे मत शेतकरी देवव्रत पाटील यांनी व्यक्त केले.

# पेण, रोहा येथील बचत गटांतील महिलांचा मेळावा

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील बरडा वाडी येथे साकव ग्रामविकास संस्था व अनामिका महिला महासंघाच्यावतीने शनिवारी (दि.३) सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त पेण व रोहा तालुक्यातील बचत गटांतील महिलांचा भव्य मेळावा घेण्यात आला. हा मेळावा जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या मेळाव्याला सर्व स्तरातील महिला मोठ्या संख्येने हजर होत्या.

यावेळी किशन जावळे यांनी सांगितले की, सावित्रीबाई फुले यांच्या विचारांना चालना देणे व त्यातनूच महिलांना पुढे येण्याची संधी प्राप्त




होणे ही आजच्या काळाची गरज आहे. मी सर्व सामान्यांना केंद्रबिंदू मानून त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी दर आठवड्याला दोन गाव वाड्यातील सरपंच, महिला, युवा, शेतकरी व सर्वसामान्यांची व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारा संपर्क साधतो व त्यांच्या समस्या जाणनू घेऊन त्या सोडविण्याचा प्रयत्न करतो. ते पुढे म्हणाले की, रायगड जिल्ह्यात शेतीचे प्रमाण कमी असले तरी ही शेती नाविन्यपूर्ण करणे गरजेचे आहे. आदिवासींना प्राप्त झालेल्या वन जमिनीत भाजी मळे करून उपजीविका वाढीचा प्रयत्न केला पाहिजे. नुकताच काही ठिकाणी आवदवासींना होड्या दिल्या आहेत. यावर ते आपली उपजीविका करतात. रायगड जिल्ह्याच्या जवळ मुंबई बाजारपेठ आहे. त्यामुळे बचत गटातील महिला कोकण रेल्वेमध्ये आपला माल विक्री करीत आहेत. त्याप्रमाणे त्यांनी आपली क्षमता वाढविली पाहिजे, असे सांगताना त्यांनी साकवच्या कार्याची स्तुती केली.

या कार्यक्रमाला जिल्हिाधिकारी यांच्यासह पेणचे तहसीलदार तानाजी शेजाळ, गटविकास अधिकारी गजानन लेंडी, डॉ. निशिगंधा पोळ, अश्विनी गलांडे, साकव संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग तुरे, कृषी अधिकारी व इतर मान्यवर तसेच मोठ्या संख्येने आदिवासी उपस्थित होते.

# युवा आपदा मित्र शिबिराचे आयोजन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग येथील जनता शिक्षण मंडळ महाविद्यालयात 'युवा आपदा मित्र स्कीम' अंतर्गत दि.२ ते ८ जानेवारी या कालावधीत ८ दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचा मुख्य उद्देश नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींच्या वेळी तातडीने मदत आणि बचाव कार्य करण्यासाठी एनसीसी उमेदवारांना तयार करणे हा आहे. ६ महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे कमांडिंग ऑफिसर कर्नल नीतीश पटियाल यांच्या कुशल नेतृत्व आणि मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराचे ॲडज्युटंट



कॅप्टन मोहसीन खान यांनी या शिबिराच्या यशस्वी संचालनात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी शिबिराच्या संपूर्ण व्यवस्थापनाच्या जबाबदारीसह उमेदवारांची शिस्त आणि प्रशिक्षणाची रूपरेषा देखील तयार केली. या शिबिरात एकूण १५० उमेदवारांनी सहभाग घेतला आहे.

या शिबिरादरम्यान उमेदवारांना जमिनी स्तरावर प्रशिक्षण देण्याची जबाबदारी सुभेदार मेजर अमरबीर सिंह यांनी चोखपणे पार पाडली. त्यांच्या नेतृत्वाखाली उमेदवारांनी विविध कठीण परिस्थितींना तोंड देण्याचा सराव केला. जिल्हाधिकारी कार्यालयाचे सागर पाठक यांनी आपत्ती व्यवस्थापनाची व्यवस्था अत्यंत योग्य आणि अर्थपूर्ण पद्धतीने केली. आपत्ती व्यवस्थापनातील तांत्रिक पैलू समजावून सांगण्यासाठी प्रमुख प्रशिक्षक म्हणून मनोहर म्हात्रे व प्रदीप कोंडेकर या तज्ज्ञांनी उमेदवारांना पूर, भूकंप, आग आणि प्रथमोपचार यांसारख्या विषयांवर व्यावहारिक ज्ञान दिले. जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी बोलताना, असे शिबीर तरुणांमध्ये समाजसेवा आणि सतर्कतेची भावना निर्माण करतात, असे सांगितले. तसेच, जेएसएम महाविद्यालयाच्या प्रा. प्रोफेसर सोनाली पाटील यांनी शिबिराच्या आयोजनासाठी महाविद्यालय परिसरात सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या आणि उमेदवारांचा उत्साह वाढवला.





# अध्यक्षपदी राजेंद्र पाटील यांची निवड

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या अध्यक्षपदी राजेंद्र पाटील यांची निवड करण्यात आली. नुकताच संपन्न झालेल्या पत्रकार दिन सोहळ्यामध्ये नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. मावळते अध्यक्ष मंदार दोंदे यांनी नूतन कार्यकारिणी जाहीर करून त्यांना आगामी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे सल्लागार तथा ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मंचाच्या सदस्यांनी पत्रकारितेत फोफावत असलेल्या अपप्रवृत्तींना जागीच ठेचण्याची शपथ घेतली. दर्पण या पहिल्या वृत्तपत्राचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी रोजी पहिला अंक प्रसिद्ध केला म्हणून दरवर्षी हा दिवस पत्रकार दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यावेळी त्यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.

**डिजिटल पेपरलेस शालेय बँक** | **मायणी कोयना शाळेचा अभिनव उपक्रम**

# विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल साक्षरता विकसित

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

**गागोदे बुद्रुक येथील मायनी कोयना केंद्राची रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांसाठी पूर्णपणे डिजिटल व पेपरलेस शालेय बँक हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. सध्या हा उपक्रम सर्वत्र कौतुकाचा विषय ठरत आहे. रायगड जिल्ह्यात प्रथमच अशा स्वरूपाची तंत्रस्नेही बँक शालेय स्तरावर कार्यान्वित करण्यात आली असून या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये बचतीची सवय, आर्थिक शिस्त व डिजिटल साक्षरता विकसित होत आहे.**

शालेय बँकेचे वैशिष्ट्य म्हणजे तिचे संपूर्ण कामकाज डिजिटल पद्धतीने चालते. या बँकेत शाखाधिकारी म्हणून इयत्ता सातवीतील विद्यार्थिनी आर्या




पवार ही जबाबदारी सांभाळत असून इतर विद्यार्थीही विविध जबाबदाऱ्या पार पाडत आहेत. विद्यार्थ्यांनी डिजिटल सुविधेद्वारे पैसे जमा केल्यानंतर पालकांच्या मोबाईलवर त्वरित संदेश जातो, तसेच एक लिंक पाठवली जाते. त्या लिंकद्वारे पालक घरबसल्या आपल्या पाल्याच्या खात्यात जमा झालेल्या रकमेची सविस्तर माहिती पाहू शकतात. त्याचबरोबर, एखाद्या खातेदार विद्यार्थ्याने बँकेतून कर्ज स्वरूपात रक्कम घेतल्यास, ज्या दिवशी परतफेड करायची आहे त्या दिवशी पालकांना आपोआप रिमाइंडर मेसेज पाठवला जातो. बँकेतील सर्व व्यवहारांची माहिती पीडीएफ स्वरूपात डाउनलोड करता येत असल्याने पारदर्शकता व विश्वासार्हता अधिक वाढली आहे.

या अभिनव उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये बचतीची आवड निर्माण झाली आहे. अनेक विद्यार्थी बाहेरचे आरोग्याला हानिकारक ठरणारे खाऊ न खाता ते पैसे बँकेत जमा करत असल्याने पालकांमध्येही समाधान व्यक्त केले जात आहे. आर्थिक व्यवहारांची समज, नियोजन, जबाबदारी आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण विद्यार्थ्यांना या बँकेमुळे मिळत आहे. हा उपक्रम तंत्रस्नेही शिक्षक रामकृष्ण भोईर यांच्या कल्पकतेतून साकार झाला आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे व शिक्षक अमित महागावकर व मंगेश पाटील यांच्या सहाय्याने शालेय स्तरावर डिजिटल बँकिंगसारखी संकल्पना यशस्वीपणे राबवली जात आहे. या उपक्रमाचे केंद्रप्रमुख दत्तात्रेय कोठेकर, शिक्षण विस्तार अधिकारी अरुणादेवी मोरे तसेच गटशिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे यांनी विशेष कौतुक केले आहे.

> **मायनी कोयना शाळेने राबवलेली डिजिटल पेपरलेस बँक ही काळाची गरज ओळखणारी आणि विद्यार्थ्यांना भविष्याच्या दिशेने नेणारी उपक्रमशील संकल्पना आहे. इतर शाळांसाठीही हा आदर्श ठरेल.**
> **– शर्मिला शेंडे, गटशिक्षणाधिकारी, पेण**

# विद्यामंदिरातर्फे प्लास्टिकमुक्तीचा संकल्प

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

निसर्गरम्य माथेरानच्या सौंदर्याला बाधा आणणाऱ्या प्लास्टिक प्रदूषणाविरोधात वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक विद्यामंदिरातील विद्यार्थ्यांनी कंबर कसली आहे. मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्याध्यापक दिलीप अहिरे यांच्या नेतृत्वाखाली शाळेच्यावतीन परिसरात स्वच्छता अभियान आणि प्लास्टिकमुक्ती उपक्रम अत्यंत उत्साहात राबविण्यात आला.




या मोहिमेअंतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी परिसरात साचलेला प्लास्टिक कचरा एकत्रित केला. विद्यार्थ्यांनी केवळ स्वच्छताच केली नाही, तर प्लास्टिकचा वापर टाळण्याबाबत परिसरातील नागरिक आणि पर्यटकांमध्ये जनजागृतीही केली. यावेळी गोळा करण्यात आलेल्या प्लास्टिक कचऱ्याचे वर्गीकरण करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी पालिकेच्या स्वच्छता विभागाकडे सुपूर्द करण्यात आले. या उपक्रमाबाबत बोलताना शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी सांगितले की, माथेरान हे पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र आहे. भावी पिढीमध्ये पर्यावरणाप्रति जाणीव निर्माण व्हावी आणि आपले शहर प्लास्टिकमुक्त व्हावे, या उद्देशाने आम्ही हे स्वच्छता अभियान राबवले आहे. प्लास्टिक मुक्ती आणि पर्यावरणाचे रक्षण हाच एकमेव उद्देश ठेऊन शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्वतः कचरा गोळा करून स्वच्छतेचा धडा दिला. या मोहिमेत शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

# बिनविरोधाचा तमाशा

काय वाट्टेल ते करून सत्ता आपल्या मुठीत ठेवण्यासाठी भाजप आणि शिंदेसेनावाले ज्या कसरती करीत आहेत त्या लाजिरवाण्या आहेत. सत्तेतल्या या बकासुरांची भूक दिवसेंदिवस वाढतच चालली असून जनता असहायपणे त्याकडे पाहत आहे. राज्यभरातील २९ महापालिकांमध्ये तब्बल ६८ नगरसेवक बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर झाल्याने या बकासुराची नवी लीला समोर आली आहे. विशेष म्हणजे बिनविरोध निवडून आलेले सर्व जण भाजप व शिंदे सेनेचे आहेत. त्यातही या दोघांच्यात स्पर्धा असून भाजपच्या ४४, शिंदेसेनेच्या २१ आणि अजितदादांच्या २ उमेदवारांची बिनविरोध निवड झाली आहे. एकूण २ हजार ८६९ जागांसाठी २४ हजार ७७१ अर्ज दाखल होते. त्यातल्या ८ हजारांना उपरती झाली व त्यांनी ते मागे घेतले. म्हणजे अजूनही प्रत्येक जागेवर सरासरी सात उमेदवार रिंगणात आहेत. पण ६८ जागा अशा आहेत की तिथे शेवटी एकच उमेदवार रिंगणात राहिला. हा चमत्कार या अजातशत्रूंनी कसा घडवला याबद्दल त्यांच्या विशेष मुलाखतीच घ्यायला हव्यात किंवा त्यांच्यावर सिनेमेच काढायला हवेत. एकीकडे निवडणूक लढण्यासाठी घराघरात भाऊ भावाच्या जिवावर उठलेला असताना ना गणाचा ना गोताचा अशा विरोधी उमेदवारांचे एकाएकी होत असलेले मनपरिवर्तन हा अद्‌भुतच प्रकार आहे. रामराज्यात रामासाठी लक्ष्मणाने वनवास पत्करला आणि भरताने पादुका सिंहासनावर ठेवून राज्यकारभार केला. ते रामराज्य आता देवाभाऊंच्या महाराष्ट्रात पुन्हा अवतरलेले दिसते. केवळ चारच दिवसांपूर्वी सर्व पक्षांमध्ये बंडखोरीच्या लाटा उसळल्या होत्या. त्यातही भाजपचे बंडखोर तर फारच घायकुतीला आले होते. संभाजीनगरमध्ये महिला इच्छुकांनी भाजपच्या नेत्यांच्या गाड्या अडवून शिवीगाळ केली व दोन दिवस आंदोलने केली. नाशिकमध्ये एबी फॉर्मच्या पळवापळवीवरून मोठे रामायण झाले. भाजप व शिंदेसेना यांनी जाहीरपणे युती करणार असा धोशा चालू ठेवून प्रत्यक्षात एकमेकांच्या पाठीत खंजीर खुपसले. मुंबई वगळता इतरत्र सर्वत्र युतीमध्ये कमीअधिक बेबनाव झालेला आहे. अजितदादांनी तर सर्वत्रच वेगळी चूल मांडली आहे.

## माघारीची कारणे काय?

या पार्श्वभूमीवर ६८ नगरसेवक हे रामापेक्षाही थोर निघाले. रामाच्या अश्वमेधाचा घोडा त्याचे पुत्र असलेले लवकुश यांनी तरी अडवला. पण या नगरसेवकांबद्दल त्यांच्या विरोधकांचा आदर, प्रेम इतके काही उचंबळून आले की त्यांनी त्यांना मैदान मोकळे करून दिले. एरवी निवडणूक आयोग हा सत्ताधाऱ्यांच्या ओंजळीने पाणी पितो अशी टीका होते. तशी उदाहरणेही दिसली आहेत. पण यावेळी त्यांनाही याची तोंडदेखली का होईना दखल घेणे भाग पडले आहे. इतक्या मोठ्या घाऊक प्रमाणात बिनविरोध नगरसेवक निवडून येणे हा लोकशाहीचा खून आहे हे विरोधकांचे मत बहुदा त्यांना पटले असावे. किंवा, असेही असावे की, उद्या ही प्रकरणे न्यायालयात जाण्याची भरपूर शक्यता आहे. त्यावेळी आयोगाने आपली घटनात्मक जबाबदारी पार पाडली नाही असे ताशेरे ओढले जाऊ नयेत याची काळजी घेतली जात आहे. आता आयोग या प्रकारांची चौकशी करणार असून अर्जमाघार पारदर्शक वातावरणात झाली आहे याची खात्री पटल्यावरच येथील निवडणुकीचे निकाल जाहीर केले जातील असे सांगितले जात आहे. पण या चौकशीतून खरेच काही निष्पन्न होईल का याविषयी शंका आहे. यापूर्वी नगरपालिका व त्याहीपूर्वी काही ग्रामपंचायतींमध्ये भाजपने निवडणुका बिनविरोध केल्या होत्या. आपल्याला जनतेत किती पाठिंबा आहे हे दाखवण्याचा हा मार्ग होय. मात्र उमेदवारीसाठीच्या जीवघेण्या मारामाऱ्या लक्षात घेता या माघारीमागे बरीच कटकारस्थाने झाली असावीत हे कोणालीही कळेल. विरोधकांना माघारीसाठी थेट धमकावणे, पोलिस किंवा सरकारी अधिकाऱ्यांमार्फत कारवाईच्या धमक्या देणे, पैसे देऊन गप्प बसवणे किंवा अन्य काही आमिष दाखवून फशी पाडणे असे प्रकार इथे घडलेले असण्याची भरपूर शक्यता आहे. ठाण्यात एकनाथ शिंदे यांच्या उमेदवाराविरुद्ध उभ्या असलेल्या मनसेच्या शहर अध्यक्षानेच अर्ज मागे घेतला. याबाबत मनसे नेत्यांनी संशय व्यक्त केला आहे. ठाण्यात ठाकरे सेनेच्या एका उमेदवाराला धमक्या देऊन अर्ज मागे घ्यायला लावल्याचा कथित व्हिडिओ ठाकरे व मनसेनेच्या नेत्यांनी काल ठाण्यात दाखवला. अर्थात, याची चौकशी देवेंद्र फडणवीसांचे पोलिस वा अधिकारीच करणार असतील तर त्यातून काही बाहेर निघण्याची शक्यता नाही.

## सोलापुरातील खून

ठाणे व कल्याण डोंबिवली महापालिकेमध्ये कहर झाला आहे. तेथे भाजपने तब्बल १४ आणि शिंदे सेनेने ६ उमेदवार बिनविरोध केले आहेत. ही सरळसरळ विरोधकांची मुस्कटदाबी आहे. बारामतीमधून शरद पवार किंवा अलिकडे नागपूरमधून देवेंद्र फडणवीस हे निवडून येणार हे सर्वांना ठाऊक असते. तरीही त्यांच्याविरुद्ध वर्षानुवर्षे उमेदवार उभे राहतात. आपले मत वाया जाणार आहे हे ठाऊक असूनही लाखोंच्या संख्येने मतदार विरोधकांना इथे मतदान करतात. ही लोकशाहीची जादू आहे. याचमुळे खुद्द नरेंद्र मोदी यांचे वाराणशीतले मताधिक्य २०२४ मध्ये एकदम खाली आलेले आहे हे सर्वांच्या लक्षात आले होते. असा विरोध विविध मार्गांनी जिवंत राहिला तरच लोकशाही वाचू शकते. पण भाजपला नेमके हेच सलते आहे. भाजपला महाराष्ट्रातच नव्हे तर पूर्ण देशात विरोधक नष्ट झालेले पाहायचे आहेत. जे नावाला शिल्लक राहतील ते आपण कधीही विकत घेऊ शकू असेच असले पाहिजेत असा त्याचा कटाक्ष आहे. भाजपकडची सत्ता, पोलिसांचा व पैशांचा बेछूट वापर पाहता त्याच्याशी लढणे सोपी बाब नाही. तरीही ठाकरे बंधू, काँग्रेस हे पक्ष संघर्ष करीत आहेत. या सर्व प्रकरणात मिडिया, न्यायालये, निवडणूक आयोगासारख्या तटस्थ संस्था यांची भूमिका अत्यंत कळीची आहे. बिनविरोध निवडीचे हे तमाशे म्हणजे भाजपच्या लोकप्रियतेचे नव्हे तर सत्तेच्या बेलगाम वापराचे पुरावे म्हणूनच त्याकडे पाहून त्यांची तपासणी करायला हवी. एखाद्या ठिकाणी अपवादात्मक स्थितीत उमेदवार खूपच लोकप्रिय असेल व समोर तुल्यबळ कोणी नसेल तर बिनविरोध निवडणूक होऊही शकते. पण ६८ ठिकाणी ती व्हावी हा संशयास्पद प्रकारच मानायला हवा. याचे काही पुरावेही अप्रत्यक्षपणे समोर येत आहेत. सोलापुरात अर्ज माघारीच्या वादातून मनसे विद्यार्थी सेनेचे बाळासाहेब सरवदे यांचा झालेला खून हे त्याचेच उदाहरण म्हणावे लागेल. ठाण्यात एका उमेदवाराला पोलिस अधिकाऱ्याने धमकी देऊन एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी नेल्याचा आरोप मनसेचे अविनाश जाधव यांनी केला आहे. अर्ज मागे घेण्याच्या दिवशी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून देवेंद्र सतत फोनवर बोलत होते. अर्ज मागे घेण्यासाठी विनंती करण्याकरता हे फोन चालू होते असे त्यांनी स्वतःच भाषणात सांगितले. त्यांनी कोणत्या शब्दात ही विनंती केली असेल व ती मान्य न केल्यास त्याचे परिणाम काय होतील याची गर्भित वा अप्रत्यक्ष धमकी दिली असेल याची कल्पना कोणालाही करता येण्यासारखी आहे. खरे तर निवडणूक आयोगाने हाच पुरावा मानून पुढची कारवाई

# विचार | महासत्तांच्या पथ्यावरचे म्यानमारमधील गृहयुद्ध

*'रेअर अर्थ मॅग्नेट्स'साठी जागतिक शक्तींमधील स्पर्धा वाढत आहे. अमेरिका-चीन स्पर्धेचीही व्याप्ती वाढत आहे. कमकुवत राजकीय देश भू-राजकीय क्षेत्र बनत आहेत. म्यानमार हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. म्यानमार हिंसक गृहयुद्धात अडकला आहे. देशात सक्रिय असंख्य सशस्त्र गट लष्कराशी लढत असताना, जागतिक शक्ती संघर्षाला चालना देत खनिज संपत्तीवर नियंत्रण मिळविण्यासाठी युक्त्या योजत आहेत.*



**प्रा. जयसिंग यादव**

भारत, चीन आणि आग्नेय आशियाच्या त्रिकोणीय जंक्शनवर म्यानमार वसला आहे. तो आग्नेय आशियाचे प्रवेशद्वार आहे. जागतिक महासत्तांच्या स्पर्धेत म्यानमार हे एक नवीन रणांगण बनले आहे. भारत, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि जपान यांच्या 'क्वाड'मुळे चीनला या गटाची भीती वाटते. चीनची खरी ताकद त्याच्या दुर्मिळ पृथ्वी संसाधनामध्ये आहे. चीनने 'रेअर अर्थ मॅग्नेट्स'च्या जोरावर तर अमेरिकेची कोंडी केली होती. पाकिस्तान आणि म्यानमारमध्ये जगातील काही दुर्मिळ पृथ्वी संसाधने आहेत आणि म्यानमारच्या उत्तर सीमेवर डिस्प्रोसियमसह जगातील तिसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे दुर्मिळ पृथ्वीसाठे आहेत. हे खनिज अचूक-मार्गदर्शित शस्त्रे, इलेक्ट्रिक वाहने आणि प्रगत इलेक्ट्रॉनिक्ससाठी महत्त्वपूर्ण आहे. म्हणूनच त्यावर नियंत्रण ठेवणारा दीर्घकाळ जागतिक वर्चस्व राखेल. कारण त्यामुळे त्यांना प्रगत शस्त्रे विकसित करता येतील आणि त्यांचे तंत्रज्ञान वाढवता येईल. २०२१ च्या लष्करी उठावानंतर चीनने म्यानमारमध्ये मजबूत पाय रोवले आहेत. चीनने म्यानमारच्या लष्कराला सातत्याने शस्त्रे पुरवली आहेत. पाश्चात्य निर्बंधांमुळे म्यानमारच्या लष्कराला चीनवर अवलंबून राहण्यास भाग पाडले आहे. चीनने त्याचा अचूक फायदा घेतला आहे. चीनने म्यानमारच्या ८० टक्क्यांहून अधिक आवश्यक खनिज निर्यातीवर नियंत्रण मिळवले आहे आणि प्रक्रिया न केलेली खनिजे देशांतर्गत युनिट्सकडे हस्तांतरित केली आहेत. तथापि, आता परिस्थिती वेगाने बदलत आहे. 'काचिन इंडिपेंडन्स आर्मी' (केआयए)सह अनेक वांशिक बंडखोर गटांनी लष्कराविरुद्ध पाऊल उचलले आहे. त्यामुळे चीनला दुर्मिळ खनिजे काढणे कठीण झाले आहे.

'केआयए' ने चीनला रोखण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे आता अमेरिकेला म्यानमारमध्ये प्रवेश मिळू लागला आहे. ट्रम्प प्रशासनाने म्यानमारच्या लष्कराशी संपर्क वाढवला असून लष्कराला विविध सवलती दिल्या आहेत. शिवाय, उत्तर थायलंडमधील चियांग माई वाणिज्य दूतावासाद्वारे अमेरिकन गुप्तचर संस्था म्यानमारमध्ये अधिक सक्रिय झाल्या आहेत. अमेरिकेसाठी मार्ग कठीण असला, तरी चीनच्या वर्चस्वाला किमान त्रास होऊ लागला आहे. भारत म्यानमारमध्ये एक शक्तिशाली खेळाडू बनला आहे. भारताच्या मदतीशिवाय अमेरिकेला म्यानमारमध्ये पाय रोवणे कठीण आहे. दुसरीकडे, भारताने दुर्मिळ खनिजे काढण्यासाठी तंत्रज्ञान प्रगत केले आहे. याचे केंद्रबिंदू 'राष्ट्रीय क्रिटिकल मिनरल मिशन' आहे. त्यात परदेशी खाणींचे अधिग्रहण, प्रगत प्रक्रिया क्षेत्रांची निर्मिती आणि संशोधन आणि विकासक्षमतांचा समावेश आहे. भारताची 'मिनरल्स फॉरेन लिमिटेड' (काबील) आधीच अर्जेंटिना आणि ऑस्ट्रेलियामध्ये खनिजांचा शोध घेत आहे. भारताने म्यानमारच्या काचिन राज्यात संभाव्य सहकार्याबाबत 'जीएसआय' आणि म्यानमार मंत्रालयांशी सखोल चर्चा सुरू केली आहे. 'क्वाड' भागीदार ऑस्ट्रेलिया आणि जपानदेखील ईशान्य भारताला पर्यायी प्रक्रिया केंद्र म्हणून काम करण्यासाठी आग्रह धरत आहेत. म्यानमारचा शेजारी असल्याने भारताला महत्त्वपूर्ण फायदे मिळतील आणि म्यानमार पुढील काही वर्षे भू-राजकीय रणांगण बनून राहील.

म्यानमार सध्या गृहयुद्धाशी झुंजत आहे. या देशातील राखीन राज्यातील एका रुग्णालयावर अलिकडेच हवाई हल्ला झाला. त्यात ३० लोक ठार झाले आणि सुमारे ७० जण जखमी झाले. असे मानले जाते, की 'अराकान आर्मी' या बंडखोर गटाचे सैनिक रुग्णालयात उपचार घेत होते किंवा लपून बसले होते. म्यानमार सैन्य आणि सरकारने अद्याप हवाई हल्ल्याबद्दल कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. एक फेब्रुवारी २०२१ रोजी म्यानमार सैन्याने (तत्मादॉ) लोकशाही पद्धतीने निवडून आलेले सरकार उलथवून टाकले. २०२० च्या निवडणुकीत आंग सान सू की यांच्या 'नॅशनल लीग फॉर डेमोक्रसी' (एनएलडी) ने प्रचंड मतांनी विजय मिळवला होता; परंतु लष्कराने हेराफेरीचा आरोप करत सत्ता काबीज केली. यामुळे देशभरात व्यापक निदर्शने झाली. ती लष्कराने हिंसकपणे दडपली. विरोधकांनी राष्ट्रीय एकता सरकार (एनयूजी)ची सशस्त्र शाखा असलेली 'पीपल्स डिफेन्स फोर्स' (पीडीएफ) स्थापन केली. डझनभर वांशिक सशस्त्र गट (जसे की करेन नॅशनल युनियन आणि काचिन इंडिपेंडन्स ऑर्गनायझेशन)देखील लष्कराविरुद्ध लढत आहेत. हे गट दशकांपासून स्वराज्याची मागणी करत आहेत. बंडखोरांनी म्यानमारचा अर्धा भाग ताब्यात घेतला. २०२४ पर्यंत बंडखोर गटांनी देशाच्या सुमारे ४० ते ५० टक्के भूभागावर कब्जा केला होता. विशेषतः सीमावर्ती भागात शान स्टेट आणि राखाइन राज्याचा त्यात समावेश आहे. तथापि लष्कराने प्रतिहल्ला सुरू केला.

ऑक्टोबर २०२५ मध्ये लष्कराने 'ताआंग नॅशनल लिबरेशन आर्मी' (टीएनएलए)कडून क्युक्मे शहर परत मिळवले. लष्कर अजूनही यांगोन आणि नायपिदासारख्या प्रमुख शहरांवर नियंत्रण ठेवून आहे. या काळात चीनने लष्कराला लष्करी मदत आणि त्याच्या पाइपलाइन आणि दुर्मिळ माती खाण प्रकल्पांचे संरक्षण करण्यासाठी दबाव आणला. यामुळे बंडखोरांना मोठा धक्का बसला. लष्कराने नागरिकांना लक्ष्य केले. सप्टेंबरमध्ये राखाइन राज्यातील एका शाळेवर हल्ला करण्यात आला. त्यात २२ विद्यार्थी ठार झाले. युनिसेफने हल्ल्याचा निषेध केला. ऑक्टोबरमध्ये चाउंग-यू टाउनशिपमध्ये बौद्ध उत्सवावर झालेल्या हल्ल्यात ३२-४० जणांचा मृत्यू झाला. यामध्ये मुलांचाही समावेश होता. काया राज्यात बंडखोर आणि लष्करामध्ये मोठी लढाई सुरू आहे. रुग्णालये आणि गावांवरही हल्ला झाला आहे, २३ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या हल्ल्यात ८० नागरिकांचा मृत्यू झाला. म्यानमारमध्ये जगातील दुर्मिळ पृथ्वी संपत्ती आहे. त्यासाठी जगभरातील प्रमुख शक्ती म्यानमारच्या गृहयुद्धात आग भडकवत आहेत. ते खनिज संसाधने हस्तगत करण्यासाठी युक्त्या करत आहेत. म्यानमारच्या उत्तर सीमेवर डिस्प्रोसियमसह जगातील तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा दुर्मिळ पृथ्वी साठा आहे. हे खनिज अचूक-मार्गदर्शित शस्त्रे, इलेक्ट्रिक वाहने आणि प्रगत इलेक्ट्रॉनिक्ससाठी महत्त्वपूर्ण आहे.

२०२१ मध्ये सैन्य सोडून गेलेले कॅप्टन कौंग थू विन यांनी सांगितले, की म्यानमारच्या लष्कराने नागरिकांची अंदाधुंद हत्या केली. खासगी मालमत्ता जप्त करुन मानवी हक्कांचे उल्लंघन केले. दरम्यान, लष्कराचे मनोबल खूपच खालावले आहे. त्याला सैन्य आणि शस्त्रांचे नुकसान सहन करावे लागत असून जनरलदेखील बंडखोरांना शरण गेले आहेत. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये एका पावसाळी रात्री, वुन्ना क्याव आणि त्यांचे काही सहकारी सैनिक म्यानमारमधील लष्करी तळ सोडून गेले. काही तासांनंतर, त्यांना एका तीव्र संघर्षग्रस्त क्षेत्रात तैनात करण्यात येणार होते, तिथे सैन्य लोकशाही समर्थक सशस्त्र गटांचे हल्ले रोखण्यासाठी संघर्ष करत होते. मात्र वरिष्ठ अधिकारी आणि कमांडर झोपलेले असताना हे सैनिक गुपचूप करिनमधील कंपाउंडमधून निघून गेले. या कृत्यापायी किमान सात वर्षे तुरुंगवास आणि कदाचित मृत्युदंडाची शिक्षा होऊ शकते. त्याचा निर्णय केवळ पुढील लढाईच्या भीतीने नव्हे, तर नागरिकांविरुद्धच्या लष्करी हिंसाचाराच्या विरोधामुळे प्रेरित होता. अन्य एका अधिकाऱ्याने सांगितले, 'मला लोकांबद्दल वाईट वाटले. माझ्या पालकांच्या वयाचे लोक मारले जात होते आणि त्यांची घरे विनाकारण उद्ध्वस्त केली जात होती. मी हे सर्व पाहिले, मी त्याचा साक्षीदार होतो.' सैनिक सांगतात की ते काही प्रकरणांमध्ये नैतिक आक्षेपांमुळे किंवा राजकीय कारणांमुळे पळून गेले. इतर अनेक प्रकरणांमध्ये पराभूत झाल्यानंतर त्यांनी आत्मसमर्पण केले.

फेब्रुवारी २०२१ मध्ये एका बंडाद्वारे सत्ता काबीज केल्यापासून म्यानमारच्या लष्कराला त्यांच्या राजवटीचा विरोध दाबण्यासाठी संघर्ष करावा लागला आहे. यामध्ये लष्कराच्या हिंसाचार आणि दडपशाहीविरुद्ध लढण्यासाठी शस्त्रे हाती घेणारे लोकशाही समर्थक गट आणि स्वातंत्र्यासाठी दीर्घकाळ लढणारे वांशिक अल्पसंख्याकांचे सशस्त्र गट यांचा समावेश आहे. ते लष्करी राजवटीविरुद्धच्या संघर्षात सामील झाले आहेत. २७ ऑक्टोबर रोजी वांशिक अल्पसंख्याक सशस्त्र गटांच्या युतीने (थ्री ब्रदरहुड अलायन्स) नवीन सत्तापालट विरोधी लढवय्यांसह उत्तर शान राज्यात एक मोठे आक्रमण सुरू केले, तेव्हा दबाव आणखी वाढला. आधीच अनेक आघाड्यांवर संघर्ष करत असलेले सैन्य अचानक झालेल्या हल्ल्यामुळे सावध झाले. 'ऑपरेशन १०२७' असे नाव देण्यात आलेले हे आक्रमण चीनच्या सीमेवर जलद प्रगती करत इतर भागात हल्ले करण्यास प्रेरित करत होते. प्रतिकार गटांची प्रगती सर्वत्र मिश्रित आहे. म्यानमारचे सैन्य मोठ्या पराभवाच्या उंबरठ्यावर आहे, अशी सुरुवातीची अपेक्षा अकाली होती; परंतु ऑक्टोबरपासून उत्तरेत विमान पाडले गेले. शस्त्रे जप्त केली गेली. महत्त्वाची शहरे आणि पुरवठा मार्ग गमावले. हे सैन्यासाठी अपमानास्पद ठरले. त्यामुळे त्याच्या नेतृत्वाविरुद्ध अंतर्गत रोष निर्माण झाला आहे.

# विकास नव्हे, हा तर सर्वनाश!

**राकेश लोहार**

विकासाच्या नावाखाली झाडांची कत्तल म्हणजे विकास नव्हे, तर भविष्यातील पिढ्यांवर लादलेला अन्याय आहे. सरकार यालाच 'विकास' म्हणत आहेत. डांबर, काँक्रिटचे रस्ते आणि वाहनांच्या वेगासाठी जर माणसांचा श्वास गुदमरवावा लागणार असेल, तर असा विकास कोणासाठी? पण, खरे सांगायचे तर हा विकास नाही- हा आत्मघात आहे. रस्ते 'रुंद' होत आहेत; पण माणसांची श्वास घेण्याची जागा 'अरुंद' होत चालली आहे. काँक्रिट वाढत आहे, पण पाणी, हवा आणि जीवन कमी होत आहे.

आज अलिबाग-रेवदंडा मार्गाचे रुंदीकरण करण्याच्या नावाखाली शेकडो झाडे तोडली जात आहेत. यातील अनेक झाडे काल-परवा उगवलेली नाहीत; ती दशकानुदशके आपल्याला सावली, प्राणवायू, पाणी आणि हवामान संतुलन देत होती. एका सहीने, एका फाईलने ही झाडे तोडण्याचा अधिकार सरकारला दिला कोणी? सरकार सतत 'पर्यावरणपूरक विकास'चा दावा करते, पण प्रत्यक्षात धोरणे मात्र पूर्णपणे पर्यावरणविरोधीत आहेत. रस्ते हवेतच हवेत, पण झाडे नष्ट करुनच का? आज रस्ता रुंदीकरणासाठी पाल्हे बायपासवरील असंख्य झाडे बिनधास्तपणे जमीनदोस्त केल्याने गेली कित्येक वर्षांची हिरवळ कायमची संपवून टाकली आहे. या रस्त्यावर मोठमोठाली झाडे होती, ती नकाशावरुनच पुसली गेली आहेत. कसला विकास हा? आणि, यावर कोणी जाब विचारायला तयार नाही, सगळे गपगुमान पाहात बसलेत. आणि, आता तर सगळ्यांच्या स्टेटसवर एकच व्हिडिओ पाहायला मिळतेय, ती म्हणजे- सर्वनाश. पण, या सर्वनाशाला आपणच जबाबदारच आहोत, याचे अद्याप कोणालाच भान नाही. का जाब विचारला नाही कुणी? कशासाठी आणि कोणासाठी सुरु आहे सगळे? अजून काय काय उद्ध्वस्त होणार आहे, हे पाहण्यापलिकडे आपण काहीच करु शकत नाही, हे तर आता स्पष्ट झाले आहे. नकोय असला विकास आम्हाला, असे बोलणारा एकही माणूस अद्यापपर्यंत पुढे आलेला नाही, हेच दुर्दैव आहे. त्यामुळे मोबाईलवर स्टेटस ठेवण्याचा आपल्याला खरंच अधिकार आहे का? नागरिकांनी जीवाचे रान करुन उजाड रस्त्याच्या दुतर्फा छोटी-छोटी रोपटी लावून ती जगवली, वाढवली. पण, त्यावरच बुलडोझर चालविला गेलाय. मनातील तडफड, ओठांवर न आल्याने आज सरकारचे फावले आहे. आणि, त्यातूनच झाडांवर कुऱ्हाड चालविण्याचे धाडस सरकारने केलेय.

मात्र, नाशिकमधील तपोवन प्रकरणाने हे सिद्ध केले की, नागरिक एकत्र आले तर विनाश थांबवता येतो. तपोवन वाचले, कारण सामान्य नागरिकांनी, पर्यावरणप्रेमींनी, तरुणांनी आणि जाणकारांनी एकत्र येऊन आवाज उठवला. कुंभमेळ्यात येणाऱ्या साधूंच्या निवासासाठी याठिकाणी झाडे तोडण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. परंतु, सामान्य जनता सरकारविरोधात रस्त्यावर उतरली, त्यामुळे सरकारला तपोवनातील झाडे तोडण्याचा निर्णय मागे घ्यावा लागला. सांगण्यामागचा उद्देश एकच- जर अलिबाग ते रेवदंडा मार्गावरील जनता जरी वेळीच रस्त्यावर उतरली असती, तर सरकारला असाच काहीसा निर्णय घेणे भाग पडले असते. पण, पुढे येऊन बोलायला तयार नाही. झाडे तोडून विकास पुढील काळासाठी महागात पडेल, एवढे नक्कीच. कारण, झाड म्हणजे अडथळा नाही, झाड म्हणजे आधार आहे. झाड म्हणजे सावली, पाणी, प्राणवायू, जैवविविधता आणि हवामानाचा समतोल. हेच झाडे तोडून जर रस्ता बनवला, तर तो माणसाला कुठे नेणार? उष्णतेकडे, दुष्काळाकडे, पुराकडे की थेट मृत्यूकडे?

सरकारचे धोरण आज असे आहे की विकास म्हणजे फक्त गाड्यांचा वेग. माणसांचा श्वास, शेतकऱ्यांचे पाणी, आदिवासींचे जंगल- यांना काहीच किंमत नाही. 'झाडे कापू, पण दहा झाडे लावू' हा फसवा जप आजही जपला जातो. पण, प्रश्न असा आहे- ती दहा झाडे जगणार तरी आहेत का? तीस-चाळीस वर्षांचे झाड तोडून, दोन फूट उंचीचे रोप लावणे म्हणजे पर्यावरणाची थट्टा नाही का? रस्ते हवेत, पण रस्त्यांसाठी सगळेच उद्ध्वस्त करणे आवश्यक आहे का? पर्यायी नियोजन का होत नाही? आज झाड तोडणे सोपे आहे, पण दूरदृष्टी ठेवणे कठीण आहे.

आज शहरं तापत आहेत, गावं कोरडी पडत आहेत, पावसाचा भरवसा राहिलेला नाही. हे सगळे अपघात नाहीत- ही सरकारच्या धोरणांची फळे आहेत. आणि, तरीही सरकार म्हणते, 'आम्ही विकास करतोय'. असा विकास नकोय! असा विकास म्हणजे पुढच्या पिढ्यांचा घात. येथील जनता गप्प बसल्यामुळेच तर उद्याची सावली आज आपण कायमची गमावून बसलोय. परिणामी, सावलीसाठी झाडं नाहीत, अशी परिस्थिती ओढावल्यास नवल वाटू नये. कारण, आपल्याला झाडे तोडून सुरु असलेला विकास हवाय. रस्ते हवेत, पण ते जीवनाच्या किमतीवर नकोत. झाडे तोडून विकास होत नाही, तो सर्वनाशाचा महामार्ग असतो, आणि त्या मार्गावर सरकार आपल्याला जबरदस्तीने ढकलत आहे. आता प्रश्न इतकाच आहे, आपण अजूनही गप्प बसणार का?

## लोकसंसद

# "चीनचा रडीचा डाव"

वर्ष २०२० मध्ये लडाखमधील चीनच्या सीमेवरील गलवान खोऱ्यात भारत आणि चीन यांच्या सैनिकांमध्ये झालेल्या संघर्षावर आधारित "बॅटल ऑफ गलवान" हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला. गलवान खोऱ्यातील संघर्ष दोन्ही देशाच्या संबंधांच्या इतिहासातील महत्त्वाचा बिंदू ठरला. भारतीय सैनिकांनी चिनी सैनिकांशी प्रत्यक्ष दोन हात करून जे शौर्य दाखवले त्याची इतिहासात सुवर्ण अक्षराने नोंद झाली. भारतासाठी गलवान संघर्ष शौर्य, बलिदान आणि राष्ट्रीय स्वाभिमानाचा विषय आहे तर चीनसाठी ही घटना आंतरराष्ट्रीय स्तरावर नकोशी असलेली, स्वतःच्या प्रतिमेचा चक्काचूर करणारी आहे म्हणूनच या चित्रपटाला चीन विरोध करत आहे. या संघर्षात चीनचा दारुण पराभव झाला होता. भारताने चीनला त्याची जागा दाखवून त्याची मस्ती उतरवली होती. या चित्रपटातून ते जगासमोर आल्याने चित्रपटात संघर्षाची खरी परिस्थिती पालटून दाखवली असून त्यात भारताच्या बाजूने दृष्टिकोन सादर करण्यात आला आहे. हा प्रचारात्मक चित्रपट आहे आणि म्हणूनच याला विरोध आहे असे चीनचे म्हणणे आहे. देशांतर्गत प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटांमध्ये हस्तक्षेप करण्याचा अधिकार कोणत्याही परकीय देशांना नाही. हा अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घालणारा आहे. भारताने त्याला तात्काळ आणि सडेतोड प्रत्युत्तर दिले. भारत चीनची किंवा अन्य कोणत्याही देशाची दादागिरी आता खपवून घेणार नाही असे स्पष्ट संदेश आज दिले जात आहे. अशी कणखर भूमिका पाच-सहा दशकापूर्वी घेतली असती तर आजचे चित्र वेगळे असते. चीनला स्वतःच्या सैनिकांचा पराभव स्वीकारण्याचे धैर्य नाही त्यामुळे तो चिडचिड करत आहे पण त्यासाठी इतर देशांनी सत्य दडपावे अशी अपेक्षा करणे हा पराकोटीचा अहंकार आहे. चीनच्या असुरी विस्तारवादी मानसिकतेमुळे त्याचे अनेक देशांशी वाद आहे. भारतासह सर्व चीन बाधित देशांना एकत्र येऊन चीनला कृतिशील विरोध करण्याचे धोरण आखले पाहिजे. गलवान संघर्ष हा इतिहासाचा भाग आहे आणि इतिहास ना दबावाने पुसला जातो, ना धमक्यांनी पालटता येतो. विरोध, आक्षेप आणि दबाव यामुळे इतिहासाची दिशा पालटत नाही. चीनचे भारतातील कुठल्याही प्रांतावर दावा करण्याचे धाडस होणार नाही असा वाचक सरकारने निर्माण करणे आवश्यक आहे.

**लीना मकरंद गाडगीळ पनवेल**

# विशेष | सबसे बडा खिलाडी सुरेश कलमाडी

सुरेश कलमाडी या नावाशिवाय पुण्याचा राजकीय इतिहास पूर्णच होऊ शकत नाही. जवळपास तीन दशके पुण्याच्या राजकारणावर एकहाती हुकूमत गाजवणारे पुण्याचे कारभारी असलेले पुण्याचे माजी खासदार सुरेश कलमाडी यांचे मंगळवार ६ जानेवारी रोजी वयाच्या ८२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने पुण्यावर एकहाती वर्चस्व गाजवणारा नेता काळाचा पडद्याआड गेला. १ मे १९४४ रोजी जन्मलेले सुरेश कलमाडी यांनी सेंट व्हिन्सेंट हायस्कुलमधून आपले शालेय शिक्षण पूर्ण केले तर पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधून उच्च शिक्षण पूर्ण केले. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी पुण्याच्या नॅशनल डिफेन्स अकॅडमीमध्ये प्रवेश घेऊन पायलट बनण्याचे प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी काही वर्ष भारतीय हवाई दलात पायलट म्हणून सेवा केली. १९६५ आणि १९७१ च्या युद्धात त्यांनी हवाई दलाचे पायलट म्हणून भाग घेतला होता. १९७२ साली त्यांनी राजकारणात प्रवेश केला. संजय गांधी यांचे ते निकटवर्ती होते त्यांच्यामुळेच ते राजकारणात आले असे म्हंटले गेले. काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यावर त्यांना पुण्याचे प्रमुख बनवण्यात आले. त्या काळी पुण्यात अनेक दिग्गज नेते होते मात्र सर्वांना बाजूला सारून त्यांनी पुण्याची धुरा स्वीकारली. ९० च्या दशकात तर पुण्यावर त्यांचे एकहाती वर्चस्व होते. १९९१ साली तत्कालीन पंतप्रधान पी व्ही नरसिंहराव यांनी त्यांना आपल्या मंत्रिमंडळात घेतले आणि रेल्वे राज्यमंत्रीपदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली. रेल्वे राज्यमंत्री म्हणून त्यांनी रेल्वेचा अर्थसंकल्पही सादर केला होता. केंद्रीय मंत्री आणि पंतप्रधान नरसिंहराव यांचे निकटवर्ती असल्याने पुण्यावर त्यांनी एकहाती वर्चस्व गाजवायला सुरुवात केली. पुण्यात ते काँग्रेसचे सर्वेसर्वा बनले. पुणे महानगर पालिकेवर त्यांचे एकहाती वर्चस्व होते. पुण्याचे नगरसेवक, पुण्याचा महापौर कोण होणार हे कलमाडी ठरवत असे. पुण्याचे आमदार देखील कलमाडींच्याच मर्जीतील असत. पुण्याच्या राजकारणावर त्यांची एकहाती पकड होती म्हणूनच त्यांना पुण्याचे कारभारी असे संबोधले जायचे. त्यांच्याभोवती कार्यकर्त्यांची रीघ लागलेली असे. त्यांचे कलमाडी हाऊस कार्यकर्त्यांनी फुलून गेलेले असे. केंद्रीय मंत्री आणि पुण्याचा खासदार या नात्याने त्यांनी पुण्याला जागतिक शहर बनवण्याचा प्रयत्न केला. पुणे मेट्रो प्रकल्प, विमानतळ विकास त्यांच्याच प्रयत्नामुळे साकार झाले. पुण्यात सर्वप्रकारच्या पायाभूत सुविधा असाव्यात असा त्यांचा आग्रह असे. पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन आणि पुणे फेस्टिवल सुरू करून त्यांनी पुण्याला जागतिक स्तरावर नेले. १९९१ ते १९९६ या काळात पुणे काँग्रेसचे सर्वेसर्वा असणाऱ्या कलमाडी यांनी १९९७ साली मात्र काँग्रेस सोडली. १९९८ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. पराभवानंतर कलमाडी यांनी शरद पवारांमुळेच आपल्याला पराभव स्वीकारावा लागला असे त्यावेळी जाहीर वक्तव्य केले होते. अपक्ष म्हणून निवडणुकीत उभे राहिलेल्या कलमाडी यांना भाजपने पाठिंबा दिला होता आणि त्यांच्या प्रचारासाठी तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी पुण्यात आले होते. १९९८ साली झालेली राज्यसभा निवडणूक खूप गाजली या निवडणुकीत ते पुन्हा अपक्ष म्हणून उभे राहिले. या निवडणुकीत त्यांचे प्रतिस्पर्धा होते राम कदम. राम कदम हे गांधी कुटुंबाच्या जवळचे होते शिवाय जिंकून येण्याइतपत मते त्यांच्याकडे होते तरीही त्यांना धोबीपछाड देऊन कलमाडी यांनी ती निवडणूक जिंकली आणि राजकारणात भूकंप घडवला होता. या विजयानंतर त्यांच्या कार्यकर्त्यांनी सबसे बडा खिलाडी सुरेश कलमाडी अशा घोषणा दिल्य होत्या. १९९९ साली काँग्रेस फुटली शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली सुरेश कलमाडी पुन्हा काँग्रेसमध्ये परतले. २०१० पासून मात्र त्यांच्या राजकीय कारकीर्दीला उतरती कळा लागली. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत गैरव्यवहार केल्याचा त्यांच्यावर आरोप करण्यात आला. त्यांना काहीकाळ तुरुंगातही रहावे

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**७ जानेवारी**

१) श्री.सखाराम रामचंद्र पवार मयेकरवाडी, अलिबाग, ७-१-१९३३

२) श्री. अरविंद नथुराम तरे, ब्राम्हणआळी, अलिबाग, ७-१-१९४३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचाफोटोकृषीवलमध्येछापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**कै. प्रभावती महादेव पाटील, स्मरणार्थ अलिबाग**

**स्व. परेश नवीनचंद्र गाला, स्मरणार्थ, सांताक्रूझ, मुंबई**

## शांताबाई कापसे यांचे निधन



**कोलाड :** रोहा तालुक्यातील कापसे मुठवली गावच्या रहिवासी शांताबाई नारायण कापसे यांचे शनिवारी (दि.३) वयाच्या ८३व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी व अंतिम धार्मिक विधी सोमवारी दि.१२ जानेवारी रोजी देवकान्हे येथील त्यांची मुलगी पुष्पा हिच्या घरी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.


# स्थलांतरित पक्ष्यांच पाठ

### ● पक्षीप्रेमींमध्ये निराशेचे वातावरण

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

सातत्याने होत असलेल्या हवामानातील बदलामुळे हजारो स्थलांतरित पक्ष्यांचे यंदा उरणकडे पाठ फिरवली आहे. यामुळे दरवर्षी हजारो किलोमीटरचा प्रवास करुन येणाऱ्या विविध स्थलांतरित पक्षांचे यंदा दर्शन दुर्लभ झाले आहे. यामुळे पक्षीप्रेमींमध्ये सध्या तरी निराशेचे वातावरण आहे.

रायगड जिल्ह्यातील उरण परिसरात जेएनपीए, पाणजे, डोंगरी, गव्हाण-न्हावा, करंजा खाडीकिनारा आणि पाणथळी जागा, जलाशय आदी अनेक ठिकाणे स्थलांतरीत पक्षांची आश्रयस्थाने आहेत. पाणथळी आणि जलाशयात खुबे, मासे, शेवाळ, कृमी, किटक आदि पक्षांचे आवडते खाद्य विपुल प्रमाणात उपलब्ध होत आहे. त्यामुळे विविध जातींचे लाखोंच्या संख्येने स्थलांतरीत पक्षी या परिसरात मोठ्या प्रमाणात येतात.



दरवर्षी पावसाळा संपताच हिवाळ्याच्या सुरुवातीपासूनच परदेशी पक्षांच्या स्थलांतराचा काळ सुरु होतो. हवामान, अन्नाची उपलब्धता, प्रजनन, खराब हवामानापासुन बचाव व सुरक्षित वातावरणासाठी भारतात सुमारे ३७० प्रजातींचे पक्षी स्थलांतर करतात. हे स्थलांतरित पक्षी सूर्य, तारे, पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्राचा आधार घेऊन दिशा ओळखतात. या स्थलांतराच्या काळावधीत उरण परिसरातील पाणथळी, जलाशये आणि खाडी किनाऱ्यावर सीगल, फ्लेमिंगो, नीलबदक, युरेशियन टील, नॉर्दर्न पिनटेल, इबिसेस, बारहेडेड गूज, हंस, तुतवार, पेलिकन, क्रेन अवाक, कारंडव आदी पाणथळी तसेच व विविध शेकडो विविध जाती, प्रजातींचे स्थलांतरित पक्षी दरवर्षी हिवाळ्यात उरण परिसरात दाखल होतात. मात्र सातत्याने हवामानात होणारे बदल आणि लांबलेला पाऊस यामुळे यंदाचे वर्ष त्याला अपवाद ठरले आहे. यावर्षी जानेवारीला सुरूवात झाली आहे. मात्र उरण परिसरात लाखोंच्या संख्येने थव्याने येणारे स्थलांतरित पक्षी आलेले आढळून येत नाहीत. काही पाणथळी जागेत स्थलांतरित पक्षी अगदी नगण्य, तुरळक संख्येने आढळून येत आहेत.

उरण परिसरात मोठ्या प्रमाणात येणाऱ्या स्थलांतरित पक्षी पाहणे पक्षी प्रेमींसाठी एक पर्वणीच असते. त्यामुळे स्थलांतरित दुर्मिळ पक्षांच्या हालचाली व छबी टिपण्यासाठी पक्षीप्रेमीं दरवर्षी या ठिकाणी येत असतात. मात्र पक्षी निरीक्षणासाठी येणाऱ्या पक्षी प्रेमींसाठी कोणतीही सोय अद्यापही उपलब्ध करून देण्यात आलेली नाही, हे दुर्दैवी आहे.

### बदलत्या हवामानामुळे पक्षांचे आगमन लांबणीवर

बदलते वातावरण, खराब हवामान व पावसाळा लांबल्याने उरणमध्ये यंदा विविध स्थलांतरित पक्षांचे आगमन लांबणीवर पडले आहे. अशी प्रतिक्रिया उरण वनक्षेत्रपाल नथुराम कोकरे यांनी व्यक्त केली आहे. तर थंडीच्या दिवसातही धोकादायक वादळे, अतिवृष्टी व सातत्याने बदलत्या हवामानामुळे यंदा जानेवारी महिना उजाडला तरीही उरणमध्ये स्थलांतरित विविध पक्ष्यांचे दर्शन झाले नसल्याची प्रतिक्रिया वन्यजीव संरक्षण संस्थेचे अध्यक्ष विवेक केणी यांनी व्यक्त केली आहे.

## नवनिर्वाचित नगराध्यक्ष, नगरसेवकांचा सत्कार



**कर्जत :** दहिवली गाव परिसर विचारमंचाच्या वतीने दहिवली श्रीराम घाटाच्या प्रांगणात नगराध्यक्ष व गावातून निवडून आलेल्या सहा नगरसेवकांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला लोकनियुक्त नगराध्यक्ष पुष्पा दगडे, नगरसेवक संकेत भासे, रामदास गायकवाड, मोरे, सुचिता खोत, कोयल कन्हेरीकर, जान्हवी देवघरे व्यासपीठावर उपस्थित होते. विचारमंचाचे प्रमुख सुनील जाधव यांनी प्रस्ताविकात विचारमंचाने केलेल्या पाठपुराव्याने झालेल्या विकास कामांची माहिती दिली. यापुढेही सर्वांनी असेच सर्वांनी सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यानंतर नगराध्यक्ष व नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना रामदास गायकवाड यांनी, आम्ही केवळ निमित्तमात्र आहोत. ज्यांनी आम्हाला या खुर्चीत बसवले त्यांनाच सारे श्रेय आम्ही देतो. दहिवली गावाच्या विकासासाठी आम्ही सर्वजण एकत्र राहून काम करू, असे स्पष्ट केले.

## स्वच्छतेविषयी जनजागृती व्याख्यान

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

किशोरवयीन मुलींमध्ये आरोग्याबाबत जनजागृती करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ खोपोली यांच्या वतीने सह्याद्री इंग्लिश मीडियम स्कूल, शिळफाटा येथे मासिक पाळी आणि स्वच्छतेविषयी जनजागृती व्याख्यानाचे करण्यात आले होते. डॉ. सुषमा देवडीकर यांनी मासिक पाळीच्या काळातील स्वच्छतेचे महत्त्व, किशोरवयात होणारे शारीरिक बदल, मासिक पाळीबाबत असलेले गैरसमज व समजुती तसेच पाळावयाच्या योग्य स्वच्छता पद्धती याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

रोटरी क्लब ऑफ खोपोलीच्या अध्यक्षा सुनिता चव्हाण आणि सह्याद्री इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका धनश्री ठाकेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. याप्रसंगी रोटरी क्लब ऑफ खोपोली सेक्रेटरी नलिनी रामास्वामी, युथ डायरेक्टर होझैफा टिंबावाला, डॉ. निधी सिंग तसेच इंटरॅक्ट प्रभारी शिक्षकव्याख्याते डॉ. सुषमा देवडीकर आणि सह्याद्री इंग्लिश मीडियम स्कूलच्या शिक्षिका आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

व्याख्यानातून डॉ. सुषमा देवडीकर यांनी अत्यंत संवेदनशील व शास्त्रीय पद्धतीने मासिक पाळीच्या काळातील स्वच्छतेचे महत्त्व, किशोरवयात होणारे शारीरिक बदल, मासिक पाळीबाबत असलेले गैरसमज व समजुती तसेच पाळावयाच्या योग्य स्वच्छता पद्धती याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी मनमोकळेपणाने प्रश्न विचारले व या सत्रातून त्यांना स्वतःच्या आरोग्याविषयी आत्मविश्वास प्राप्त झाला. रोटरी क्लब ऑफ खोपोली अशा उपक्रमांद्वारे समाजआरोग्य व मुलींच्या सक्षमीकरणासाठी आपली बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित केली. हा उपक्रम रोटरीच्या 'युनाइट फॉर गुड' या ब्रीदवाक्याशी सुसंगत असल्याचे रोटरी क्लब ऑफ खोपोलीचे अध्यक्षा सुनिता चव्हाण यांनी सांगितले.

## भवानी देवी पालखी सोहळा उत्साहात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

नडगाव येथील भवानी देवी मातेचा वार्षिक जत्रोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा झाला. या यात्रेचे हे ४९वे वर्ष होते. जत्रोत्सवाच्या निमित्ताने भाविकांनी हजारोंच्या संख्येने गर्दी करत भवानी देवी चरणी माथा टेकवला. या जत्रोत्सवात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली.

मंदिरांच्या गाभाऱ्यात व परिसरात ग्रामस्थ आणि मुंबई मंडळाच्या सहकार्याने आणि तरुण मित्र मंडळाच्या संकल्पनेतून नारी शक्तींचा अर्थात स्त्री शक्तींचा गौरव करणारा देखावा साकारण्यात आला होता. हा देखावा आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरला. या देखाव्याच्या माध्यमातून भारताच्या पहिल्या शिक्षिका सावित्रीबाई फुले, राष्ट्रमाता जिजाऊ, रणरागिणी झाशीची राणी, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी, महिला पंतप्रधान इंदिरा गांधी, अनाथांची माय सिंधुताई सपकाळ, सुप्रसिद्ध गायिका लता मंगेशकर, राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, किरण बेदी, कल्पना चावला अशा विविध क्षेत्रांत देशासाठी महान कामगिरी करणाऱ्या नारी शक्तींचा कार्याची महती सादर करण्यात आली. या प्रतिमांच्या माध्यमातून त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्याचा प्रयत्न गावातील तरुण प्रणय अगबुल व सहकारी तरुण वर्ग, ग्रामस्थांच्या पुढाकाराने हा अनोखा उपक्रम राबवण्यात आला.



### 'गौरव नारी शक्तींचा' देखावा ठरला आकर्षणाचे केंद्रबिंदू

## वाशी हवेली येथे नेत्र तपासणी

**तळा :** द.ग.तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे हिवाळी निवासी श्रमदान शिबिराला दि.५ जानेवारीपासून सुरुवात झाली. शिबिराच्या पहिल्याच दिवशी लायन्स हेल्थ फाउंडेशन सुपर स्पेशालिटी आय हॉस्पिटल, चोंडी अलिबागच्या सीईओ डॉ.शुभदा कुडतलकर, ऑप्टोमेस्ट्रिस्ट सिश्री पाटील, ऑप्टोमेस्ट्रिस्ट निलेश म्हात्रे, परिचारिका जान्हवी कदम यांनी उपस्थितांची नेत्र तपासणी केली.

## 'पाणी, हवेचे लेखापरीक्षण करणे गरजेचे'



**तळा :** तळा विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा, रायगड राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे हिवाळी निवासी श्रमदान शिबीर वाशी हवेली येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबीराच्या उद्घाटन समारंभाच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे होते.

या शिबिराची मध्यवर्ती संकल्पना शाश्वत विकासासाठी युवक अशी असून या संकल्पनेला अनुसरून प्राचार्य डॉ.अतुल साळुंखे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, ज्याप्रमाणे आपण आपल्या उत्पन्नाचे, मिळकतीचे, जमा खर्चाचे ज्याप्रमाणे आपण लेखापरीक्षण करतो. त्याप्रमाणे आता पुढच्या पिढीला चांगले पाणी, हवा जर द्यायची असेल तर, या पिढीला हवा आणि पाण्याचे लेखापरीक्षण करावे लागेल.

## लोभेवाडीतील आदिवासी तरुणांची कौतुकास्पद कामगिरी

### ● गावात राबवले स्वच्छता अभियान

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील पाथरज ग्रामपंचायत हद्दीतील लोभेवाडी आदिवासी वाडीतील तरुणांनी कौतुकास्पद कामगिरी केली आहे. सुट्टी म्हटली की मैदानावर किंवा मोकळ्या जागेत तरुण मुले क्रिकेट खेळताना आपल्याला दिसतात. मात्र लोभेवाडी तरुणांनी या शुक्रवारी हातात क्रिकेटची बॅट न घेता झाडू हातात घेत पूर्ण गावाचा परिसर स्वच्छ करून ग्रामस्थांच्या आरोग्याला प्राधान्य दिले. त्यांच्या या कार्याचे आजूबाजूच्या गावातील मंडळींही कौतुक करत आहेत.



गावातील रस्ते, मोकळ्या जागेत गवत वाढले होते. कुठे रस्त्याच्या कडेलाच कचरा मोठ्या प्रमाणात साचला होता. या गोष्टींकडे दुर्लक्ष झाले असले तरी आता लोभेवाडी गावातील तरुणांनी एकत्र येत गाव स्वच्छ करण्यासाठी पुढाकार घेतला. 'आपले गाव ही आपलीच जबाबदारी' ही संकल्पना राबविण्याचे त्यांनी पक्के केले आणि तरुणांना गावाचा एक ग्रुप तयार केला. त्यातून तरुणांना गावात स्वच्छता अभियान राबविण्याची माहिती देण्यात आली. त्यानुसार शुक्रवारी (दि.२०) गावातील ३० ते ४० तरूण एकत्र येत गावातील सर्व परिसर स्वच्छ केला.

लोभेवाडी गावात जाणारा मुख्य रस्ता झाडूने स्वच्छ करून गावातील गली बोळात जाऊन साफ सफाई केली. गावात अस्वच्छतेमुळे रोगराई पसरण्याची शक्यता असते, त्यामुळे ही एक दिवस गावाच्या स्वच्छतेसाठी देण्यासाठी नवतरुण मित्र मंडळांनी निर्णय घेतला होता.

**परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा निर्णय** | **प्रवाशांना मिळाला मोठा दिलासा**

# एसटी बंद पडल्यास कोणत्याही बसमधून प्रवास

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एसटी बसमध्ये बिघाड झाल्यास अथवा अपघात झाल्यास प्रवाशांना त्याच तिकिटावर अन्य कोणत्याही एसटी बसमधून (साधी, निमआराम, वातानुकूलित, शिवशाही, ई-शिवाई किंवा शिवनेरी) विनाशुल्क व तातडीने प्रवास करण्याची मुभा देण्यात आली आहे. या प्रवाशांकडून फरकाच्या पैशांसाठी अडवणूक केल्यास अथवा प्रवेश नाकारल्यास कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

शिवशाही, ई-शिवाई, शिवनेरी या बसमध्ये प्रवाशांचा प्रवेश नाकारल्यास किंवा तिकिटाच्या फरकाच्या पैशासाठी अडवणूक केल्यास संबंधित वाहक-चालकांवर कठोर कारवाई करण्याची सूचना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. प्रवाशांसाठी परिवहन मंत्र्यांचा निर्णय स्वागतार्ह आहे.



राज्यात एसटी महामंडळाच्या बसमधून दररोज लाखो प्रवासी प्रवास करतात. एसटी ही खेडोपाडी पोहोचण्याचे साधन असल्यामुळे नागरिकांकडून एसटीच्या प्रवासाला प्राधान्य दिले जाते. अशातच लांब किंवा ग्रामीण मार्गावर प्रवास करत असताना बस अचानक बंद पडली तर प्रवाशांना ताटकळत तासन्तास बसावे लागते. अनेकवेळा निर्मनुष्य, आडवळणावर एसटी बंद पडते. अशावेळी महिला, वयोवृद्ध, मुले एकूणच प्रवाशांचे हाल होतात. पर्यायी बसा उपलब्ध होत नाही, शिवाय अनेक बसेसा जागा नाही सांगून प्रवाशांना बसमध्ये घेण्याचे टाळतात. त्यामुळे प्रवाशांची होणारी गैरसोय पाहता परिवहन मंत्री सरनाईक यांचा निर्णय प्रवाशांसाठी फायदेशीर ठरणार आहे.

### अन्यथा तक्रार नोंदवावी

*एसटी महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाकडून याबाबत सुधारित आदेश जारी करण्यात आले आहेत. त्यानुसार कोणत्याही परिस्थितीत प्रवाशांकडून अधिकचा आकार आकारू नये. त्याच तिकिटावर उच्च श्रेणीच्या बसमध्ये देखील प्रवाशांना प्रवेश देणे बंधनकारक आहे. ग्राहक संरक्षणाच्या दृष्टीने हा प्रवाशांचा कायदेशीर हक्क मानला जात असून, त्याची अंमलबजावणी काटेकोर व्हावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे. तरीदेखील एशियाड, हिरकणी, शिवनेरी, शिवशाही किंवा ई-शिवाई बसमध्ये नियम असूनही प्रवेश नाकारला गेला, तर प्रवाशांनी आगारप्रमुख, वाहतूक नियंत्रक किंवा नियंत्रकांकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.*

### तर वाहक-चालकांवर होणार कारवाई

प्रवासात बस बंद पडली व दरम्यान दुसऱ्या बसच्या चालक-वाहकांनी प्रवाशांना बसमध्ये घेणे नाकारल्यास थेट कारवाईची सूचना केली आहे.

## निवडक



### वांगणी शाळेत 'मार्केट डे' साजरा

**सुकेळी :** राजिप अंतर्गत नागोठणेजवळच असलेल्या वांगणी शाळेमध्ये 'मार्केट डे' या कार्यक्रमाचे सोमवारी (दि.५) आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांकडून अनेक दुकाने मांडण्यात आली होती. यामध्ये चायनीज, वडापाव, मेदुवडा, शिरा, लस्सी स्टॉल, स्वीट कॉर्नर, चटपटी भेळ, ईडली स्टॉल अशा प्रकारची अनेक प्रकारची दुकाने होती. या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती म्हणून रायगड जिल्ह्य परीषदेच्या माजी सदस्या विजया ठाकूर तसेच ग्रुप ग्रामपंचायत वांगणीचे माजी सदस्य एकनाथ ठाकूर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या दुकानांमधून खरेदी करीत विद्यार्थ्यांची मने जिंकत त्यांच्यामध्ये उत्साह निर्माण केला. तसेच गावातील नागरिकांनीदेखील या विद्यार्थ्यांकडून विविध वस्तूंची खरेदी केली. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा संध्या तेलंगे, उपाध्यक्षा मीना तेलंगे, सर्व सदस्य, शिक्षकवर्ग, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ब्राइट क्लासेसचा वर्धापन दिन




**उरण :** उरण-द्रोणागिरी येथील ब्राइट क्लासेसचा ३५ वा वर्धापन दिन साजरा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उरण नगरपरिषद नगरसेविका सायली म्हात्रे व नव भारत इंजिनीअरिंग कन्ट्रकशन कंपनीचे प्रोपायटर के. प्रसन्ना कुमार आदी उपस्थित होते. ब्राइट क्लासेसचे संचालक तथा साउथ इंडियन ग्रुपच्या संस्थापक निशा सुधीर यांनी पाहण्याचे स्वागत केले. या कार्यक्रमात ज्युनिअर केजीपासून १० वीपर्यंतचे सर्व विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले होते. यावेळी सुमारे ३५ डान्स विद्यार्थ्यांनी कोळी नृत्य, साउथ इंडियन, सर्व भाषिकांचे नृत्य सादर केले. बक्षिसे देऊन सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक करण्यात आले. सर्वांना भोजनाची व्यवस्थाही करण्यात आली होती. यावेळी अय्यपा कल्चरल असोसिएशनचे गोपा कुमार, दीपक अय्यर, ब्राइट क्लासेसचे संचालक तथा साऊथ इंडियन ग्रुपच्या संस्थापक निशा सुधीर, पत्रकार, पालक, वर्ग विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.

### रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



**आरोग्य केंद्रात २२५ जणाचे रक्तदान**

**रेवदंडा :** जगतगुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी, दक्षिणपीठ, नाणीजधाम-महाराष्ट्र यांच्या प्रेरणेने, जीवनदान महाकुंभ २०२६ अंतर्गत रक्तदान शिबीर रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्र येथे श्रीमद् रामानंदाचार्च संप्रदायाचे वतीने आयोजित करण्यात आला होता. या रक्तदान शिबीरास एकूण २२५ रक्तदात्याने रक्तदान करून मोठा प्रतिसाद दिला. रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्रात रविवारी (दि.४) जीवनदान महाकुंभ अंतर्गत रक्तदान शिबीर श्रीमद् रामनंदाचार्या नरेंद्राचार्यजी संप्रदाय यांचे प्रेरणेने चौल रामानंद संप्रदाय सेवाकेंद्र यांचे वतीने सकाळी ८ ते रात्री ८ पर्यंत आयोजित करण्यात आला होता. या शिबीरास विद्यश्री चॅरिटेबल ट्रस्ट नवी मुबई ब्लड सेंटर खारघर व विक्रम खोपकर यांचे सहकार्याचे वतीने विशेष सहकार्य लाभले. तर डॉ. भाग्यश्री पाटील, सायली घरत, सिध्दी भगत, प्रचिती काटकर, कृतिका घरत, पुजा कंटक, श्रध्दा घरत, भक्ती घरत, धनश्री घरत, आसिफ शेख यांचे सहकार्य लाभले.

### तळा येथून पदयात्रा निघाली शिर्डीला



**तळा :** तळा शहरातून पायी पदयात्रा श्री क्षेत्र शिर्डीला साईबाबांच्या भेटीसाठी रवाना झाली. सकाळी दहाच्या सुमारास साई मंदिरातून पालखीचे प्रस्थान झाले व ग्रामदेवी चंडिकामातेचे दर्शन घेऊन पायी पदयात्रा मार्गस्थ झाली. पायी पदयात्रेचे हे अठरावे वर्ष असून दरवर्षीप्रमाणे जानेवारीमध्ये निघणारी पायी पदयात्रेची शिर्डीच्या दिशेने वाटचाल सुरु झाली आहे. साईबाबांची पालखी खांद्यावर घेऊन 'ओम साई जय साई'च्या जयघोषात पालखी शिर्डीकडे मार्गस्थ झाली. दि.१६ ते १८ जानेवारी रोजी तळा तालुक्यात साईबाबांची झोळी दर्शन कार्यक्रम व १९ जानेवारी रोजी सकाळी ६ वा. काकड आरती, साई संत चरित्राचा अखंड पारायण, ९ वा. श्री साई पालखी मिरवणूक, रात्री १० वा. भजन, शनिवार दि.२० जानेवारी रोजी सकाळी ९ वा. महापूजा, होमहवन, दुपारी १ वाजता महाप्रसाद, सायंकाळी ७ वा. आरती, रात्री ९.३० वा. भजन असे कार्यक्रम पार पडणार आहेत.

### धिरेंद्र ठाकूर यांना पुरस्कार प्रदान



**उरण :** पाणदिवे, उरणचे रहीवासी सुप्रसिद्ध शिवव्याख्याते सह्याद्रीरत्न धिरेंद्र ठाकूर यांना या वर्षीचा राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. ॲड. महेश मधुकर ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अलिबाग येथे विविध क्षेत्रातील उल्लेखनीय काम करणाऱ्या राज्यभरातील गुणीजनांचा आमदार भाई जगताप, आ. जयंत पाटील, प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांच्या उपस्थितीत शिवव्याख्याते धिरेंद्र ठाकूर यांना सन्मानित करण्यात आले. सन्मानाची शाल प्रशस्तीपत्रक आणि स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. शिवव्याख्याते म्हणून गेले कित्येक वर्ष शिवविचारांचा जागर विविध कॉलेज, शाळा, मंडळे, तालुके, जिल्ह्यात ते करत आहेत. कधीही गड न पाहिलेल्या शेकडो श्रोत्यांनी त्यांच्या व्याख्यानाने प्रेरित होऊन रायगडाचे दर्शन घेतले. हे त्यांच्या व्याख्यानाचं विशेष मानलं जातं. शिवजयंतीच्या दिवशी सलग चार-पाच व्याख्यान देण्याचे भूषणावह काम ते करत आहेत. या कार्यक्रमात राज्यभरातून आलेल्या उपस्थितांच्या समोर शिवविचारांचा जागर घालण्यासाठी आयोजकांनी धिरेंद्र ठाकूर यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

# जिल्ह्यात पंचायतराज अभियान सुरू

## ● ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग; ग्रामपंचायतीकडून विविध उपक्रम






**| अलिबाग | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यामध्ये पंचायतराज अभियान सुरू करण्यात आले आहे. प्रशासकीय क्षमता अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने या अभियानाची अंमलबजावणी केली जात आहे. या अभियानाला जिल्ह्यातून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची संपूर्ण रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या नेतृत्वाखाली प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अभियानांतर्गत पथकाने अलिबाग, माणगाव, रोहा, पेण, उरण, पनवेल, मुरूड, कर्जत, महाड, तळा, म्हसळा, श्रीवर्धन, पोलादपूर, खालापूर, सुधागड या तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींना भेटी दिल्या.

या उपक्रमाचा उद्देश ग्रामीण विकासाची गती वाढवणे, योजना प्रभावीपणे राबविणे आणि ग्रामपंचायतींची प्रशासनिक क्षमता अधिक सक्षम बनविणे हा आहे. भेटी दरम्यान पथकाने ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती घेतली तसेच नागरिकांच्या गरजा, उपलब्ध सुविधा आणि आवश्यक उपाययोजनांचा आढावा घेतला.

### अभियानांतर्गत निरीक्षण केलेले मुद्दे

- ग्रामपंचायतीची प्रशासनिक क्षमता वाढविणे
- विविध विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी
- सर्वांगीण ग्रामीण विकासाला चालना
- स्थानिक महसूल व आर्थिक स्त्रोतांची मजबुती
- ग्रामसभांच्या माध्यमातून नागरिकांचा वाढता सहभाग
- डिजिटल प्रशासन व ई-गव्हर्नन्सचा वापर
- पर्यावरणपूरक व शाश्वत विकास उपक्रमांची अंमलबजावणी
- पारदर्शी, उत्तरदायी आणि लोकाभिमुख स्थानिक शासन.

> मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अत्यंत प्रभावीपणे राबविले जात असून या अभियानाला ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींसह सर्व ग्रामस्थांनीही एकत्र येऊन अजून जिद्दीने काम करून राज्यात रायगड जिल्ह्याला प्रथम पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल यासाठी प्रयत्न करूया.
> – नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद

या अभियानांतर्गत पथकाने अलिबाग तालुक्यातील बोरिस-गुंजीस, वरसोली, आवास, वडगाव, सारळ या ग्रामपंचायतींना भेट दिली. त्याचप्रमाणे माणगाव तालुक्यातील भागड, तळाशेत, चांदोरे, गोरेगाव, भाले, वरची वाडी; मुरूड तालुक्यातील भोईघर, काशिद, नांदगाव, कोर्लई, साळाव; रोहा तालुक्यातील नागोठणे, वाशी, रोठ बुद्रुक, धाटाव, आंबेवाडी ; म्हसळा तालुक्यातील साळविंडे, खरसई, कणघर, पळसप, खामगाव, केलटे; पोलादपूर तालुक्यातील तुर्भे खुर्द व पाले; महाड तालुक्यातील तळोशी, घुरुपकोंड, चंभरखिंड, वरसगाव, वरंध ; श्रीवर्धन तालुक्यातील वडवली, दिवेआगर, शेखाडी, कोलमंडला, गाणी, रानवली तर तळा तालुक्यातील वाशी हवेली, रहाटाड, भानंग, उसरखुर्द व पन्हेळी ; खालापूर तालुक्यातील चौक या ग्रामपंचायतींना पथकाने भेटी दिल्या. ग्रामपंचायतीमार्फत स्वच्छता, सीसीटीव्ही, कचऱ्याचे योग्य नियोजन, स्वच्छ पाणी पुरवठा, महिलांच्या आर्थिक स्वावलंबन व सक्षमीकरणाला बळ यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. त्याचप्रमाणे ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यात आली.

## महागणपतीच्या दर्शनाला भक्तांची गर्दी



**चिरनेर** : उरण तालुक्यातील चिरनेर येथील श्री महागणपती येथे अंगारकी संकष्टी चतुर्थीच्यानिमित्ताने मंगळवारी (दि.६) हजारोंच्या संख्येने आलेल्या भाविकांनी प्राचीन जागृत श्री महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. पहाटे चार वाजता मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले. यावेळी प्रथम श्री महागणपतीची महापूजा झाली. त्यानंतर मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले. दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाचा जयघोष करीत, भक्तीमय वातावरणात दर्शन घेतले. या गणरायाच्या दर्शनासाठी भाविकांची नेहमीच गर्दी असते. भाविकांना रांगेत सुरळीत दर्शन मिळावे, यासाठी चिरनेर गणपती देवस्थानच्या वतीने चोख व्यवस्था ठेवण्यात आली होती.

## नेरळमध्ये ममता दिन साजरा



**नेरळ** : शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पत्नी आणि शिवसैनिकांच्या माँसाहेब म्हणून समजल्या जाणाऱ्या मीनाताई ठाकरे यांची जयंती शिवसेना शहर मध्यवर्ती कार्यालयात साजरा करण्यात आला. शिवसेना ठाकरे पक्षाचे ममता दिनानिमित्त नेरळ गावातील जिल्हा परिषद शाळांना खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी शिवसेना शहर प्रमुख बंडू क्षीरसागर, प्रथमेश मोरे, संतोष सारंग, संदेश लाड, बाबू चव्हाण, सुजाता मोहिते, प्राची मनवे, संजय कांबळे, कल्पना चव्हाण, रसिका शेलार, मेघा बैकर, सुनिता मोरे, सचिन चित्रे, रमेश पवार, अशोक पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## बोकडविरा येथे सावित्रीबाईंना अभिवादन




**उरण** : सावित्रीबाई फुले जयंती निमित्ताने अखिल भारतीय जनवादी महिला संघटना रायगड जिल्ह्याच्या वतीने कामगार भवन बोकडविरा उरण येथे अभिवादन सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी रजनी पाटील, निरा घरत यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून षुष्पहार अर्पण केला. जनवादी महिला संघटनेच्या अध्यक्षा सविता पाटील, गिता पाटील, लता पाटील यांनी सावित्रीबाई फुलेचीं ओवी गाऊन सभेला सुरूवात केली. सभेला कूसुम ठाकूर, संजय ठाकूर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास हेमलता पाटील, प्रियेशा राजेश पाटील, उषा म्हात्रे, जयवंती भगत, गुलाब टावरी आदी महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हमरापुर ते पाली पदयात्रा



**हमरापूर** : पेण तालुक्यातील हमरापुर विभागातील हमरापूर विभाग श्री गणेश मूर्तिकार उत्कर्ष मंडळ यांच्यातर्फे पाली पदयात्रचे आयोजन करण्यात आले. दरवर्षी हमरापुर विभाग श्री गणेश मूर्तिकार उत्कर्ष मंडळातर्फे विभागातून पायी पदयात्रा पाली येथील श्री गणेश बल्लाळेश्वराच्या चरणी मंदिरा पर्यंत नेली जाते. सदर पदयात्रेत हमरापुर विभाग श्री गणेश मूर्तिकार मंडळाचे अध्यक्ष सचिन पाटील, सुनील मोकल, सत्यजित पाटील, रवींद्र पाटील, कुणाल पाटील, जयेश पाटील, किशोर पाटील, कृष्णा गोलिमडे, देविदास नाईक, सतीश पाटील ( कळवे), प्रकाश भगत, नितीन मोकल, बल्लाळ पाटील, मितेश पाटील यांच्यासह शेकडो मूर्तिकार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## वजरोली येथील आजी बेपत्ता

**| कोलाड | प्रतिनिधी |**



रोहे तालुक्यातील वजरोली या गावात राहणाऱ्या ७५ वर्षीय आजी घरातूनच बाहेर निघून गेल्या आहेत. तरी परिसरात कोणाला आढळून आल्यास पोलीसांशी संपर्क साधावा असे अहवान करण्यात आले आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी की, वासंती वसंत बंडागले, वय वर्ष ७५ राहणार वजरोली, पाटणसइ तालुका रोहा या शुक्रवारी घरातून बाहेर निघुन गेल्या आहेत त्या आजपावेतो घरी परत आलेल्या नाहीत. तरी मिसिंग आजीचे वर्णन कमरेतून वाकलेली बांदा सडपातल रंग नीम गोरा, केस पांढरे अंबाडा घातलेला, निल्या रंगाची साडी पांढरा रंगाची फुले असलेली, गुलाबी रंगाचा ब्लाऊज, कानात सोन्याची कर्ण फुले, गळ्यामध्ये सोन्याची एक डाव व मनी, असलेले पायात जोडवी प्लास्टिक चप्पल असे वर्णन असून तरी अशा वर्णाची ७५ वर्षाची आजी कुठे आढळल्यास त्यांनी लगेचच कोलाड नागोठणे पोलीस स्टेशन जवळ संपर्क साधावा असे आहवान पोलिसांनी केले आहे.



वर्षातील पहिल्या अंगारकी चतुर्थीनिमित्त पनवेलच्या भारत नाका येथील ज्येष्ठराज सिद्धिविनायक श्री गणेश मंदिरात पहाटेपासून दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. (छायाचित्रः राजेश डांगळे)

## पालीत भाविकांची मांदियाळी

### बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी गर्दी

**| पाली | प्रतिनिधी |**



वर्षातील पहिल्या अंगारकी चतुर्थी निमित्त अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी मंगळवारी (दि.०६) भाविकांनी गर्दी केली होती. मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते. भाविकांमुळे येथील हॉटेल व्यावसायिक व दुकानदारांचा धंदा चांगला झाला.

बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रभरातून भाविक दाखल झाले होते. दर्शनासाठी काही भाविक पायी आले, तर काही भाविकांनी पायी दिंडी आणली होती. संकष्टी चतुर्थीनिमित्त मंदिराला विद्युत रोषणाई व आकर्षक फुलांची सजावट केली होती. मंदिरात व मंदिराबाहेर सुबक रांगोळ्या देखील काढल्या आहेत. मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. भाविकांच्या सोयीसाठी देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली आहे. भाविकांच्या वाहनामुळे पालीत काही ठिकाणी वाहतूक कोंडी झाली होती. मात्र वाहतूक पोलीस तसेच मंदिर ट्रस्टचे सुरक्षा रक्षक वाहतुक सुरळीत करण्याचा प्रयत्न करीत होते.

> संकष्टी चतुर्थी असल्यामुळे बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. आलेल्या भाविकांनी वेगवेगळ्या प्रकारची खरेदी देखील केली. त्यामुळे व्यवसाय चांगला झाला.
> –राहुल मराठे, दुकानदार

## प्रा.हेमंत जाधव यांचा सत्कार

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या नागोठण्यातील बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. हेमंत जाधव यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने घेतलेल्या मौखिक परीक्षेत ग्रंथपाल व माहितीशास्त्र विषयात पीएचडी. प्रदान केली. त्याबद्दल त्यांचे प्रधान महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून त्यांचा सत्कार केला. त्यांनी डॉ. के. ओ. मांडगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंध विद्यापीठास सादर केला होता. त्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य व पी. एच. डी. मार्गदर्शक प्रा. डॉ. मांडगावकर यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. यांच्या यशाबद्दल कोकण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. सिद्धार्थ पाटील, कार्यवाह ॲड. पल्लवी पाटील, संजय पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक खोपकर, प्राचार्य डॉ. दिनेश भगत, प्रा. डॉ. संदेश गुरव, यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## महाआरोग्य शिबिराचे आयोजन

**नवीन पनवेल** : सिमा नारायण तांबोळी यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ. आर. एन. पाटील सूरज हॉस्पिटल, सानपाडा नवी मुंबई, डॉ. आर झुनझुनवाला शंकरा हॉस्पिटल नवीन पनवेल तसेच नारायण लक्ष्मण तांबोळी सामाजिक संस्था, नेरे यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत महाआरोग्य शिबिर, उपचार व औषध वाटप कार्यक्रमाचे आयोजन नेरे येथे करण्यात आले होते. या शिबिरात मेंदू विकार, मणक्यांचे आजार, मानसिक विकार, हृदयविकार यासह विविध आजारांवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व मार्गदर्शन करण्यात येण्यात आले व मोफत औषधाचे वाटप करण्यात आले.

या शिबिरासाठी डॉ. आर. एन.पाटील, डॉ. उदय पाटील, डॉ. रमा पाटील, डॉ. अंजली पाटील, डॉ.आर झुनझुनवाला शंकरा हॉस्पिटल व त्यांची टीम, नवीन पनवेल तसेच सूरज हॉस्पिटलचे तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित होते.

## रस्त्याच्या दुरावस्थेविरुद्ध पोलीस मित्र संघटनेतर्फे उपोषण

**| नेरळ | प्रतिनिधी |**



कर्जत तालुक्यातील कर्जत कोंडीवडे राज्यमार्ग रस्त्याची दुरावस्था झाली आहे. या रस्त्यावरील खड्डे भरून रस्ता सुस्थितीत आणण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग करणार होते. हे आश्वासन सार्वजनिक बांधकाम खात्याने पाळले नसल्याने पोलीस मित्र संघटनेने पुन्हा उपोषण सुरू केले आहे.

कर्जत -खालापूर तालुक्यातील रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते रमेश कदम यांचे उपोषण सुरू केले होते. त्यावेळी दोन्ही तालुक्यातील सर्व रस्ते पावसाला संपताच सर्व खड्डेमुक्त केले जातील असे आश्वासन सार्वजनिक बांधकाम विभाग, राज्य रस्ते विकास महामंडळ आणि मुंबई महानगर विकास प्राधिकरण यांनी दिले होते. मात्र, रस्त्यांची दुरुस्तीची कामे केली नाही. त्यामुळे पोलीस मित्र संघटने चे कोकण कदम यांनी उपोषणाला सुरुवात केली. आश्वासनाची पुर्तता झाली नाही आणि त्यामुळे अनेक रस्त्यावर अनेक वाहन चालकांचे जिवघेणे अपघात होऊन जिवीतहानी होत आहे. कर्जत खालापूर तालुक्यातील सर्व रस्त्यावर कार्पेट डांबरीकरण सुरू होत नाही, तोवर उपोषण सुरूच राहणार असा निर्धार त्यांनी केला आहे.

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- बागायती वाडी विक्री -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव-थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- मंगल ग्रेन स्टोअर्स, बाजारपेठ, अलिबागमध्ये packing व Delivery साठी मूल मुली पाहिजेत. Contact No : 7875990092
- अलिबाग कोकोनट रिसॉर्टसाठी वेटर व हाऊसकीपिंग कामासाठी मुलांची गरज आहे. इच्छुकांनी खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.+९१९९७००४१५७९ पत्ता: अलिबाग कोकोनट रिसॉर्ट, हॉटेल शालीमारच्या समोर, अलिबाग, रायगड.
- For office in Alibag Vacancy for office staff Attractive salary For interview call 9923750549
- पाहिजेत– अलिबाग येथे ऑफिसमध्ये कॉम्प्युटर ऑपरेटर/ ऑफिस असिस्टंट पाहिजे. संपर्क : श्री. मधुकर पाटील ९२७३२८९०१५/९४२०३२५१०६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### अत्याधुनिक इमारत उभारण्यात येणार | उल्लेखनीय काम करणाऱ्यांचा सत्कार

## आक्षी गावात उभे राहणार आरोग्य उपकेंद्र

**| अलिबाग | प्रतिनिधी |**



अलिबाग तालुक्यातील आक्षी गावात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाप्रमुख शंकर गुरव यांच्या प्रयत्नाने आरोग्य उपकेंद्र मंजूर झाले असून, या उपकेंद्राचे भूमिपूजन शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हा संपर्क प्रमुख प्रसाद भोईर व माजी जिल्हा परिषद सदस्य द्वारकानाथ नाईक यांच्या हस्ते सोमवारी (दि.५) करण्यात आले. या भूमिपूजन सोहळ्यानिमित्त गावातील सेवानिवृत्ती व विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या नागरिकांचा सत्कार करण्यात आला.

आक्षी गावाची लोकसंख्या सुमारे २ हजार ९०० असून, गांवात मासेमारी नौकांवर, हॉटेल, कॉटेज तसेच विविध रोजगारासाठी सुमारे दोन हजार ५०० नागरिक इतर जिल्ह्यातून व परराज्यातून आले आहेत. त्यामुळे गावात सरकारी दवाखाना असावा अशी मागणी ग्रामस्थ करीत होते. गुरव यांनी याबाबत शासकीय पातळीवर सातत्याने पाठपुरावा करीत, आक्षी येथे उपकेंद्र मंजूर करून घेतले. या उपकेंद्रासाठी अत्याधुनिक इमारत उभारण्यात येणार आहे.

यावेळी सरपंच रश्मी पाटील, उपसरपंच आनंद बुरांडे, सतीश पाटील, प्रशांत मिसाळ, अजित पाटील, कृष्णा कडवे, धनंजय गुरव, स्नेहल देवळेकर, संदिप पालकर, श्वेता पालकर, अश्लेक्षा नाईक, हरिश्चंद्र नाखवा, हरिश्चंद्र बामजी, वासुदेव नाखवा, सुनील नाईक, नेहा नाईक, विष्णू बानकर, अरुण ठाकूर, नागेश पेरेकर यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> गावातील आरोग्य सेवेतील गरज ओळखुन शंकर गुरव यांच्या प्रयत्नाने गावात आरोग्य उपकेंद्र मंजूर झाले आहे. या उपकेंद्रामुळे गावातील नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत.
> – प्रसाद भोईर, शिवसेना ठाकरे गट जिल्हा संपर्कप्रमुख

> गावात आरोग्य केंद्राची उणीव होती. ही उणीव शंकर गुरव यांच्या प्रयत्नांनी भरून निघणार आहे. नागरिकांना गावात स्वस्त दरात आरोग्य सुविधा उपलब्ध होईल.
> –द्वारकानाथ नाईक माजी जिल्हा परिषद सदस्य

## मातोश्री वृध्दाश्रमात मिठाईचे वाटप

**पोलादपूर** : आद्यपत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या दर्पण वृत्तपत्राचा वर्धापनदिनानिमित्त मराठी पत्रकार दिनी स्व.मॉसाहेब तथा मीनाताई ठाकरे यांची जयंतीचे औचित्य साधून मातोश्री वृध्दाश्रम कोंडीवते येथे साजरा करण्यात आला. यावेळी मिठाईचे तसेच शाल वाटप करण्यात आले. याप्रसंगी मातोश्री वृध्दाश्रमातील स्वराज्य निवारा सेंटरचे संचालक अनिकेत यांनी काही वर्षांपूर्वी आश्रमाची बदनामी करण्याचा प्रयत्न झाला तेव्हा आमच्या पाठिशी पत्रकार सुरेश शिंदे ठामपणे उभे राहिले, असे सांगून पत्रकार दिनाच्या सर्व उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी प्रल्हाद ठाकूर, अशोक उमरठकर तसेच पाटणे आदी पत्रकार बांधव उपस्थित होते.

## पिल्लईत शिक्षकांसाठी बूटकॅम्पचे आयोजन

**रसायनी :** रसायनी येथील पिल्लई एचओसी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (स्वायत्त) येथे टप्पा एक नवोपक्रम, डिझाईन व उद्योजकता बूटकॅम्प पीएम श्री शाळांतील प्राचार्य व शिक्षकांसाठी शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व शिक्षण मंत्रालयाच्या नवोपक्रम कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने पीएम श्री शाळांतील प्राचार्य व शिक्षकांसाठी तीन दिवसीय ''नवोपक्रम, डिझाईन व उद्योजकता बूटकॅम्प'' चे आयोजन करण्यात आले होते. हा बूटकॅम्प उद्योजकता शिक्षणासाठी प्रसिद्ध असलेल्या वाधवानी फाउंडेशन यांच्या सहकार्याने राबविण्यात आला.

---

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय काँग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड**
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र. जिउनि/गृह/मोफा/नियो/जाहीर नोटीस/४/सन २०२६ दिनांक :- ०५/०१/२०२६

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम १० (१) अन्वये प्राप्त अर्जावरील नोटीस

अर्जदार नियो. श्री साईचरण सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., जुना सर्व्हे नं. ५१, हिस्सा नं. ३, नवीन सर्व्हे नं. ३७१, हिस्सा नं.३, मौजे नेरळ,ता.कर्जत, जि. रायगड तर्फे मुख्यप्रवर्तक श्री नितेश लक्ष्मण बडेकर, ता. कर्जत, जि. रायगड यांनी मेसर्स श्री साई बिल्डर्स तर्फे भागीदार श्री अजितकुमार गणपतराव कागदे, श्री अशोक दत्तात्रेय कुलकर्णी, रा. त्रिमूर्ती बंगला, श्री समर्थ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. मराठा मंदिर हॉल समोर, फुले रोड, डोंबिवली, जि. ठाणे- ४२१२०१, जागामालक, सुरेश त्रंबक कारूळकर, सौरभ सुरेश कारूळकर, रा. मौजे नेरळ, कुंभार आळी, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड यांचे विरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम १० (१) अन्वये संस्था नोंदणीचे निर्देश मिळणेकरीता अर्ज केला आहे.

अर्जदाराचे अर्जाबाबत सर्व संबंधितांना आपले म्हणणे सादर करणेसाठी संधी मिळावी म्हणून या कार्यालयाने सुनावणी घेतली आहे. त्यामध्ये सदर अर्जाबाबत गैरअर्जदार यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतीम संधी देण्यांत येत असून त्यांनी प्रस्तावित कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक २२/०१/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग सही/-
दिनांक : ०५.०१.२०२६ **(त.सं.पाटील)**
सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, रायगड अलिबाग

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णनाच्या जमीन व घर मिळकती मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन सर्व हक्कांगासह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १) चिकणी, ता. मुरूड, जि. रायगड | १०/३/अ /३/२ | ०-२६-२० पो.ख. ०-०१-३० एकूण ०-२७-५० पैकी क्षेत्र ०-०५-५० | ५.७८ | निर्मला अशोक जैन |
| २) चिकणी ता. मुरूड जि. रायगड | ११/१/ब | ०-२४-३० पो.ख. ०-००-५० एकूण ०-२४-८० | ५.१२ | १) छगनलाल लालचंद जैन २) निर्मला अशोक जैन |
| ३) चिकणी ता. मुरूड जि. रायगड | ११/२ | ०-४०-५० पो.ख. ०-०१-२० एकूण ०-४१-७० पैकी क्षेत्र ०-२०-०० | ९.४४ | १) छनगलाल लालचंद जैन २) निर्मला अशोक जैन |
| ४) चिकणी ता. मुरूड जि. रायगड | ११/२ | ०-४०-५० पो.ख. ०-०१-२० एकूण ०-४१-७० पैकी क्षेत्र ०-०७-०० | ९.४४ | छगनलाल लालचंद जैन |

तसेच वर नमुद मिळकतीतील ग्रुप ग्रामपंचायत काशीद मालमत्ता क्र. २२३, क्षेत्र ४८. १४ चौ.मीटर व मालमत्ता क्र. १२४, क्षेत्र १७७.८१ चौ. मीटर या घर मिळकतींसह

सदरहू जमीन व घर मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०६/०१/२०२६ **(अॅड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता- श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल श्री. मोहम्मद नईम दिलावेर अब्बास रतनानी यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत त्याचे मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे साळोख तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| १) श्री. मुनवर हाजीमिया बुबेरे व इतर | ११२ | ६/क | ०-२४-२५ | ०-२३ |

सदरील जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास त्यांनी सोडुन दिलेला आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : नेरळ खरेदीदारा तर्फे ॲडव्होकेट
दि. ०६/०१/२०२६ सही/-
**ॲड. साकीब अशरफ पानसरे**
ऑफीस शॉप नं. ३८, पहिला मजला, बी-विंग,
तुलसी सेंटर पॉईंट, रेल्वे स्टेशन जवळ, खांडा, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१
मो.८०८७७७०५२५/९०११५००२३५

---

**ग्रुप ग्रामपंचायत कविलवहाळ बु**
**ता. माणगाव.जि.रायगड**

जा.क्र दि.०६/०१/२०२६

### जाहिरात

ग्रुप ग्रामपंचायत कविलवहाळ बु. ता.माणगाव, जि. रायगड येथे महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. व्हीपीएम २६९९/प्र.क्र.२०६(१)/२१ दि २१ जानेवारी २००० रोजीचे शासन निर्णयानुसार निश्चित करणेत आलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार ग्रामपंचायत कविलवहाळ बु करिता शिपाई कर्मचारी या रिक्त पदा करिता स्थानिक पात्र इच्छुक उमेदवारांकडून दि.१४/०१/२०२६ पर्यंत विहित अटी व शर्तीस अधीन राहणेच अटीवर उमेदवारी अर्ज मागविणेत येत आहेत.

सदर पदाकरिता आवश्यक पात्रता व अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.
शैक्षणिक पात्रता :- किमान १२ वी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक, उच्च शिक्षण, संगणक ज्ञान, मराठी टायपिंग असलेल्यास प्राधन्य देण्यात येईल.
वयोमर्यादा :- वयोमर्यादा किमान १८ वर्षे कमाल ३३ वर्ष
वेतन व भत्ते :- किमान वेतन ११६२५/- + विशेष राहणीमान भत्ता+ भविष्यनिर्वाह निधीचे अंशदान

**अटी व शर्ती :-**
१) अर्जदार स्थानिक रहिवासी असणे आवश्यक आहे. त्याबाबत अर्जासोबत पुरावे जोडणे आवशयक आहे.
२) पदाकरिता निश्चित करणेत आलेल्या शैक्षणिक पात्रतेबाबतचे रीतसर दस्त ऐवज अर्जासोबत सादर करावेत...
३) उमेदवारांनी वयाबाबत जन्मदाखला किंवा वय सिद्ध करणारा पुरावा सादर करावा.
४) मुंबई ग्रामपंचायत नोकराबाबत (सेवेच्या शर्ती) नियम १९६० नुसार विहित करण्यात आलेले नियम/सेवा शर्ती सदर पदासाठी लागू राहतील त्याबाबतचे बंध पत्र सदर पदावर नियुक्ती झाल्यावर ५००/- रुपयाचे मुद्रांकावर लिहून द्यावे लागले.
(५) उमेदवारी अर्ज दि. १४/०१/२०२६ पर्यंत सायंकाळी ५.०० वा या कार्यालयीन वेळेत सादर करणे आवश्यक राहील. त्यानंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत
६) सदर पदाकरिता निवड करणेत आलेल्या उमेदवारांस लेखी नियुक्तीपत्र देणेत येईल.
७) सदर पदाच्या निवडीबाबतचे सर्व अधिकार ग्रामपंचायत कविलवहाळ बु यांस राहतील.

**ग्रामसेवक** — **ग्रुप ग्रामपंचायत कविलवहाळ बु ता.माणगाव.जि.रायगड**
**सरपंच** — **ग्रुप ग्रामपंचायत कविलवहाळ बु ता.माणगाव.जि.रायगड**

---

**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
**(भारत सरकारचा उपक्रम)**
सादर सेवा
**ई-निविदा आमंत्रण सूचना**

मुख्य वाणिज्य व्यवस्थापक, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या वतीने, इच्छुक पक्षांकडून आयआरईपीएस ई-निविदा प्रणालीद्वारे "कोकण रेल्वेवरील रत्नागिरी स्थानक येथे रेल आर्केडची उभारणी, संचालन व व्यवस्थापन" या कामासाठी खालील वेळापत्रकानुसार खुल्या निविदा मागविण्यात येत आहेत: **निविदा सूचना क्रमांक: सीओ-16034/4/2025-सीओएमएम, निविदा वेळापत्रक - निविदा अर्ज विक्री कालावधी :** 05/01/2026 ते 28/01/2026, **निविदा सादर करण्याची अंतिम तारीख :** 28/01/2026 रोजी सायं. 17:00 वाजेपर्यंत, **निविदा उघडण्याची तारीख :** 28/01/2026 रोजी सायं. 17:30 वाजता. अधिक माहितीसाठी www.ireps.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

---

## ग्रुप ग्रामपंचायत जासई

मु. पो. जासई, ता. उरण, जि. रायगड

### जाहिर निविदा

ग्रुप ग्रामपंचायत जासई अंतर्गत खालील कोष्टकात नमुद केलेल्या निधितून वस्तू खरेदी कामी मान्यता प्राप्त पुरवठादारांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत.


| अ. नं | कामाचे नाव | निधी उपलब्धता | अंदाजपत्रकीय रक्कम | १% इसारा रक्कम | टेंडर फॉर्मची किंमत | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत कार्यालय इमारतीवर सोलर सिस्टम बसविणे | ग्रामनिधी सन २०२५/२०२६ | ४,००,०००/- | ४,०००/- | ५००/- | ३ महिने |
| २ | रा.जि.प. मराठी शाळा जासई इमारतीवर सोलर सिस्टम बसविणे | ग्रामनिधी सन २०२५/२०२६ | ४,००,०००/- | ४,०००/- | ५००/- | ३ महिने |
| ३ | डुंबा अदिवासी वाडी येथील १ ते ५ घरकुलांना सोलर सिस्टम बसविणे | ग्रामनिधी सन २०२५/२०२६ | ५,००,०००/- | ५,०००/- | ५००/- | ३ महिने |
| ४ | वॉर्ड क्रमांक ३ मधील जासई येथील गणेश बाळकृष्ण पाटील यांचे शेतापासून ते जोमा म्हात्रे यांचे शेतापर्यंत गटार बांधणे | ग्रामनिधी सन २०२५/२०२६ | ७,७५,०४४/- | ७,७५०/- | ५००/- | ३ महिने |
| ५ | वॉर्ड क्रमांक ३ मधील जासई येथील जोमा म्हात्रे यांचे शेतापासून ते हरिश्चंद्र पाटील यांचे शेतापर्यंत गटार बांधणे | ग्रामनिधी सन २०२५/२०२६ | ८,०५,६९०/- | ८,०५६/- | ५००/- | ३ महिने |
| ६ | वॉर्ड क्र.३ मधील अजित म्हात्रे यांचे घरापासून ते राजेंद्र म्हात्रे यांच्या घरापर्यंत रंगीत पेव्हर ब्लॉक बसविणे | ग्रामनिधी सन २०२५/२०२६ | १,७४,१०७/- | १.७४१/- | ५००/- | ३ महिने |
| ७ | ग्रुप ग्राम पंचायत जासई कार्यालयाचे छप्पर दुरूस्ती व पाण्याची दुरुस्ती करणे. | ग्रामनिधी सन २०२५/२०२६ | ४,९९,६७८/- | ४,९९६/- | ५००/- | ३ महिने |
| ८ | जासई येथील जुने पंचायत कार्यालय (उप जिल्हा रूग्णालय) रंगरंगोटी करणे. | ग्रामनिधी सन २०२५/२०२६ | ५२,६९२/- | ५२६/- | ५००/- | ३ महिने |
| ९ | जासई रेल्वे कॉलनी येथे ओपन जिम साहित्य बसविणे | १५ वा वित्त आयोग सन २५/२६ अबंधित | २,००,०००/- | - | - | ३ महिने |
| १० | बंजारवाडी माऊली नगर येथे नामफलक लावणे | १५ वा वित्त आयोग सन २५/२६ अबंधित | ६४,६९०/- | - | - | ३ महिने |
| ११ | कार्बोलिक व हार्बल पावडर जंतूनाशक औषधे खरेदी करणे | १५ वा वित्त आयोग सन २५/२६ अबंधित | ५३,४४६/- | - | - | ३ महिने |
| १२ | ग्रामपंचायत जासई येथे योगा शिबीर आयोजन करणे | १५ वा वित्त आयोग सन २५/२६ अबंधित | ५०,०००/- | - | - | ३ महिने |
| १३ | ग्रामपंचायत हद्दीतील महिलांना रोजगार निर्मिती कामी प्रशिक्षण देणे | ग्रामनिधी सन २०२५/२०२६ | ३,००,०००/- | - | - | ३ महिने |
| १४ | ग्रामपंचायत हद्दीतील दर्शनी भागावरील बोलक्या भिंती रंगविणे | ग्रामनिधी सन २०२५/२०२६ | १,००,०००/- | - | - | ३ महिने |
| १५ | राष्ट्र पुरूष/थोर व्यक्ती यांच्या प्रतिमा खरेदी करणे व फिटींग करणे | ग्रामनिधी सन २०२५/२०२६ | १,००,०००/- | - | - | ३ महिने |

**अटी व शर्ती**
१. दरपत्रक मोहोर बंद पाकिटात मा. सरपंच, ग्रामपंचायत जासई याचे नावे दिनांक ०७/०१/२०२६ ते १२/०९/२०२६ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्विकारण्यात येतील.
२. नोंदणीकृत तसेच GST धारक पुरवठादार असावा.
३. कोणत्याही एक किंवा सर्वच निविदा स्विकारण्याचा किंवा नाकरण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.
४. ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दिनांक १३/०९/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा. सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.
५. कोणत्याही नामंजूर निविदेसंदर्भात संबंधीत ठेकेदारास कुठलाही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
६. सदर खरेदी वस्तूंची किमत हि PFMS प्रणाली द्वारे अदा करण्यात येईल.

ठिकाण:- जासई
दिनांक :- ०७/०९/२०२६
**ग्राम पंचायत अधिकारी** — **ग्रुप ग्राम पंचायत जासई**
**सरपंच** — **ग्रुप ग्राम पंचायत जासई**

---

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

---

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री.हिराचंद अंबाजी पिंगळे रा.अंकित अपार्टमेंट, दुसरा मजला, फ्लॅट नं.७, चेंढरे ता.अलिबाग जि.रायगड यांच्याकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरवले आहे. तशी जमिन मालकांबरोबर बोलणी झालेली आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| कुदे, ता.अलिबाग जि.रायगड | १६२ | एकूण ०-३०-०० | ०.६४ |

सदर मिळकतीवर कुणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षीस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, मुदतीत आमच्याकडे न आल्यास वरील मिळकतीवर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे व सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहित आहेत असे गृहित धरून सदरहू मिळकतीसंबंधी आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार करतील. मुदतीचे बाहेर आलेल्या कुणाच्याही, कोणत्याही प्रकारच्या हरकती/तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग सही/-
दिनांक : ०६/०१/२०२६ **ॲड.नंदकुमार पां.तांबडकर**
जिल्हा न्यायालय, अलिबाग
मु.पो.सुडकोली
ता.अलिबाग जि.रायगड
मो.नं. ९०११७७९०८१

---

### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालक श्री. मुफद्दर मुराद डोंगरे, यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे कळंब, ता. कर्जत, जि.रायगड.**

| स. नं./हि. नं. | एकुण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|
| १२२/३/ब | खाता क्र.१९०४ मधील लिहुन देणार यांचे मालकीचे एकुण विक्री क्षेत्र ००-२१-०० हे. आर. पॉ. | ०-२३ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. ०६/०१/२०२५ **ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

---

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे मिरचोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक श्री. संदीप दत्तात्रय केळकर यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २८ | २ | एकुण क्षेत्र ०-३४-०० पैकी विकत देणार यांचे मालकीचे विक्री केलेले क्षेत्र ०-०१-९४ | ०-०२ |
| २८ | ३ | एकुण क्षेत्र ०-९६-०० पैकी विकत देणार यांचे मालकीचे विक्री केलेले क्षेत्र ०-१८-१३ | ०-१६ |
| | | एकुण विक्री केलेले क्षेत्र ०-२०-०७ हे.आर.पॉ | |

सबब सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०७/०१/२०२६ **ॲड. समीर आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता गाळा नं. ०९,कोर्ट व्ह्यू
बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व
फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड
मो. नं. ९१५८३१३७३३

---

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की खाली नमूद केलेली जमीन मिळकत १) हरिश्चंद्र बाळू मोहिते २) अनघा रवींद्र दुर्वे ३) वैशाली विकास मंडावळे यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून हक्कनोंदिस त्यांचे नावे दाखल आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याची विद्यमान मालकांनी खात्री दिली आहे. त्यांचे सांगणेवरून सदरील मिळकतीचे मालकी हक्क (टायटल) स्वच्छ व निर्वेध असल्याची खात्री करून घेणेसाठी सदरची जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :**
**मौजे नसरापूर, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ३८ | २ | ०-५६-१० | ९-३१ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. नमूद मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही तर सदर मिळकतीबाबतचे टायटल क्लिअर व मार्केटेबल आहे असे समजण्यात येईल व त्यानंतर येणारी कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व ती संबंधीत जमीन मालकांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
ता. ०७/०१/२०२६ **ॲड. किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

---

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे दहिवली तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड, येथे असलेली खालील परिशिष्ठमध्ये वर्णनीलेली बिनशेती जमीन मिळकत आमचे अशील १. गणेश अशोक गुप्ता २. अभिषेक कृपाराम लोवंशी यांनी या जमीन मिळकतीचे विद्यमान मालक रोहेला डेव्हलपर्स अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड तर्फे डायरेक्टर राहुल रमेश शेलार यांचे तर्फे कुळ अखत्यारी म्हणून अजय शिवानंद ठाकरे, यांचेकडून कायम खरेदी करायचे ठरवले आहे.

**बिनशेती जमिनीचे वर्णन**
**गणेश अशोक गुप्ता यांचेशी खरेदी व्यवहार ठरलेली मिळकत**
**मौजे दहिवली तर्फे नीड, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र चौरस मीटर | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १७५/२० | २.४७.०० | ४.९४ |

**बिनशेती जमिनीचे वर्णन**
**अभिषेक कृपाराम लोवंशी यांचेशी खरेदी व्यवहार ठरलेल्या मिळकती**
**मौजे दहिवली तर्फे नीड, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र चौरस मीटर. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १७५/२१ | १.९०.०० | ३.८० |
| १७५/२२ | २.०५.०० | ४.१० |

सदरहू बिनशेती जमीन मिळकतींचे विद्यमान मालक यांच्याकडून आमचे अशिलांनी सर्व हक्कासह, कायमस्वरूपी खरेदीखतद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदर जमीन मिळकतींमध्ये कुणाचा गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, हक्क, बोजा वगैरे किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचविणे. वरील मुदतीत कुणाची कुठल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू जमीन मिळकती निर्वेध असल्याचे समजून सदरहू जमिनींच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

कर्जत दि. ०७/०१/२०२६ **हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी**
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :-श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं.१०,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड, पिन-४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

---

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की खाली नमूद केलेल्या जमीन मिळकती मुंबई गोग्रास भिक्षा संस्था यांचे मालकीच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीच्या असून हक्कनोंदिस त्यांचे नावे दाखल आहे व इतर अधिकारामध्ये विठू गोपाळ बोराडे यांचे नाव साधे कुळ म्हणून आहे. सदर मिळकती निर्वेध असल्याची विद्यमान मालकांनी खात्री दिली आहे. त्यांचे सांगणेवरून सदरील मिळकतीचे मालकी हक्क (टायटल) स्वच्छ व निर्वेध असल्याची खात्री करून घेणेसाठी सदरची जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :**
**मौजे नसरापूर, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकती**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ३९ | २/अ | ०-६३-८० | ७-३१ |
| ४२ | ३ | ०-०८-०० | ०-९१ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुल अखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. नमूद मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही तर सदर मिळकतीबाबतचे टायटल क्लिअर व मार्केटेबल आहे असे समजण्यात येईल व त्यानंतर येणारी कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व ती संबंधीत जमीन मालकांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
ता. ०७/०१/२०२६ **ॲड. किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.९४२२०६८७५५

---

**तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण, कर्जत यांचे न्यायालयात**
पत्ता : प्रशासकिय भवन, पहिला मजला, पोलिस मैदानाजवळ, कर्जत,
ता. कर्जत जि.रायगड- ४१०२०१

(Tenancy Mannual, Form VIII )

**महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम, १९४८ चे कलम ३२ पोटकलम (१) या अन्वये द्यावयाची नोटीस जाहीर नोटीस**

३२ग दावा क्रमांक : टेनन्सी/एसआर/४३-२०२५

१. श्री. शंकर बुधाजी भोसले
रा. वैजनाथ ता. कर्जत जि. रायगड — अर्जदार
विरुद्ध
१. वैजनाथ देव वहिवाटदार
गजानन रामकृष्ण मेहेंदळे — सामनेवाले
रा. वैजनाथ ता. कर्जत जि. रायगड

तमाम जनतेस तसेच सामनेवाले/प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे -वैजनाथ, ता.कर्जत, जि.रायगड या जमिन मिळकती संदर्भात ३२ ग अन्वये अर्ज दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये दिनांक १३/११/२०२५ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर दाव्याची पुढील सुनावणी दिनांक ०८/०१/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता तहसिल कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींनी सुनावणीच्या दिवशी तहसिलदार तथा शेतजमिन यांचे न्यायालयात समक्ष आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| तालुक्याचे नाव | गावाचे नाव | भुमापन क्र.(सर्व्हे नं.) | पोट हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ (हे.आर.पॉ) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|---|
| कर्जत | वैजनाथ | ९० | ४/क | ०-३३-०० | ०-२७ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

ठिकाण : कर्जत
दिनांक : २२/१२/२०२५ सही/-
**तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण कर्जत, रायगड**

---

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली सामाईक मिळकत हि त्या मिळकतीचे विद्यमान मालक सौ. प्रणिता शशिकांत भोसले रा. पिंपळभाट, अलिबाग यांच्याकडुन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदि. कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील ७ (सात) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन व उपविभाग क्र | क्षेत्र (आर.चौ.मी) |
|---|---|---|
| मान तर्फ झिराड, ता.अलिबाग | ५७/१/अ/१ | ९२-७०-०० |

वर नमुद मिळकतीपैकी सौ. प्रणिता शशिकांत भोसले यांच्या मालकीचे क्षेत्र १.७०.०० आर. चौ. मी. आकार १७.०० रू. पै. ही मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

अलिबाग, सही /-
दिनांक- ०६/०१/२०२६ **ॲड. पुनम अजित म्हात्रे**
जिल्हा न्यायालय - रायगड,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबाईल नं ९७६४२१४०१०

## अंडर १९ वर्ल्डकप स्पर्धा

# १५ जानेवारीपासून सुरूवात



| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

अंडर १९ वर्ल्डकप स्पर्धा ही युवा खेळाडूंसाठी उत्तम व्यासपीठ आहे. या स्पर्धेत झळकलेल्या खेळाडूंनी पुढे जाऊन आंतरराष्ट्रीय क्रिकेट गाजवलं आहे. अंडर १९ वर्ल्डकप म्हटलं, तर चटकन १९ वर्षांचा विराट आणि केन विलियम्सनसारख्या खेळाडूंचा चेहरा डोळ्यांसमोर येतो. आता पुन्हा एकदा या स्पर्धेचा थरार रंगणार आहे. भारताकडून आयुष म्हात्रे आणि वैभव सूर्यवंशीसारखे स्फोटक फलंदाज या स्पर्धेत खेळताना दिसणार आहे.

आयसीसी अंडर १९ वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत एकूण १६ संघ खेळताना दिसणार आहेत. या १६ संघांना ४ गटात विभागलं जाणार आहे. प्रत्येक संघाला साखळी फेरीत ३ सामने खेळणार आहे. प्रत्येक गटातील टॉप ३ संघ सुपर सिक्स फेरीत प्रवेश करतील. ग्रुप १ मधील टॉप २ आणि ग्रुप २ मधील टॉप २ संघ सेमीफायनलमध्ये प्रवेश करतील. त्यानंतर स्पर्धेतील अंतिम सामना हरारेमध्ये खेळवला जाईल.

आयसीसी अंडर १९ वर्ल्डकप २०२६ स्पर्धेला येत्या १५ जानेवारीपासून सुरूवात होणार आहे. तर स्पर्धेतील अंतिम सामना ६ फेब्रुवारीला खेळवला जाईल. हे या स्पर्धेचे १६ वे हंगाम असणार आहे. या स्पर्धेचे आयोजन झिम्बाब्वे आणि नामिबियामध्ये केले जाणार आहे. आयसीसी अंडर १९ वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील सामने क्रिकेट चाहत्यांना स्टार स्पोर्टसवर लाईव्ह पाहता येणार आहेत. या स्पर्धेचे लाईव्ह स्ट्रिमिंग तुम्ही जिओ हॉटस्टारवर लाईव्ह पाहता येणार आहेत. या स्पर्धेतील सामने भारतीय वेळेनुसार दुपारी १ वाजता सुरू होतील.

**स्पर्धेसाठी चार गट**


- **अ गट :** ऑस्ट्रेलिया, श्रीलंका, आयर्लंड, जपान
- **ब गट :** भारत, बांगलादेश, न्यूझीलंड, अमेरिका
- **क गट :** झिम्बाब्वे, पाकिस्तान, इंग्लंड, स्कॉटलंड
- **ड गट :** नामिबिया, वेस्ट इंडिज, दक्षिण आफ्रिका, तंझानिया.

**या स्पर्धेसाठी असा आहे भारतीय अंडर-१९ संघ:** आयुष म्हात्रे (कर्णधार), विहान मल्होत्रा (उपकर्णधार) वैभव सूर्यवंशी, एरॉन जॉर्ज, वेदांत त्रिवेदी, अभिज्ञान कुंडु (यष्टिरक्षक), हरवंश सिंग (यष्टिरक्षक), आर. एस. अंबरीश, हेनिल पटेल, डी. दीपेश, किशन कुमार सिंग,उधव मोहन, कनिष्क चौहान, खिलान ए. पटेल, मोहम्मद ऐनाम.

अंडर १९ पुरुषांच्या संघात स्फोटक फलंदाजांचा आणि भेदक गोलंदाजांचा भरणा करण्यात आला आहे. फलंदाजांमध्ये डावखुरा फलंदाज वैभव सूर्यवंशी आणि कर्णधार आयुष्य म्हात्रे यांचा समावेश आहे. या दोघांवर संघाच्या फलंदाजीची मदार असणार आहे. त्यांना साथ देण्यासाठी निवड करण्यात आलेले खेळाडू सर्वच अष्टपैलू खेळ करणारे आहेत.

## देवदत्त पड्डीकलने रचला नवा विक्रम

| मुंबई | प्रतिनिधी |



भारतीय वनडे संघात प्रवेश करण्याच्या दृष्टीने कर्नाटकचा फलंदाज देवदत्त पड्डीकलने दमदार पाऊल टाकलं. मंगळवारी देवदत्तने राजस्थानविरुद्ध ९१ धावांची खेळी साकारली. या खेळीदरम्यान देवदत्तने यंदाच्या विजय हजारे स्पर्धेत ६०० धावांचा टप्पा ओलांडला आहे. तीन वेगवेगळ्या वर्षी या स्पर्धेत ६०० धावांचा टप्पा ओलांडणारा तो पहिलावहिला फलंदाज ठरला आहे. देवदत्तने २०१९-२० तसंच २०२०-२१ मध्ये याच स्पर्धेत धावांची टाकसाळ उघडली होती.२०२०-२१ हंगामात या स्पर्धेत खेळताना देवदत्तने लिस्ट ए प्रकारात सलग ४ शतकं झळकावण्याचा मान पटकावला होता.देवदत्तने २ कसोटी आणि २ टी २० सामन्यात भारताचं प्रतिनिधित्व केलं आहे. २०२४ मध्ये इंग्लंडविरुद्ध धरमशाला इथे देवदत्तने भारतीय संघासाठी पदार्पण केलं. सलामीच्या कसोटीत त्याने ६५ धावांची खेळी साकारली होती.

# बीच कबड्डीत महाराष्ट्राची धडाकेबाज सलामी

### यजमान दीव संघाचा ५३ गुणांनी धुव्वा



| दीव | वृत्तसंस्था |

दुसऱ्या पर्वातील खेलो इंडिया बीच स्पर्धेचा उद्घाटनाचा दिवस महाराष्ट्राच्या कबड्डी संघाच्या धडाकेबाज कामगिरीने गाजला. महिलांनी सलामीच्या लढतीत यजमान दीव-दमण संघाचा ५३ गुणांनी धुव्वा उडविला. पाठोपाठ पुरूष संघानेही बलाढ्य दिल्लीला ४७-२० गुणांनी पराभूत करीत विजयी सलामी दिली.

दुसऱ्या स्पर्धेतील सकाळच्या सत्रात सत्रात संपलेल्या बीच कबड्डीत स्पर्धेतीत सलामीच्या लढतीत महाराष्ट्राच्या महिला संघाने यजमान दीव-दमण संघावर ७१-१८ गुणांनी दणदणीत विजय संपादन केला. सुरूवातीपासून महाराष्ट्राच्या महिलांनी आक्रमक खेळ करीत आपले वर्चस्व गाजवले.

पूर्वार्धातील ३६-५ गुणांनी आघाडी कायम राखत होती. समृद्धी मोहिते व हर्षा शेट्टी यांनी उत्कृष्ट चढाया करीत तर पौर्णिमा जेधे, समरीन बुरोंडकर यांनी पकड घेत स्पर्धेत सर्वात मोठ्या विजयाची पल्ला सर केला.

पुरूषांच्या कबड्डीतही जय महाराष्ट्राचा नारा घुमला. महाराष्ट्राने दिल्लीवर ४७-२० गुणांनी दणदणीत विजयाची नोंद केली. पूर्वार्धात २३-१४ गुणांनी मोठी आघाडी महाराष्ट्राने घेतली होती.

उत्तरार्धातही साहिल राणे आक्रमक आणि दादासो पुजारचीच्या पकडीमुळे महाराष्ट्राने २७ गुणांनी पहिल्याच लढतीत विजयाचा झेंडा फडकविला आहे.

गतस्पर्धेत महाराष्ट्राने पेंचक सिलटमध्ये महाराष्ट्राने ३ सुवर्ण, ४ रौप्य व ५ कांस्य अशी एकूण १२ पदकांची कमाई करीत वर्चस्व गाजवले. होते. सागरी जलतरणातही २ सुवर्ण, १ रौप्य व २ कांस्य पदके महाराष्ट्राच्या नावापुढे झळकवली होती. बीच सॉकर, बीच कबड्डी या सांघिक खेळातही कांस्यपदकावर महाराष्ट्राच्या खेळाडूंनी नाव कोरले. होते यंदा अव्वल स्थानासाठी मणिपूर, नागालँड व महाराष्ट्रात चुरस पहाण्यास मिळणार आहे. कबड्डीतील पहिल्या सुवर्णपदकासाठी महाराषट्राने विजयी वाटचाल सुरू केली आहे.

## निवडक

### पीएनपी शाळेच्या श्रेया पिंगळेची कराटे स्पर्धेत चमकदार कामगिरी



**अलिबाग :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड व थांग-ता मार्शल आर्ट असोसिएशन नवी-मुंबई द्वारा आयोजित मुंबई विभाग शालेय थांग-ता मार्शल आर्ट स्पर्धा नेरूळ नवी मुंबई येथे रविवार ४ जानेवारी रोजी विविध वयोगटातील झालेल्या स्पर्धेत मुलींच्या १७ वर्षाखालील वजनी गटातील स्पर्धेत वाय. एम. पाटील इंग्लिश मिडियम स्कूल सांबरी शाळेची विद्यार्थिनी श्रेया पुरुषोत्तम पिंगळे या खेळाडूने सबंधित वयाच्या वजनी गटात सुवर्ण पदकाची मानकरी ठरली. पुढील दिवसात होणाऱ्या राज्यस्तरीय थांगता स्पर्धेकरीता मुंबई विभागाचे ती प्रतिनिधित्व करणार आहे. जिल्हा क्रीडा संकुल नेहूली (अलिबाग) येथे ३० डिसेंबर रोजी झालेल्या जिल्हास्तर शालेय थांग-ता स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त करून, श्रेया मुंबई विभागा करीता पात्र ठरली. इयत्ता आठवीच्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या श्रेयाने या शैक्षणिक वर्षात शालेय कराटे क्रीडा प्रकारात १७ वर्षाखालील वयोगटातील +६८ या वजनी गटात तालुका व जिल्हास्तर सुवर्ण कामगिरी करून ठाणे येथे झालेल्या मुंबई विभाग कराटे स्पर्धेस रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले होते. या यशाबद्दल पीएनपी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, पीएनपी वायएमपी शाळेच्या मुख्याध्यापिका मेधा दुबे आणि शिक्षकांनी श्रेयाचे या उल्लेखनीय यशाबद्दल अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



### आक्षी येथे कराटे प्रशिक्षण प्रमाणपत्र वाटप

**अलिबाग :** रायगड जिल्हा परिषद शाळा आक्षी येथे नुकताच कराटे प्रशिक्षण प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम सोहळा संपन्न झाला. जय शोतोकॉन कराटे आणि स्पोर्ट्स अकॅडमी यांच्या तर्फे संस्थेचे अध्यक्ष संतोष कवळे यांच्या मार्गदर्शनाखाली आक्षी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना एक महिन्याचे कराटे प्रशिक्षण मोफत देण्यात आले. प्रशिक्षक म्हणून निकिता थळे (ब्लॅक बेल्ट) यांनी उत्तम कामगिरी बजावली. सदर कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष संतोष कवळे, प्रशिक्षक निकिता थळे, तसेच अलिबाग बीट विस्तार अधिकारी व नागाव केंद्राच्या केंद्र प्रमुखा प्राची राजन ठाकूर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. तसेच मुख्याध्यापक ज्योती घरत व उपशिक्षिका सुनिता राठोड यांचे सहकार्य लाभले.

### मुंबई सहाव्या सामन्यासाठी सज्ज

**नवी दिल्ली :** विजय हजारे स्पर्धेत यंदाच्या हंगामात मुंबई आपला सहावा सामना खेळण्यासाठी सज्ज झाली आहे. मुंबईने या स्पर्धेत आतापर्यंत धमाकेदार कामगिरी केली आहे. शार्दूल ठाकुर याने त्याच्या नेतृत्वात मुंबईला सलग ४ सामने जिंकून दिले. मात्र मुंबईला पाचव्या सामन्यात विजयी लय कायम ठेवण्यात अपयश आलं. महाराष्ट्रने मुंबईला पराभूत करत विजय रथ रोखला. मुंबईचा हा पहिला पराभव ठरला. आता मुंबई या स्पर्धेतील आपल्या सहाव्या सामन्यात हिमाचल प्रदेश विरुद्ध भिडणार आहे. हिमाचल प्रदेश विरुद्धच्या सामन्याआधी मुंबईला मोठा झटका लागला आहे. हंगामी कर्णधार शार्दूल ठाकुर याला दुखापतीमुळे विजय हजारे ट्रॉफीतील मुंबईच्या २ सामन्यांमधून बाहेर व्हावं लागलं आहे. त्यामुळे दुखापतीनंतर कमबॅक होताच श्रेयस अय्यर याला कर्णधारपदाची सूत्र देण्यात आली आहेत. त्यामुळे श्रेयस आता हिमाचल प्रदेश विरुद्ध कशी कामगिरी करतो हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# रोह्यात रंगणार खो-खो लीगचा थरार

| खांब | प्रतिनिधी |



खो-खो खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ मिळावे, तसेच ग्रामीण भागातील गुणवान खेळाडूंची गुणवत्ता राज्य व जिल्हास्तरावर अधोरेखित व्हावी, या उद्देशाने रोहा खो-खो प्रीमियर लीगचे आयोजन करण्यात आले आहे.

ही लीग जय बजरंग क्रीडा मंडळ, रोहा व एस.एन.एस. स्पोर्ट्स क्लब, रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येत असून या स्पर्धेस रायगड जिल्हा खोखो असोसिएशन तसेच रोहा तालुका खो-खो असोसिएशन यांची अधिकृत मान्यता प्राप्त झाली आहे. त्यामुळे ही लीग अधिकृत नियमांनुसार व नियोजित वेळापत्रकानुसार पार पडणार आहे. नुकतीच माजी आमदार अनिकेत तटकरे यांची सदिच्छा भेट घेण्यात आली. या भेटीदरम्यान प्रस्तावित खो-खो लीगसाठी आवश्यक मार्गदर्शनासह अधिकृत मान्यता प्राप्त झाली आहे. या मान्यतेमुळे लीगचे आयोजन नियोजित वेळेत, शिस्तबद्ध व नियमबद्ध पद्धतीने पार पडणार येणार असून ही स्पर्धा २४ व २५ जानेवारी रोजी श्री.धावीर महाराज क्रीडा नगरी, मेढा, येथे आयोजित करण्यात येणार आहे.

या लीगमध्ये पुरुषांचे ८ संघ व महिलांचे २ संघ सहभागी होणार असून, पुरुष विभागासाठी खेळाडूंची संघबांधणी लिलाव पद्धतीने केली जाणार आहे. सदर खेळाडू लिलाव प्रक्रिया १५ जानेवारी रोजी पार पडणार असून, ही प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक ठेवण्यासाठी स्वतंत्र नियमावली जाहीर केली आहे.

लीगच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजन समिती स्थापन करण्यात आली असून, या समितीमध्ये अमर सलागरे, अक्षय मोरे, राज देशमुख, आकाश पाटील, साहिल जाधव, मनिष मढवी, निखिल ठमके, साई थळे, ओंकार कदम, सोहम कोंडे, यश चोगले, ऋतिक खेमन व अनिरुद्ध जवरत यांचा समावेश आहे. ही समिती लीगचे संपूर्ण नियोजन, अंमलबजावणी व व्यवस्थापन पाहणार आहे. सल्लागार समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये तानाजी जाधव, विशाल शिंदे, तुषार ठमके, रूपेश राटाटे, नरेश गायकर व दिनेश कांबळे यांचा समावेश आहे. या लीगमध्ये राज्य, राष्ट्रीय व विद्यापीठ स्तरावर खेळलेले अनुभवी खेळाडू तसेच नवोदित खेळाडू सहभागी होणार असून, त्यामुळे प्रेक्षकांना दर्जेदार, वेगवान व रोमांचक खोखो सामने पाहण्याची संधी मिळणार आहे.

# यंगस्टार चॅम्पियन ट्रॉफी ट्रॅव्हल्स पॉईंट संघाने जिंकली



| नेरळ | प्रतिनिधी |

नेरळ गावातील मोहाचीवाडी ग्रामस्थ मंडळ यांच्या माध्यमातून बॉक्स क्रिकेटची स्पर्धा आयोजित केली होती. नेरळ गावातील नामांकित २० संघांचा सहभाग असलेली यंगस्टार चॅम्पियन ट्रॉफी नेरळ गावातील टेपआळी मधील ट्रॅव्हल्स पॉईंट संघाने जिंकली.

मोहाचीवाडी ग्रामस्थ मंडळाने नेरळ गावातील छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे बॉक्स क्रिकेटचे आयोजन केले होते.या यंगस्टार चॅम्पियन ट्रॉफी मध्ये नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील २० संघांनी सहभाग घेतला होता. दोन दिवस या बॉक्स क्रिकेट स्पर्धा रात्रीच्या वेळी खेळविण्यात आल्या. या स्पर्धेचे मुख्य आयोजन रोहन चव्हाण आणि मुकेश गायकवाड यांनी केले होते.तर मोहाची वाडी ग्रामस्थ मंडळाने सामन्यांचे व्यवस्थापन केले.त्यात हेमंत चव्हाण, अक्षय चव्हाण, धनाजी डबरे, सज्जद खान, इम्रान खान, रोशन आढाव, राहत अली खान आणि ग्रामस्थ यांचा सहभाग होता. स्पर्धेला सर्व राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी भेट दिली. त्यात रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका कार्याध्यक्ष मधुकर घारे, शिवसेनेचे माजी शहर प्रमुख रोहिदास मोरे, आझाद हिंद पार्टीचे प्रदेश सचिव सुमित साबळे, कर्जत तालुका आगरी समाज संघटना अध्यक्ष संतोष पेरणे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाच्या महिला तालुका अध्यक्ष ॲड. रंजना धुळे, तसेच मनीषा पाटील, सुजाता तायडे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेरळ अध्यक्ष गणेश खराटे, शिवसेना ठाकरे गटाचे नेरळ अध्यक्ष हेमंत क्षीरसागर, भाजप जिल्हा चिटणीस मंगेश म्हसकर, राष्ट्रवादी काँग्रेस नेरळ संघटक प्रवीण ब्रह्मण्डे, विभाग अध्यक्ष बंडू तुर्डे, शिवसेना ठाकरे गटाचे उप शहर प्रमुख संतोष सारंग, टॅक्सी संघटनेचे अध्यक्ष आणि भाजप नेरळ सरचिटणीस नरेंद्र कराळे, तसेच नफिद जळगावकर, व्यापारी फेडरेशनचे प्रितम गोरी, रितेश भालेराव, संदीप उतेकर, परेश सुर्वे, अमित सुर्वे यांच्यासह अनेक मान्यवरांनी भेट दिली.

मध्यरात्री दीड वाजता स्पर्धेचा अंतिम सामना रंगला आणि त्यात ट्रॅव्हल्स पॉईंट टेपआळी संघाने जयदीप मंडळ नेरळ पूर्व संघाचा अटीतटीच्या लढतीत पराभव केला आणि विजेतेपद पटकावले. तिसरा क्रमांक कुंभारआळीमधील विजय गर्जना संघाने तर केसीसी संघ चौथ्या क्रमांकावर राहिला.

# बाहे संघ ठरला चषकाचा मानकरी

| खांब | प्रतिनिधी |



रोहा तालुक्यातील गावदेवी धानकान्हे यांच्या वतीने संपन्न करण्यात आलेल्या विभागीय कबड्डी स्पर्धेत गांवदेवी बाहे संघाने सर्वोत्तम कामगिरी करून चषकावर आपले नाव कोरले.

गांवदेवी क्रीडा मंडळ धानकान्हे व कोलाड कबड्डी असोसिएशन यांच्या वतीने संपन्न करण्यात आलेल्या या कबड्डी स्पर्धेत गांवदेवी बाहे संघाने सर्वोत्तम खेळ करून ही कामगिरी केली आहे. येथील उपसरपंच सूरज कचरे, सेवानिवृत्त सैनिक समीर साळुंखे, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र भादावकर, पत्रकार श्याम लोखंडे यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात आलेल्या या कबड्डी स्पर्धेप्रसंगी युवा उद्योजक नितिन कचरे, डॉ. हेमा भादावकर, उद्योजक नारायण कान्हेकर, समाजसेवक संदेश गायकवाड, प्रदीप जाधव, घन:श्याम कराले, हेमंत खरिवले आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेत जय बजरंग आंबेवाडी संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

तृतीय व चतुर्थ क्रमांक अनुक्रमे वाघेश्वर देवकन्हे व नवतरूण सोनारसिद्ध धाटाव या संघांनी पटकावले. स्पर्धेत उत्कृष्ट पकड राज रटाटे, उत्कृष्ट चढाई प्रणिल करवडे, सामनावीर विशाल माटल तर पब्लिक हिरो म्हणून स्वप्नील भोईर यांना तसेच विजेत्यांना उपस्थित मान्यवरांचे हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी गावदेवी धानकान्हे मंडळाचे सर्व सदस्य तसेच कोलाड असोसिएशन यांनी मोलाचे सहकार्य केले.

## शिखर धवन पुन्हा करणार लग्न

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

टीम इंडियाचा माजी खेळाडू शिखर धवन सध्या क्रिकेटच्या मैदानावर दिसत नसला तरी तो चर्चेत असतो. सोशल मीडियावरही शिखर बराच ॲक्टिव्ह दिसतो. याच शिखरच्या घरात आता शहनाईचे सूर ऐकायला येणार आहेत. शिखर धवन लवकरच त्याची गर्लफ्रेंड सोफी शाइनसोबत लग्नबंधनात अडकणार असल्याचे वृत्त आहे. ते दोघे बऱ्याच काळापासून एकमेकांना डेट करत आहेत. येत्या फेब्रुवारी महिन्यात हे दोघे लग्न करणार आहेत. त्यासाठी फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यातच दिल्लीमध्ये शानदार सेलिब्रेशन होणार आहे. या सोहळ्यात क्रिकेट जगतातील तसेच बॉलीवूडमधीलही अनेक सेलिब्रिटी हजर राहणार असल्याचे समजते.

### मुलींनी पटकावले अजिंक्यपद | मुलांना रौप्यपदकावर मानावे लागले समाधान

# महाराष्ट्राची दुहेरी विजेतेपदाची परंपरा खंडित

| बंगळूर | वृत्तसंस्था |

महाराष्ट्राच्या मुलींनी ओडिशाचा पराभव करून राज्य खो-खो स्पर्धेत कुमारी गटाचे विजेतेपद मिळवले; मात्र मुलांच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राच्या संघाला कर्नाटकविरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला, त्यामुळे गेल्या १० वर्षांतील महाराष्ट्राची दुहेरी विजेतेपदाची परंपरा खंडित झाली.

महाराष्ट्राने गेल्या वर्षापर्यंत सलग १० दुहेरी अजिंक्यपदे मिळवली होती. मुलांच्या गटात सलग १९ आणि एकूण ३५ अजिंक्यपदे महाराष्ट्राच्या नावावर होती; मात्र यंदा ही परंपरा खंडित झाली; मात्र महाराष्ट्राच्या मुलींनी सलग अकरावे व एकूण २७वे अजिंक्यपद जिंकत आपले वर्चस्व अधोरेखित केले.या स्पर्धेत सोलापूरच्या शेतकरी कुटुंबातील स्नेहा लामकाने हिने जानकी पुरस्कार मिळवला. तर कर्नाटकच्या बी. विजय याला वीर अभिमन्यू पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.



महाराष्ट्राच्या मुलींना विजेतेपदासाठी संघर्ष करावा लागला. मध्यंतरापर्यंत १४-११ अशा निसटत्या फरकाने महाराष्ट्र आघाडीवर होता. तर संपूर्ण वेळेत दोन्ही संघांचा गुणफलक २५-२५ असा बरोबरीत होता. त्यानंतर झालेल्या अतिरिक्त डावात महाराष्ट्राने दमदार खेळ करीत ४४-३३ असा ११ गुणांनी विजय मिळवला.महाराष्ट्राच्या स्नेहा लामकाने (३, २.४० मि. संरक्षण व ४ गुण), मैथिली पवार (१.३०, १.३० मि., ६ गुण), सानिका चाफे (२.२०, १.४० मि., २ गुण), दीक्षा काटेकर (१.२० मि., १० गुण), श्रावणी तामखडे (२, १.४०, १.१० मि.), श्रुती चोरमरे (१२ गुण) व श्वेता नवले (नाबाद २ मि. संरक्षण व ४ गुण) यांनी विजयात ठसा उमटवला.

ओडिशाच्या अर्चना प्रधान, तृप्ती बारीक, चिन्मयी प्रधान आणि के. रम्या यांनी उत्कृष्ट खेळ केला. मुलांच्या अंतिम सामन्यात यजमान कर्नाटकने महाराष्ट्रावर ३५-३० अशी पाच गुणांनी मात केली. मध्यांतराला कर्नाटकने २३-१२ अशी मोठी आघाडी घेतली होती. कर्नाटककडून विजय बी. इब्राहिम, जीवन राठोड, जीवन के. आणि अनिकेत यांनी विजयात मोलाचा वाटा उचलला. महाराष्ट्राकडू राज जाधव, हरदया वसावे, पार्थ देवकाते, जितेंद्र वसावे आणि योगेश पवार यांनी जोरदार प्रतिकार केला. मुलींच्या गटात महाराष्ट्राची स्नेहा लामकाने जानकी पुरस्काराची मानकरी ठरली, तर दीक्षा काटेकर (महाराष्ट्र) हिने सर्वोत्कृष्ट आक्रमक आणि ओडिशाच्या अर्चना प्रधान हिने सर्वोत्कृष्ट संरक्षक पुरस्कार पटकावला. मुलांच्या गटात महाराष्ट्राचा राज जाधव सर्वोत्कृष्ट आक्रमक खेळाडू ठरला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)